
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २२ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २५३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## मुंबई उपनगरी रेल्वे बॉम्बस्फोटातील
# १२ आरोपींची निर्दोष मुक्तता

### मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय ● गुन्हा केल्याच्या आरोपांवर विश्वास ठेवणे कठीण



**मुंबई, २१ जुलै**
येथील उपनगरी रेल्वेत १८९ निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्या बॉम्बस्फोटाला १९ वर्षे उलटल्यावर मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी या प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष सोडले. सरकारी पक्षाला आरोप सिद्ध करता आलेले नाहीत आणि आरोपींनी हा गुन्हा केला यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, असे न्यायालयाने निर्णय देताना स्पष्ट केले.

हा निकाल उपनगरी रेल्वे स्फोटाचा तपास करणाऱ्या महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकासाठी लाजीरवाणा आहे. स्फोटासाठी नेमके कोणत्या प्रकारचे बॉम्ब वापरण्यात आले, याची माहिती सरकारी पक्ष रेकॉर्डवर ठेवू शकला नाही. ज्या पुराव्यांवर सरकारी पक्ष अवलंबून होता, ते आरोपींना दोषी ठरवण्यासाठी पुरेसे नव्हते, असे विशेष पीठाचे न्या. अनिल किलोर आणि श्याम चांडक यांनी म्हटले.

साक्षीदारांचे जबाब आणि आरोपींकडून मिळालेल्या कथित जप्तींना कोणतेही पुरावामूल्य नाही, असे न्यायालयाने १२ जणांची शिक्षा रद्द करताना म्हटले. यापैकी पाच जणांना न्यायालयाने मृत्युदंड आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मुंबई उपनगरी रेल्वेच्या वेस्टर्न लाईनवर ११ जुलै २००६ रोजी विविध ठिकाणी सात गाड्यांत झालेल्या स्फोटात १८९ जणांचा मृत्यू तर काही जखमी झाले होते. आरोपींविरुद्धचा खटला सिद्ध करण्यात सरकारी वकील पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. आरोपींनी गुन्हा केला, हे मानणे कठीण आहे. त्यामुळे त्यांची शिक्षा रद्द करण्यात येत आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. २०१५ मध्ये विशेष न्यायालयाने पाच दोषींना ठोठावलेल्या मृत्युदंडाची आणि उर्वरित सात दोषींची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवण्यास खंडपीठाने नकार दिला आणि त्यांना निर्दोष सोडले. इतर कोणत्याही प्रकरणात आरोपीची आवश्यकता नसेल, तर त्याला तत्काळ सोडण्यात यावे, असे स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

#### निर्दोष सुटलेले आरोपी

कमाल अहमद अन्सारी, मोहम्मद फैजल रहमान शेख, एत्तेशाम सिद्दिकी, नावेद हुसैन खान राशीद, आसिफ खान बशिर खान (फाशीच्या शिक्षेतून सुटका), तनवीर अहमद अन्सारी, मोहम्मद शफी, शेख मोहम्मद अली आलम, मोहम्मद साजिद अन्सारी, मुझम्मील रहमान शेख, सुहेल मेहमूद शेख, झमीर रेहमान शेख (जन्मठेपेतून सुटका).

#### आम्ही केवळ कर्तव्य केले : न्यायमूर्तिद्वय

न्यायमूर्ती म्हणून असलेले आमचे कर्तव्य आम्ही केले आहे, अशी प्रतिक्रिया १२ आरोपींना निर्दोष सोडण्याचा निर्णय देणारे न्या. अनिल किलोर आणि न्या. श्याम चांडक यांनी व्यक्त केली आहे.

#### राज्य सरकार आदेशाचा अभ्यास करणार : बावनकुळे

न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या मुद्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.

#### अमरावती कारागृहातून चौघांची सुटका

**अमरावती** : बॉम्बस्फोट प्रकरणात शिक्षा भोगत असलेल्या चौघांची अमरावती मध्यवर्ती कारागृहातून आज, सोमवारी सायंकाळी सुटका करण्यात आली. मोहम्मद माजीद मोहम्मद शफी, जमीर अहमद लतीफुर रहेमान शेख, तनवीर अहमद मोहम्मद इब्राईम अन्सारी व सोहेल महेमूद शेख अशी निर्दोष मुक्त झालेल्यांची नावे आहेत.

**११ मिनिटांत ७ स्फोट; १८९ बळी, ८०० हून अधिक जखमी**
(वृत्त पान ३ वर)

## राजकीय लढ्यात ईडीने स्वत:चा वापर का करू द्यावा?

### सर्वोच्च न्यायालयाने सुनावले

**नवी दिल्ली, २१ जुलै**
सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) चांगलेच फटकारले आहे. ईडीने स्वत:चा वापर राजकीय लढाईत का करू द्यावा, असा प्रश्न उपस्थित करीत राजकीय लढाई तपास यंत्रणांमार्फत नव्हे तर निवडणुकीत लढली पाहिजे, अशा शब्दात सुनावले.


म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट बोर्ड (मुडा) प्रकरणात ईडीच्या अपीलावर सुनावणी करताना सोमवारी सीजेआय बीआर गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या न्यायालयाने ही टिप्पणी केली. सरन्यायाधीश म्हणाले, राजकारण्यांना राजकारण करू द्यावे. ईडीने त्यात स्वत:चा वापर का होऊ द्यावा? आम्हाला तोंड उघडायला लावू नका. अन्यथा, आम्हाला ईडीबद्दल कठोर टिप्पणी करण्यास भाग पाडले जाईल. माझ्याकडे महाराष्ट्राचा अनुभव आहे. कृपया हा हिंसाचार देशभर पसरवू नका.

प्रत्यक्षात, ईडीने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बीएम पार्वती यांना मुडा प्रकरणात समन्स पाठवले होते. कर्नाटक उच्च न्यायालयाने मार्चमध्ये हे समन्स रद्द केले होते. ईडीने त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने अखेर ईडीचे अपील फेटाळले.

**मुडा केस काय आहे?**

१९९२ मध्ये, म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाने निवासी क्षेत्र विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांकडून जमीन संपादित केली. त्या बदल्यात, जमीन मालकांना विकसित जमिनीतील ५० टक्के जागा किंवा मुडाच्या प्रोत्साहन ५०:५० योजनेअंतर्गत पर्यायी जागा देण्यात आली. मुडाने सिद्धरामय्या यांच्या पत्नीला भरपाई म्हणून दिलेल्या विजयनगरच्या भूखंडाची किंमत कासारे गावातील त्यांच्या जमिनीपेक्षा खूप जास्त आहे. स्नेहमयी कृष्णा यांनी सिद्धरामय्या यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. सिद्धरामय्या यांच्यावर मुडा जागेला कुटुंबाची मालमत्ता म्हणून दावा करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप केला. (वृत्तसंस्था)

### विचारपुष्प



आपले सर्व कर्म हे भारतमातेच्या सेवेसाठी असले पाहिजे. राष्ट्रप्रेम हे फक्त भावना न राहता कृतीत उतरले पाहिजे.
**माधवराव मुळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

### महत्त्वाचे

#### शेअर बाजारात खरेदीचा उत्साह



**मुंबई** : विदेशी गुंतवणूकदारांकडून खरेदी आणि बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर सोमवारी सेन्सेक्स-निफ्टी वधारून बंद झाले. सेन्सेक्स ४४२ अंकांनी वाढून ८२,२०० वर, तर निफ्टी १२२ अंकांनी वाढून २५,०९० वर बंद झाला. बँकिंग शेअर्समधील तेजीमुळे निफ्टी बँक क्षेत्र मजबूत दिसून आले. सेन्सेक्स सुरुवातीला १४८ अंकांनी घसरून ८१,६०० पर्यंत खाली आला होता. निफ्टी २५ हजारांच्या खाली गेला होता. त्यानंतर दोन्ही निर्देशांकांनी जोरदार रिकव्हरी केली. एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेच्या जून तिमाहीतील चांगल्या कमाईच्या आकडेवारीने एकूणच बँकिंग आणि फायनान्शियल शेअर्समध्ये तेजीचा माहौल राहिला.

#### मेटा, गुगलच्या अधिकाऱ्यांची ईडी चौकशीकडे पाठ

**नवी दिल्ली** : ईडीने समन्स बजावून सोमवारी चौकशीसाठी हजर राहण्याच्या दिलेल्या आदेशाकडे मेटा आणि गुगलच्या अधिकाऱ्यांनी पाठ फिरवली. आता बेकायदेशीर ऑनलाईन जुगार आणि जुगार मंचाच्या जाहिरातीशी संबंधिक 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणात चौकशीसाठी २८ जुलै रोजी हजर राहण्याचा आदेश त्यांना देण्यात आला, अशी माहिती दिली. दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींनी २१ जुलैच्या समन्सला स्थगिती देण्याची मागणी केली.

## उपराष्ट्रपती धनगड यांचा राजीनामा

**नवी दिल्ली, २१ जुलै**
जगदीप धनकड यांनी सोमवारी रात्री उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला. प्रकृती अस्वास्थामुळे आपण पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.



आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी तसेच वैद्यकीय चिकित्सकांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन करीत मी घटनेतील कलम ६७ (ए) च्या अंतर्गत तत्काळ प्रभावाने उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत आहे, असे त्यांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

देशाच्या राष्ट्रपतींनी दिलेल्या अढळ पाठिंब्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्रिमंडळाचे मनापासून आभार मानतो. पंतप्रधानांचे मला अमूल्य सहकार्य लाभले. माझ्या कार्यकाळात मी खूप काही शिकलो आहे, असे धनकड यांनी पत्रात म्हटले आहे.

कार्यकाळाचा उल्लेख करताना, धनकड यांनी संसद सदस्यांचे मनापासून आभार मानले आणि म्हटले की, सदस्यांनी दाखवलेला विश्वास आणि प्रेम कायम स्मरणात राहील. माझ्या कार्यकाळात मला बरेच काही शिकायला मिळाले. या काळात भारताची प्रगती झाली. भारताचा आर्थिक उदय आणि जागतिक स्तरावरील परिवर्तनकारी युगात सेवा करण्याचा बहुमान मला मिळाला. हे आदरणीय पद सोडताना, भारताच्या जागतिक उदयाचा आणि अभूतपूर्व कामगिरीचा मला अभिमान आहे आणि या देशाच्या उज्ज्वल भविष्यावर माझा अढळ विश्वास आहे. बंगालचे राज्यपाल असताना त्यांचा कार्यकाळ चांगलाच गाजला होता. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासोबत त्यांचे नेहमी खटके उडायचे. (वृत्तसंस्था)

#### २०२७ पर्यंत होता कार्यकाळ

ज्येष्ठ राजकारणी आणि कायदेतज्ज्ञ जगदीप धनकड यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये भारताचे १४ वे राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला आणि त्यांच्या कार्यकाळात ते राज्यसभेचे अध्यक्ष म्हणूनही काम करीत होते. त्यांचा राजीनामा भारताच्या राजकारणातील अनपेक्षित घडामोड आहे. त्यांचा कार्यकाळ २०२७ पर्यंत होता.

## न्या. यशवंत वर्मांवर दाखल होणार महाभियोग

**नवी दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचे पाय खोलात जात आहेत. त्यांच्याविरोधात महाभियोगाची कारवाई सुरू झाली आहे. न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोकड सापडल्यानंतर त्यांच्यावर आरोप होत आहेत. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेच्या १४५ खासदारांनी त्यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्तावावर स्वाक्षरी केली. राज्यसभेतील ६३ सदस्यांनी या कारवाईच्या प्रस्तावाचे समर्थन केले. सदस्यांची स्वाक्षरी असलेला प्रस्ताव लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष धनकड यांच्याकडे सोपवल्यानंतर न्या. वर्मा यांच्याविरोधात महाभियोग दाखल करण्याची कार्यवाही सुरू झाली. महाभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावाला भाजपा, काँग्रेस, तेदेपा, जदयु, माकपासह विविध पक्षांचा पाठिंबा मिळाला.




## पालकांना वाऱ्यावर सोडणे कलम २१ चे उल्लंघन

**चंदीगढ** : मालमत्ता हस्तांतरित करण्यासाठी सतत छळ, दुर्लक्ष, वाऱ्यावर सोडणे आणि जबरदस्ती केल्याचा आरोप मुलगा आणि सुनेवर करणाऱ्या एका वृद्ध दाम्पत्याच्या बाजूने हरयाणा मानवाधिकार आयोगाने निर्देश जारी केला आहे.

पालकांना वाऱ्यावर सोडणे म्हणजे कलम २१ चे उल्लंघन असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. वयस्कर आणि अनेक शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या गंभीर आरोग्य समस्यांमुळे ग्रस्त असूनही पंचकुला येथे मुलगा आणि सुनेसोबत एकाच छताखाली राहत असताना आपल्याला एकटेपणा, अपमानास्पद बोलणे आणि मानसिक आघात सहन करावे लागले, असे या तक्रारीत म्हटले होते. तक्रारदार पुरुषाचे वय ८२, तर त्याच्या पत्नीचे वय ७२ वर्षांचे आहे. त्यांनी त्यांचा मुलगा आणि सुनेकडून सतत होणार छळ, दुर्लक्ष आणि वाऱ्यावर सोडण्याच्या विरोधात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करीत आयोगाकडे धाव घेतली. मुलगा आणि सून आपल्या निवासी मालमत्तेची मालकी हस्तांतरित करण्यासाठी दबाव आणत असून, वृद्धाश्रमात जाण्यासाठी टोमणे मारीत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्रास देण्यासाठी खोटा खटलाही दाखल करण्यात आला होता. त्यांनी १८ जानेवारी २०२५ रोजी पंचकुला येथील ज्येष्ठ नागरिक न्यायाधीकरणासमोर पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण कायदा-२००७ अंतर्गत मुलगा आणि सुनेला घराबाहेर काढण्यासाठी अर्जही दाखल केला होता.



**संसद पावसाळी अधिवेशन**

## पावसाळी अधिवेशन नव्हे, 'ऑपरेशन सिंदूर'चा विजयोत्सव

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन




**नवी दिल्ली, २१ जुलै**
ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सशस्त्र दलांनी त्यांचे उद्दिष्ट १०० टक्के साध्य केले आहे. त्यामुळे संसदेचे पावसाळी अधिवेशन विजयोत्सवाप्रमाणे आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले. ही भावना खासदार एका सुरात व्यक्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दहशतवाद्यांचा प्रमुख पाकिस्तानचा बुरखा फाडण्यासाठी ऑपरेशन सिंदूरनंतर भारताची भूमिका मांडण्यासाठी जगाच्या विविध भागांत भेट देणाऱ्या बहुपक्षीय शिष्टमंडळाने केलेल्या प्रयत्नांचे मोदी यांनी कौतुक केले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताची सैन्यक्षमता आणि ताकद जगाला दिसली. त्यामुळे पावसाळी अधिवेशन हे विजयोत्सवाप्रमाणे आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत ठेवण्यात आलेली उद्दिष्टे भारतीय सशस्त्र दलांनी १०० टक्के पूर्ण केली. केवळ २२ मिनिटांत दहशतवाद्यांच्या आकांना त्यांच्या घराच्या मलब्यात गाडण्यात आले, असे मोदी यांनी सांगितले.

मी बिहारमध्ये म्हटले होते की, आपले लष्करी कौशल्य खूप कमी वेळात दिसून आले आहे. जग 'मेड इन इंडिया'च्या लष्करी क्षमतेकडेही आकर्षित झाले आहे. अधिवेशनादरम्यान सर्वच खासदार एकसुरात आणि विजयी भावनेने या भावना व्यक्त करतील, ज्यामुळे भारताची लष्करी क्षमता बळकट होईल, लोकांना प्रेरणा मिळेल आणि 'मेड इन इंडिया' संरक्षण क्षमतांना चालना मिळेल, असे मोदी म्हणाले.

**ऑपरेशन सिंदूरवर होणार २५ तास चर्चा**

ऑपरेशन सिंदूरवर संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा करण्याची तयारी सरकारने दर्शवली आहे. पुढील आठवड्यात लोकसभेत या मुद्यावर १६ तास तर राज्यसभेत ९ तास चर्चा होणार आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या आज झालेल्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. मात्र पुढील आठवड्यात नेमकी कधीपासून चर्चा सुरु केली जाईल, याचा निर्णय अद्याप झाला नाही.

**अनेक जिल्हे नक्षलमुक्त**

दहशतवाद असो अथवा नक्षलवाद, देश सुरुवातीपासूनच हिंसक कारवायांचा सामना करीत होता. मात्र, अनेक जिल्हे नक्षलमुक्त होत असल्याचे मी अभिमानाने सांगतो, असे मोदी म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

**गोंधळामुळे पहिला दिवस गेला वाया**
(वृत्त पान ३ वर)

## क्राईम...

### मंगळवेढ्यात डोक्यात दगड मारुन केले एकास जखमी; दोघाविरुध्द गुन्हा दाखल

मंगळवेढा, दि.२१ जुलै-

तुला खूप मस्ती आली असून गावात तू खूप पुढे पुढे करतो असे म्हणत शिवीगाळ करुन एका ५० वर्षीय व्यक्तीच्या डोक्यात दगड मारुन हातातील पंचने पोटात मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी सुभाष शंकर सरगर, पिनू शंकर सरगर (रा.डोंगरगाव) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील जखमी फिर्यादी मधुकर राजाराम मोरे (वय५०) हे दि.२० रोजी कामानिमित्त मंगळवेढा येथे जुनी मंडईत गावातील संभाजी हेंबाडे, यशवंत आकळे, आबूबकर मुजावर, अक्षय भगरे, रवी घुले, राहुल वाकडे, गणेश घोत्रे आदीसह बसले होते. त्यावेळी आरोपींनी तुला खूप मस्ती आली आहे, गावात तू पुढे पुढे करतो असे म्हणत शिवीगाळ करुन दगड डोकीत मारुन गंभीर जखमी केले. हातातील पंचने पोटात मारुन गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चैन काढून घेतली असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. तुला चैन परत पाहिजे असेल तर गावातील विवेक खिलारे यांचेकडून घे असे म्हणत यापुढे गावात जर तू कोणाच्या भांडणात ढवळाढवळ केली तर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.




# मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे महत्त्वाचे पाऊल

### क्राउड फंडिंग आणि त्रिपक्षीय सामंजस्य करारातून उपचाराचा मार्ग झाला मोकळा

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ जुलै:

राज्यात प्रथमच मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून क्राउड फंडिंग आणि त्रिपक्षीय सामंजस्य करारातून गरिब व गरजू रूग्णांना उपचार देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून 'त्रिपक्षीय सामंजस्य करार आणि क्राउड फंडिंग' या दोन आर्थिक मदतीच्या संकल्पनांवर आधारित ही मदत देण्यात येणार आहे. त्यात कॉर्पोरेट कंपन्या, दाते आणि रुग्णालये यांचे सहकार्य रूग्णांना मिळणार असून, त्यातून हजारो रुग्णांना दिलासा मिळणार आहे.



राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा लाभ देता यावा यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून त्रिपक्षीय करार लवकरच करण्यात येणार आहे. यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कॉर्पोरेट कंपनी, रूग्णालय आणि त्यासोबत काही प्रमाणात रूग्णांचेही योगदान अपेक्षित आहेत.

प्रथमच मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रूग्णांसाठी क्राउड फंडिंग सुरू करण्यात येत आहे. ज्या रूग्णांच्या उपचाराचा खर्च १० लाखांपेक्षा अधिक असेल, असे दुर्धर व गंभीर आजाराचे रूग्ण क्राउड फंडिंगसाठी पात्र ठरणार आहेत. या अशा रूग्णांना कक्षा तर्फे बनविण्यात आलेल्या स्वतंत्र पोर्टल मार्फत अर्ज सादर करावा लागणार आहे.

तीन महिन्याच्या कालावधीत हे पोर्टल कार्यरत होणार आहे. ज्यावेळी रूग्णांच्या उपचाराचा खर्च कोट्यावधीमध्ये असतो, त्यावेळी सर्व योजनांचा फायदा घेवूनही निधीची कमतरता भासते, त्यावेळी क्राउड फंडिंग महत्त्वाचे ठरणार आहे. रूग्णांच्या पात्रतेची तपासणी आणि पारदर्शक प्रक्रियेसाठी नियामक यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहे. ही सुविधा ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू रूग्णांसाठी वरदान ठरेल. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कॉर्पोरेट कंपन्या / दाते/ 'एनजीओ' आणि रूग्णालय मिळून रूग्णांच्या उपचाराकरिता मदत करणार आहेत. तीन महिन्यांच्या कालावधीत क्राउड फंडिंग सुरू केले जाणार आहे. रूग्णांनी फक्त आमच्याकडे अर्ज करावा, उर्वरित जबाबदारी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून पार पाडण्यात येणार आहे. रूग्णांना वेळेत उपचार मिळावेत याकरिता मुख्यमंत्री मा.श्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारातून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली जात आहे. असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

#### आता परदेशातून निधी स्वीकारता येणार

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीला परदेशातून निधी स्वीकारण्यासाठी आवश्यक असलेली एफसीआरए (फॉरेन कॉंट्रिब्युशन रेग्युलेशन अॅक्ट) मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे. यामुळे परदेशातील दानशूर व्यक्ती, संस्था, सीएसआर कंपन्यांकडून थेट आर्थिक मदत स्वीकारता येणार आहे. उल्लेखनिय बाब अशी की, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महाराष्ट्र हे एफसीआरए प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे. या परदेशी निधीचा वापर गरजू रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात येणार आहे.

#### धर्मादाय रुग्णालयांची भूमिका

या योजनेमध्ये धर्मादाय रुग्णालयांचा सहभाग महत्वाचा आहे. शासनाकडून मिळणाऱ्या करसवलतींच्या बदल्यात, या रुग्णालयांना त्यांच्या एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा वार्षिक उत्पन्न १.८० लाखांपर्यंत असलेल्या कुटुंबांसाठी मोफत राखीव ठेवाव्या लागतात. तर, १० टक्के खाटा ३.६० लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी सवलतीच्या दरात उपचाराकरिता राखीव ठेवाव्या लागतात. या व्यवस्थेमुळे गरीब रुग्णांना मोठ्या रुग्णालयांतून उपचार मिळतात. अर्ज प्रक्रिया किंवा इतर कुठल्याही प्रकारच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा.

#### सहा महिन्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत

१ जानेवारी ते ३० जून २०२५ पर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातून १४ हजार ६५१ रूग्णांना १२८ कोटी ६६ लाख ६८ हजार रूपयांची मदत करण्यात आली. तर, धर्मादाय रूग्णालय मदत कक्षातून १ जानेवारी ते ३१ मे २०२५ दरम्यान २ लाख ३२ हजार २६५ रूग्णांना १६५ कोटी ४ लाख २४ हजार ८५७ रूपयांची मदत करण्यात आली.

# मोहोळ तहसीलसमोर राहुटी आंदोलन; पाल टाकून थाटल्या चुली

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि.२१ जुलै-

भटक्या विमुक्त समाजाच्या न्याय हक्कासाठी भारतीय दलित महासंघाच्यावतीने मोहोळ तहसिल कार्यालयासमोर 'बेमुदत राहुटी आंदोलन' करण्यात आले. चक्क पाल टाकून चुली थाटत डोंबारी खेळ सुरु केल्यामुळे हे आंदोलन लक्षवेधी ठरले असून आता तरी शासन व प्रशासन वंचितांच्या न्याय्य प्रश्नाकडे लक्ष देणार का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले.



मोहोळ तालुक्यातील कोळेगाव, यावली, टाकळी सिकंदर, मोहोळ, पाटकूल, पेनूर व इतर ठिकाणी भटक्या विमुक्तांना रहायला घर जागा नाही, रेशन कार्ड नाहीत, पंतप्रधान राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे धान्य मिळत नाही, पिण्याचे पाणी नाही, शिक्षणाच्या सुविधा नाहीत, स्मशान भूमी नाही, एवढेच काय तर या समाजाला जन्माचा ठावठिकाणा नसल्याने त्यांना आधार कार्ड, रेशनकार्ड नसल्याने त्यांच्या भारतीयत्वाची ओळखंच नाही. पंतप्रधान आवास योजनेतून आधार कार्ड, रेशन कार्ड अपडेट होत नसल्याने हि मंडळी शासनाचे घरकूल योजने पासून वंचित राहणार असल्याने त्यांचे ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात यावेत, अनेक वर्षापासून सरकारी जागेत राहणाऱ्या या जमातीची अतिक्रमणीत घरे नियमित करावीत अशा व इतर मागण्यांसाठी वारंवार भारतीय दलित महासंघाचे नेते संजिव खिलारे यांच्या नेतृत्वाखाली निवेदने देण्यात आली आहेत. राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार वंचितांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक आहे. जिल्हाधिकारी सोलापूर व तहसीलदार मोहोळ यांनी या प्रकरणी तालुकास्तरावर समिती नेमून तात्काळ गावोगावी जाऊन तात्काळ सर्वे करण्याचे आदेश दिले असताना देखील स्थानिक स्तरावरील तालुका पुरवठा निरीक्षक, मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, स्वस्त धान्य दुकानदार यांची गठित केलेली समिती याप्रकरणी उदासीन आहे. अशा काम चुकार कर्मचारी, अधिकाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. या आंदोलनावेळी तहसिल कार्यालया समोरच आंदोलकांनी फाटक्या कपड्यातील पाले /राहुट्या टाकलेल्या होत्या. तेथेच चुली थाटल्या, काटक्या कुटक्या गोळा करून तेथेच स्वयपाक होवू लागला. डोंबारी बांधव ढोल, ताशा वाजवत दोरीवर चालत कसरती करीत होते. कसरतीचे खेळ लोकांना दाखवत होते तर मध्येच महामानवांच्या जयजयकाराच्या घोषणा ही होत होत्या. हा सर्व प्रकार मोहोळ तहसिल कार्यालया समोर पहिल्यांदाच सुरु होता. या आंदोलनात भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य संजीव खिलारे, रिपाईचे हणमंत कसबे, छगन अष्टूळ, प्रकाश पवार, उत्तम पवार, भाऊराव शिंदे, दत्तू शिंदे, दिलीप पवार, भाऊसाहेब जाधव, भाऊसाहेब पवार, सरपंच भाऊसाहेब शिंदे, रवी जाधव, संजय शिंदे, सचिन जाधव, ईश्वर चव्हाण यासह तालुक्यातील भारतीय दलित महासंघ भटक्या विमुक्त आघाडीचे शेकडो कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

# पोलीस असल्याची बतावणी; वृध्देच्या पाटल्या पळविल्या

### अज्ञात दोघाविरुध्द गुन्हा दाखल...

### मंगळवेढ्यात चोरीची मालिका संपता संपेना

तभा वृत्तसेवा
मंगळवेढा दि. २१ जुलै

मी पोलीस असून पोलीस ठाण्याकडून रोज संध्याकाळी पायी चालत जाणार्या लोकांवर नजर ठेवण्यासाठी माझी ड्युटी नेमली असल्याची खोटी बतावणी करुन मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवर एका ५९ वर्षीय महिलेस फसवून ५ लाख ५ हजार २०५ रुपये किंमतीच्या सोन्याच्या पाटल्या काढून नेल्या प्रकरणी अज्ञात दोघा विरुध्द मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी मंगल सिताराम गायकवाड (वय ५९) ही एका डॉक्टरची आई असून फिर्यादीच्या बहिणीची मुलगी रंजना दि.२० जुलै रोजी सायंकाळी ५.१५ वाजता या दोघी मंगळवेढा शहराजवळील सोलापूरकडे जाणार्या बायपास रोडवर फिरण्यासाठी गेल्या होत्या. या दरम्यान बनशंकरी कॉलनीकडून बायपासकडे येणार्या पानटपरी जवळ एक मोटर सायकलस्वार उभा होता. त्याने मी पोलीस आहे, मला पोलीसठाणेकडून रोज संध्याकाळी पायी चालत जाणार्या-येणार्या लोकावर नजर ठेवण्यासाठी ड्यूटी नेमली आहे. पुढे चोर्या होत असून तुम च्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून ठेवा त्या सुरक्षित राहतील असे म्हणाल्याचर फिर्यादीने घाबरुन हातातील पाच तोळ्याच्या सोन्याच्या पाटल्या काढून दिल्यानंतर सदर आरोपीने त्याच्या जवळील कागद समोर धरला व त्या पाटल्या गुंडाळून ठेवल्या. काही वेळाने ती कागदाची पुडी फिर्यादीकडे देण्यात आली. फिर्यादी हे घरी येत असताना अर्ध्या तासानंतर कागद उघडून बघितले असात सदर कागदामध्ये दोन सोन्याच्या पाटल्या ऐवजी तीन नकली पिवळ्या धातूच्या बांगड्या व छोटासा दगड दिसून आला. त्यानंतर फिर्यादीस खात्री झाली की अनोळखी इसमाने फसवणूक करुन पोलीस असल्याची खोटी बतावणी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान पान टपरीला घटनेच्या दिवशी सुट्टी असल्याम ळे पानटपरी बंद होती. पानटपरी जवळील बाकड्यावर सदर भामट्याने बसून येणार्या-जाणार्यांचे निरीक्षण करुन आपला डाव फत्ते केला असल्याची चर्चा आहे. सदर इसमाजवळ एक लाल रंगाची फॅशन मोटर सायकल,अंगात पांढरा शर्ट व खाकी पँट तसेच डोक्यावर काळ्या रंगाचे हेल्मेट,तो अंगाने मध्यम व रंगाने गोरा होता. दुसरा इसम अंगात पांढर्या रंगाचा हाफ शर्ट व पँट होती. मागील वर्षीही शहरातून पंढरपूरकडे जाणार्या रोडवर एका महिलेला मी पोलीस असून पुढे चोरटे आले आहेत. अशी खोटी बतावणी करुन तिचेही दागिने घेवून त्याने पोबारा केला होता. त्याचा तपास अद्याप लागला नसताना सदर चोरट्याने भर दिवसा एका वृध्द महिलेला फसवून सोने पळविल्यामुळे हा चोरटा शोधणे पोलीसांना एक आव्हान ठरले आहे. मंगळवेढ्यात चोरीची मालिका सुरु असून घरफोड्याही मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत. पोलीसांना चोरटे सापडत नसल्यामुळे चोरटे पोलीसांना शिरजोर होऊ पाहत असल्याने वारंवार अशा घटना घडत असल्याची खमंग चर्चा सुरु आहे. पोलीसांनी चोरटे जेरबंद केल्यास अशा घटनांना आळा बसेल अशा प्रतिक्रीया त्या घटनेवरुन व्यक्त होत आहेत.




# उचेठाण येथील चोरी प्रकरणात पुतण्याच निघाला चोर

### १ लाख २७ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलीसांनी केला हस्तगत

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा दि. २१ जुलै

उचेठाण येथील कुटुंबिय आदमापूर येथील बाळूमामाच्या दर्शनासाठी गेल्यावर घराचे कुलूप तोडून रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा १ लाख २७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना घडल्यानंतर एक २८ वर्षीय तरुण गावातून बेपत्ता असल्याने पोलीसांनी त्या तरुणास शोधून ताब्यात घेतल्यावर चोरीचा गुन्हा कबूल केला असून पोलीसांनी सर्व मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी,यातील फिर्यादी नामदेव पितांबर लोखंडे (वय५५ रा.उचेठाण) हे दि.२६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता आदमापूर येथे बाळूमामाच्या दर्शनासाठी गेले होते. दि.२७ रोजी सकाळी १० वाजता फिर्यादीची पत्नी लतिका लोखंडे ही जगताप वस्ती शाळेवर गेली होती. सायंकाळी ४ वाजता घरी आल्यावर घराचे कुलूप उघडे दिसले. देवदर्शन करुन फिर्यादी हे रात्री दहा वाजता घरी आले. दि.२८ रोजी माचणूर येथील श्री सिध्देश्वर यात्रा असल्याने कपाटात ठेवलेले पैसे घेण्यास गेल्यावर कपाटाचे लॉक तुटलेले दिसले. तद्नंतर फिर्यादी व फिर्यादीच्या पत्नीने सर्व कपाट चेक केले असता कपाटात ठेवलेले ९० हजार रुपये किंमतीचे १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस,२५ हजार रुपये किंमतीचे सोन्याची पिळ्याची अंगठी,१२ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख २७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्याने घराचे व कपाटाचे लॉक तोडून नेल्याची फिर्याद दाखल होती. पोलीसात गुन्हा दाखल झाल्यापासून फिर्यादीचा पुतण्या तथा आरोपी दिनेश अभिमान लोखंडे हा गावातून बेपत्ता असल्यामुळे त्याच्यावर संशय वाढत गेला. दि.१७ जुले रोजी मंगळवेढा परिसरातून त्याला ताब्यात घेवून कसून चौकशी केल्यावर त्याने चोरीचा गुन्हा कबूल करुन सर्व मुद्देमाल पोलीससमक्ष हजर केला. सदर आरोपीला अटक करण्यात आली. ही कामगिरी पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी अंकुश वाघमोडे,पोलीस हवालदार योगेश नवले, पोलीस अंमलदार महेश पोरे आदींनी केली. दरम्यान पोलीसांनी या चोरीचा तपास ज्या पध्दतीने लावला तसाच तपास अन्य झालेल्या घरफोड्यांचा लावावा अशी मागणी नागरिकामधून जोर धरीत आहे.



# नामदेव पायरीची पालकमंत्र्यांनी केली पाहणी

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२१ जुलै -

संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठशतकोत्तर अमृत महोत्सवी संजीवन समाधी सोहळा कार्यक्रम स्थळ, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, संत नामदेव पायरी मंदिरास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भेट देऊन पाहणी केली.



यावेळी आमदार समाधान आवताडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके,श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे, सचिव रुपेश खांडके, प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे यांच्यासह शिंपी समाज बांधव उपस्थित होते. संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री केशवराज संस्था पंढरपूर, संत नामदेव महाराज भक्त परिवार, नामदास महाराज परिवार, संत नामदेव शिंपी समाज यांच्यावतीने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे बुधवार दि.२३ व गुरुवार दि.२४ जुलै रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या नियोजित कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित राहणार असून त्यांच्या समवेत मंत्री महोदय, लोकप्रिनिधी, वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी तसेच मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन एल. आय. सी. कार्यालयासमोरील आरती मंडप, मनमाडकर हॉल येथे करण्यात येणार आहे.

# 'डिजिटल गव्हर्नन्स' ही गरज नाही तर आवश्यकता

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### आयटीडी आणि 'समग्र' संस्थेदरम्यान सामंजस्य करार

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. २१ जुलै-

महाराष्ट्राने डिजिटल रेग्युलेशन आणि प्रणालीमध्ये आघाडी घेतली असून डिजिटल गव्हर्नन्स ही गरज नाही तर आवश्यकता आहे. त्यामुळे सर्व शासकीय सेवा, शासकीय योजना ह्या ऑनलाईन प्रणाली माध्यमातून लोकांपर्यंत सहज पोहोचतील., असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.




त्यांच्या प्रमुख उपस्थित 'समग्र' ही संस्था व माहिती तंत्रज्ञान संचालनालय विभाग याच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती व तंत्रज्ञान मंत्री अॅड.आशिष शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंग चहल, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे व्यवस्थापकीय संचालक कान्हुराज बगाटे, विकास आयुक्त दिपेंद्रसिंग कुशवाह, 'समग्र'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल, मुख्य तंत्रज्ञ राहुल कुलकर्णी, व्यवस्थापक अनय गोगटे, संचालक अल्केश वाढवाणी उपस्थित होते. या ऑनलाईन प्रक्रियेत सर्व व्यक्तींनी सहभागी होणे आवश्यक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, व्हॉट्सअॅपसारख्या प्लॅटफॉर्मवर सर्व शासकीय सेवा आणल्या जात आहेत. कारण सर्वसामान्य व्यक्तींना व्हॉट्सअॅपचा वापर करणे सोपे ठरते आहे. या प्रक्रियेसाठी वेळापत्रक ठरवून काम करण्यात येईल तसेच यासाठी प्रत्येक विभागाकरिता उद्दिष्ट आणि कालमर्यादा देखील ठरविली जातील. त्यामुळे या सेवा लवकरात लवकर सामान्यांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. सर्व शासकीय सेवा ऑनलाईन देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम केल्याने शासकीय सेवा सक्षमपणे लोकांसमोर येतील आणि यामुळे विश्वसार्हता वाढेल, असे सांगून ,माहिती तंत्रज्ञान विभाग आणि समग्र या संस्थेसोबत झालेल्या करारामुळे होणाऱ्या मुलभूत परिवर्तनास मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

# वाटंबरे येथे कार व एसटीचा भीषण अपघात; दोघेजण जागीच ठार

तभा वृत्तसेवा,
सांगोला,दि.२१ जुलै-

रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरती वाटंबरे, ता.सांगोला येथे माणनदीच्या नजदीक तुळजापूर आगाराच्या तुळजापूर-कोल्हापूर एसटीचा व कारचा भीषण अपघात होऊन दोघेजण जागीच ठार झाल्याची घटना सोमवार दि.२१ जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली.



याबाबत अधिक माहिती अशी, तुळजापूर आगाराची एसटी तुळजापूरहून कोल्हापूरकडे जात असताना वाटंबरे माणनदीच्या नजदीक नाझरे या ठिकाणाहून सांगोलकडे जाणाऱ्या कारने डिव्हायडेड तोडून विरुद्ध बाजूने येत असलेल्या एसटीला धडक दिली. यावेळी कार मधील राहुल ऐवळे, मुळगाव आष्टा, जि.सांगली, सध्या रा.नाझरे, ता.सांगोला व संदेश हेगडे, रा.बनपुरी ता.आटपाडी या दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला. तसेच एसटी चालक मुकुंद गोरखपुरी हे गंभीर जखमी तर प्रवासी पूजाबाई वाघमारे व इतर प्रवासी जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग कर्मचारी व राष्ट्रीय महामार्ग पोलीस पीएसआय भिंगारदेव तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन या ठिकाणी जमा झालेल्या नागरिकांना हटवून वाहनांना रस्ता मोकळा करून दिला. वाटंबरे २२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### गोविंद शेंडे विहिंपच्या केंद्रीय सहमंत्रिपदी

**नागपूर** : विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीची बैठक नुकतीच जळगाव येथे झाली. या बैठकीत विहिंपच्या कार्यविस्तारासाठी दायित्व बदल आले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र- गोवा राज्याचे



क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे यांची केंद्रीय सह मंत्री तसेच नैतिक मूल्य शिक्षा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे आंतराष्ट्रीय अध्यक्ष ॲड. आलोक कुमार, महामंत्री बजरंगलाल बागडा, संघटन महामंत्री मिलिंद परांडे, सह संघटन महामंत्री विनायकराव देशपांडे, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे महासचिव, विहिंपचे उपाध्यक्ष चंपतराय यांच्या सहित देशभरातील २६५ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

### मस्करीमुळे पत्नीला गमवावा लागला जीव

**गुरुग्राम** : हरयाणातील गुरुग्राममध्ये पती-पत्नीमध्ये चालू असलेल्या मजा-मस्करीमुळे चौथ्या मजल्यावरून पडून पत्नीचा मृत्यू झाला. पत्नी छताच्या भिंतीवर चढली. मग तिने विनोदाने तिच्या पतीला विचारले, मी पडले तर तू मला वाचवशील का? पतीने तिला खाली येण्यासाठी मी जेवणार नाही शपथ दिली. हे ऐकून पत्नी खाली येऊ लागताच तिचा तोल गेला आणि ती चौथ्या मजल्यावरून खाली अडकली. पतीने तिला वाचवण्यासाठी तिला आपल्या हातात धरले. त्याने तिला वाचवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आणि दोन मिनिटे तिला आपल्या हातात धरले. शेवटी, ती पतीच्या हातातून निसटली आणि खाली पडली. तिला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिचा मृत्यू झाला.

### १.६९ कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त, एकाला अटक

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा बायपासजवळ एकाला १.६९ कोटी रुपयांच्या मेफेड्रोनसह अटक करण्यात आल्याची माहिती सोमवारी एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. एका विशिष्ट माहितीच्या आधारे १८ जुलै रोजी एका कारला अडवण्यात आल्यानंतर मोहनलाल गुंशजी जोशी ऊर्फ शर्मा याला अटक करण्यात आली. ही कारवाई गुन्हे शाखेच्या फेज १ च्या कर्मचाऱ्यांनी केली. शर्मा हा पालघर जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याच्याकडून १.६९ कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले. मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तस्करी रॅकेटची पुढील चौकशी सुरू आहे, असे ठाणे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी सांगितले.

### पहिला खाण पर्यटन उपक्रम झारखंडमध्ये सुरू

**रांची** : सरकारने देशातील पहिला खाण पर्यटन उपक्रम सुरू केला असून कोल इंडियाच्या शाखा सीसीएलशी करार करण्यात आला आहे, असे झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सोमवारी सांगितले. सोरेन यांनी नुकतीच बार्सिलोना येथील गावा म्युझियम ऑफ माइन्सला भेट देऊन प्राचीन खाण तंत्रे आणि नवपाषाण काळातील अवशेष पाहिल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. झारखंडमध्ये समृद्ध खनिज संसाधने आहेत आणि देशातील एकूण खनिजांपैकी सुमारे ४० टक्के खनिजे येथे आहेत. झारखंड पर्यटन विकास महामंडळाने खाण पर्यटन उपक्रमासाठी सेंट्रल कोलफिल्ड्स लिमिटेडसोबत सामंजस्य करार केला आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट झारखंडच्या समृद्ध खाण वारशाचे रूपांतर एका आकर्षक पर्यटन अनुभवात करणे आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.



### केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन यांचे निधन

**थिरुवनंतपुरम्** : भारतातील सर्वांत ज्येष्ठ साम्यवादी नेत्यांपैकी एक आणि केरळच्या राजकीय इतिहासातील एक म हत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असलेले केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन यांचे सोम वारी निधन झाले. ते १०१ वर्षांचे होते, अशी माहिती माकपाचे राज्य सचिव एम. व्ही. गोविंदन् यांनी येथे दिली. महिनाभरापूर्वी अच्युतानंद यांना हृदयविकाराचा झटका आले होता. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले, असे गोविंदनन् यांनी पत्रकारांना सांगितले. अच्युतानंदन हे भाकपाचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी नेहमीच कामगार हक्क, जम ीन सुधारणा आणि सामाजिक न्यायासाठी लढा दिला. ते २००६ ते २०११ या काळात केरळचे मुख्यमंत्री होते. सात वेळा विधानसभेवर निवडून आले आणि तीन वेळ विरोधी पक्षनेते म्हणून काम केले होते.

# गोंधळामुळे पहिला दिवस गेला वाया

## विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे लोकसभा, राज्यसभेत गदारोळ, कामकाज स्थगित




◆ **नवी दिल्ली, २१ जुलै**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ला, बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षण अभियान तसेच अन्य मुद्यावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ झाल्यामुळे आज कामकाज अनेकवेळा स्थगित करावे लागले.

लोकसभेचे कामकाज आज आज तीनवेळा स्थगित करावे लागले. लोकसभेचे कामकाज आज सुरु होताच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात तसेच अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारताच विरोधी सदस्यांनी बिर्ला यांच्या आसनाजवळ जात घोषणाबाजी सुरु केली. पहलगाम येथील दहशतवादी हल्ला, बिहारमधील मतदारयादी पुनरीक्षण अभियान तसेच भारत पाकिस्तान युध्दात मध्यस्थी केल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार केलेल्या दाव्यावर सभागृहात चर्चा करावी, अशी विरोधी पक्षांची मागणी होती. या मुद्यावरुन विरोधकांनी घोषणाबाजी करत सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणला. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास होऊ शकला नाही.

सभागृहात शांतता ठेवण्याचे आणि प्रश्नोत्तराचा तास होऊ देण्याचे आवाहन अध्यक्ष ओम बिर्ला करत होते. मात्र त्याला विरोधी सदस्यांकडून प्रतिसाद मिळत नव्हता. देशाच्या संरक्षणासंदर्भातील कोणत्याही विषयावर आणि विरोधक म्हणतील तेवढा वेळा चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे, असे आश्वासन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी दिले, पण विरोधी सदस्यांचे समाधान होत नव्हते.

गोंधळ थांबत नसल्यामुळे कामकाज सुरू झाल्यानंतर २० मिनिटातच दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आले. दुपारी १२ वाजता कामकाज सुरू होताच पुन्हा गोंधळ सुरु झाला, त्यामुळे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. दुपारी २ वाजता भोजनावकाशानंतर कामकाज सुरू होताच विरोधी सदस्यांनी वेलमध्ये येत पुन्हा घोषणाबाजी सुरु केली. पिठासीन अध्यक्ष संध्या राय यांनी कामकाज चालू देण्याचे, सर्व मुद्यावर सरकार चर्चेला तयार असल्याचे सांगितले. मात्र विरोधी सदस्य ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यामुळे दुपारी ४ वाजेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आले. दुपारी ४ वाजता कामकाज सुरू झाल्यावर पुन्हा गोंधळ सुरु झाला, त्यामुळे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)



गोंधळामुळे संसदेचे कामकाज स्थगित झाले. संसद भवन परिसरात हास्यविनोदात रंगलेले भाजपा नेते रविशंकर प्रसाद आणि उबाठाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी

### मला बोलू दिले जात नाही : राहुल गांधी

लोकसभेत मला बोलू दिले जात नाही, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज संसदभवन परिसरात केला. लोकसभेचे कामकाज स्थगित झाल्यानंतर संसदभवन परिसरात पत्रकारांशी बोलतांना राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांनी हा आरोप केला. हा आरोप तेव्हा पिठासीन अध्यक्ष असलेले भाजपाचे जगदंबिका पाल फेटाळला.

### राज्यसभेतही घोषणाबाजी, कामकाज स्थगित

पहलगाम येथील दहशतवादी हल्ला तसेच अन्य मुद्यावर तातडीच्या चर्चेची मागणी करत विरोधी सदस्यांनी आज राज्यसभेत जोरदार घोषणाबाजी केली, त्यामुळे सभागृहाचे कामकाज वारंवार स्थगित करावे लागले.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यावर सरकारने चर्चा घ्यावी, अशी मागणी करत राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे म्हणाले की, या दहशतवादी हल्ल्यातील दहशतवादी अजूनपर्यंत पकडलेही गेले नाही, आणि मारलेही गेले नाही. हे सरकारचे मोठे अपयश आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ला हा गुप्तचर यंत्रणांचे अपयश असल्याची कबुली जम्मू काश्मीरच्या नायब राज्यपालांनी दिली होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले. भारत पाकिस्तान युध्द मी थांबवले असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ वेळा केला आहे, त्यामुळे यावर सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असे ते म्हणाले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करायला सरकार तयार नाही, असा संदेश देशातील जनतेपर्यंत जायला नको, याकडे लक्ष वेधत सत्तापक्षनेते जे.पी. नड्डा म्हणाले की, या आणि अन्य विषयांवर चर्चा करायला सरकार तयार आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज गडचिरोलीत विविध प्रकल्पांचे उद्घाटन

## लॉयड मेटल्स साकारणार महाराष्ट्रातील सर्वांत मोठा प्रकल्प

◆ **गडचिरोली, २१ जुलै**

गडचिरोली जिल्हा आता औद्योगिक विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असून, 'भारताचा स्टील हब' होण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवार २२ जुलै रोजी कोनसरी येथे विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन होणार आहे.



लॉयड्स मेटल ॲण्ड एनर्जी लिमिटेडच्या आवारात होणाऱ्या या कार्यक्रमात ४.७ एमटीपीए-क्षमतेच्या स्टील प्लांटचा पायाभरणी समारंभ होणार असून, हा प्रकल्प महाराष्ट्रातील सर्वांत मोठा औद्योगिक उपक्रम ठरणार आहे. यासोबतच कोनसरी येथे १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय, सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित शासकीय शाळा, हेडरी येथील आयर्न ओर ग्राईंडिंग युनिट, स्लरी पाईपलाईन, पेलेट प्लांट आणि सोमनपली येथील आधुनिक टाऊनशिप यासारख्या प्रकल्पांच्या पायाभरणी समारंभाचा समावेश आहे.

या कार्यक्रमास सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन्, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविशांत पंडा, उप महानिरीक्षक अंकित गोयल आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या प्रकल्पांमुळे गडचिरोली जिल्ह्याचा औद्योगिक, सामाजिक आणि शैक्षणिक चेहरामोहरा बदलणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. 'लोकांनी घडवलेले, लोकांसाठी असलेले गडचिरोली' आता खऱ्या अर्थाने विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होणार आहे. लॉयड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांनी या विविध प्रकल्पाच्या उभारणीसाठी खऱ्या अर्थाने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या स्वप्नातील गडचिरोली या प्रकल्पाच्या निमित्ताने साकार होईल, असे आता बोलले जात आहे. (तभा वृत्तसेवा)

## भामसंच्या ७० व्या स्थापना दिन महोत्सवाचा उद्या दिल्लीत सांगता समारंभ

◆ **नवी दिल्ली, २१ जुलै**

भारतीय मजदूर संघाला ७० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त वर्षभर आयोजित महोत्सवाचा सांगता समारंभ बुधवार २३ जुलैला राजधानी दिल्लीत होत असल्याचे भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरन्मय पंड्या यांनी आज सांगितले.

केशवकुंज येथे आयोजित पत्रपरिषदेत पंड्या म्हणाले की, इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित कार्यक्रमात रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशिष्ट अतिथी म्हणून केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मंडाविया यांची यावेळीउपस्थिती राहील. या कार्यक्रमाला भामसंचे देशभरातील प्रतिनिधी आणि कामगार क्षेत्रातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे.

भामसंच्या ७० व्या स्थापना दिन महोत्सवाचा शुभारंभ २३ जुलै २०२४ ला भोपाळ येथे झाला होता, याकडे लक्ष वेधत पंड्या म्हणाले की, भामसं ही फक्त कामगारांचे पगार, भत्ते आणि पदोन्नतीसाठी संघर्ष करणारी संघटना नाही, तर त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना जागवत सामाजिक उत्तरदायीत्वासाठीही लढत असते. स्वदेशी, पर्यावरण आणि सामाजिक समरसता या विषयांसाठी आधीपासून काम करणारी भामसं आता कुटुंबप्रबोधन आणि नागरिक कर्तव्यासाठी पण काम करणार आहे.

या कार्यक्रमात भामसंचे ज्येष्ठ कार्यकर्ते गीता गोखले( मुंबई), हंसुभाई दवे( राजकोट), वसंतराव पिंपळापुरे(नागपूर), अमरनाथ डोगरा (दिल्ली), सामा बलरेड्डी( हैदराबाद), सरदार कर्तारसिंह राठोड(पंजाब), हाजी अख्तर हुसेन( बुलंदशहर) आणि महेश पाठक (रेल्वे दिल्ली) यांच्यासह आणखी काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार केला जाणार असल्याचे पंड्या यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)



इस्त्रायली लष्कराचे गाझावर हल्ले सुरूच आहेत. या भागातील नागरिकांनी २४ तासांच्या आत निघून जाण्याचा इशारा इस्त्रायलने दिला. सोमवारच्या हल्ल्यात अनेक नागरिक जखमी झाले आहेत

## नाटोच्या बैठकीपूर्वी रशियाचा सहा तास बॉम्बवर्षाव

### ४२६ ड्रोन, २४ क्षेपणास्त्रे डागली

◆ **मॉस्को, २१ जुलै**

रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर प्रचंड बॉम्बवर्षाव केला. मागील काही महिन्यातील हा सर्वात मोठा हल्ला असल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, नाटो च्या सदस्य देशांची आभासी माध्यमातून बैठक होणे पूर्वनियोजित असताना हे हल्ले झाल्याने रशियाची मनोवृत्ती स्पष्ट झाल्याचे बोलले जात आहे.

नाटोच्या बैठकीत अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचा शस्त्रास्त्र करार आणि नाटोच्या सदस्य देशांकडून युक्रेनला सैन्य समर्थन देणे या दोन विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. दरम्यान, रशियाने कीव्ह येथे केलेल्या जोरदार हल्ल्यात अनेकजण मारले गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा हल्ला जवळपास सहा तासपर्यंत सुरू होता. या दरम्यान रशियाने ३२६ ड्रोनहल्ले केले तर २४ क्षेपणास्त्रे डागली. यापैकी २०० ड्रोन इंटरसेप्ट करण्यात आले आणि २०३ ला जाम करण्यात आले. तसेच काहींना रडारवरून गायब करण्यात आले. हल्ल्याचे हे सत्र रात्री १२ वाजता सुरू झाले आणि सकाळी सहा वाजेपर्यंत सुरू होते. संपूर्ण कालावधीत कीव्हमध्ये बॉम्बचे आवाज, ड्रोनचा गडगडाट आणि मशीनगनच्या गोळीबाराचा आवाज घुमत होता. (वृत्तसंस्था)

## केरळमध्ये अडकलेले विमान झाले दुरुस्त

### आज उड्डाण करणार

### ब्रिटिशांचा जीव भांड्यात पडला

◆ **तिरुवनन्तपुरम्, २१ जुलै**

अमेरिकन बनावटीचे ब्रिटिशांच्या मालकीचे आणि भारतीय हवाई दलाने ट्रॅक केलेले स्टील्थ लढाऊ विमान एफ-३५ हे दुरुस्त झाले आहे. या महागड्या विमानाचे तंत्रज्ञान लीक होईल म्हणून ब्रिटिशांना एवढी धास्ती होती की त्यांनी ते विमान फुकटचे देऊ केलेल्या एअर इंडियाच्या हँगरमध्ये देखील नेले नव्हते. भारतीय हवाई दलाने हवी नको ती मदत केली होती. परंतू, हे विमान काही केल्या आपल्या पायांवर उडू शकत नव्हते. अखेर पाच आठवड्यांनी या विमानाची दुरुस्ती झाली असून मंगळवारी ते भारत सोडणार आहे.

ब्रिटिश रॉयल नेव्हीच्या विमानवाहू नौकेवर तैनात असलेले हे लढाऊ विमान तांत्रिक बिघाडामुळे केरळच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन परिस्थितीत उतरविण्यात आले होते. ब्रिटिशांनी या विमानासाठी भारतीय हवाई दलाकडे परवानगी मागितली होती. त्यांना वाटले होते की आपले विमान हे स्टील्थ म्हणजेच कोणत्याही रडारला पकडता येणार नाही असे आहे. यामुळे भारताला याची कल्पना नसेल. परंतू, भारतीय हवाई दलाने हे विमान आधीच ट्रॅक केलेले होते.

मदत म्हणून भारताने या विमानाला केरळच्या विमानतळावर उतरण्यास परवानगी दिली होती. उतरल्यानंतर इंधनही भरले होते. मात्र, या विमानाची हायड्रॉलिक सिस्टीम नादुरुस्त झाली होती. तिकडे समुद्रात ३०० नॉटीकल मैलांवर ब्रिटिशांची युद्धनौका विमानाची वाट पाहत उभी होती. भारताने विमान दुरुस्तीची ऑफरही दिली होती. पण, ब्रिटिशांनी ती नाकारली होती. अखेरीस हे विमान दुरुस्त होत नसल्याने ब्रिटनहून तज्ञांची टीम पाठविण्यात आली होती. जर दुरुस्त झालेच नाही तर विमान डिसमेंटल करून ब्रिटनला मालवाहू विमानात भरून नेण्यात येणार होते.

अखेरीस पाच आठवड्यांपासून एकाच जागी उभे असलेले हे लढाऊ विमान पुन्हा हवेत झेपावणार आहे. मंगळवारी या विमानाच्या उड्डाणासाठी परवानगी देण्यात आली आहे. आता हे विमान पुन्हा आपल्या युद्धनौकेवर परतणार की ब्रिटनकडे जाणार हे स्पष्ट झालेले नाही. (वृत्तसंस्था)

## यंदाचा गणेशोत्सव होणार निर्बंधमुक्त

### पुणे शहर पोलिस आयुक्तांची ग्वाही



◆ **पुणे, २१ जुलै**

गणेशोत्सवाला राज्य उत्सव म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर आता पुण्याच्या शहर पोलिस आयुक्तांनी एक मोठी घोषणा केली आहे. यंदाचा गणपती उत्सव हा राज्य उत्सव असा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी उत्सव अधिक वाढेल, त्याकरिता सर्व उपाययोजना सुरू झाल्या आहेत. तसेच त्याविषयी बैठका देखील आता सुरू होतील. कोणतेही एकतर्फी निर्बंध लादले जाणार नाहीत. मागील वर्षीच्या परवानग्या ग्राह्य धरल्या जातील, असे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.



महाराष्ट्रात ३० वर्षांपासून वेगवेगळ्या शहरात उत्सवात बंदोबस्त केला. मागील वर्षी पहिल्यांदाच पुण्यात नियोजन केले. पुण्याच्या उत्सवाचे स्वरूप विशाल आहे. सामान्य नागरिक यामध्ये सहभाग घेतात. त्यामुळे यंदाचा बंदोबस्त हा सोयी-सुविधांनी युक्त असणार आहे. जो शांतता सुव्यवस्था बाधित करेल. यावर पोलिसांकडून कारवाई केली जाईल. प्रशासन उत्सवामध्ये अडथळा निर्माण करेल, असे होणार नाही. वाहतूक नियोजन चांगले करता येईल, असे पाहू. मेट्रोचा वापर गणेशभक्त मोठ्या प्रमाणात करतील. यामुळे विविध ठिकाणी गणेशाचे दर्शन सर्वांना घेता येणार आहे, असे अमितेश कुमार म्हणाले. (वृत्तसंस्था)

# ११ मिनिटांत ७ स्फोट; १८९ बळी, ८०० हून अधिक जखमी

मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोटप्रकरणी बॉम्बे उच्च न्यायालयाने सोमवारी सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. ११ जुलै २००६ रोजी अवघ्या ११ मिनिटांत सात स्फोट होऊन संपूर्ण मुंबई हादरली होती. या भीषण दहशतवादी हल्ल्यात १८९ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला, तर ८०० हून अधिक जण जखमी झाले होते. १९९३ च्या बॉम्बस्फोटांनंतर हा मायानगरी मुंबईवर झालेला सर्वात मोठा दहशतवादी हल्ला मानला जातो.

**११ जुलै २००६ : दहशतीची संध्याकाळ**

११ जुलै २००६ रोजी संध्याकाळी ६:२४ वाजता मुंबईच्या वेस्टर्न रेल्वे मार्गावर पहिला स्फोट झाला. तेव्हा लोकल ट्रेनमध्ये कार्यालयातून घरी परतणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी होती. एकामागून एक माटुंगा रोड, वांद्रे, खार रोड, माहिम जंक्शन, जोगेश्वरी, भाईंदर आणि बोरिवली स्थानकांजवळ सात स्फोट झाले. प्रत्येक स्फोटामध्ये १ ते २ मिनिटांचे अंतर होते. संपूर्ण परिसरात आरडाओरड, गोंधळ, आणि मृतदेहांचा सडा पडला होता. सर्वात भीषण स्फोट माहिम स्थानकावर झाला, याठिकाणी सर्वाधिक मृत्यू झाले.

**गुजरातमधील हिंसाचाराचा बदला?**

अवघ्या ११ मिनिटांत झालेल्या या सात शक्तिशाली स्फोटांनी मायानगरी हादरून गेली होती. या स्फोटांनंतर मुंबईतील रेल्वे वाहतूक तात्काळ थांबवण्यात आली. त्यानंतर झालेल्या तपासणीत काही स्फोट न झालेले कुकर बॉम्ब मिळाले होते. या शक्तिशाली स्फोटांमुळे ट्रेनमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या शरीराचे तुकडे झाले होते. या स्फोटांनंतर मुंबईतील सर्वच सरकारी रुग्णालयांमध्ये मोठ्या संख्येने जखमींना आणले जात होते. बहुतांश बॉम्ब हे चर्चगेटवरुन सुटणाऱ्या लोकल गाड्यांमध्ये ठेवण्यात आले होते. गुजरातमध्ये झालेल्या हिंसाचाराचा सूड म्हणून मुंबईतील गुजराती नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी लष्कर-ए-तोयबाने हे स्फोट घडवून आणल्याची एक थिअरी तपासादरम्यान समोर आली होती.




### बॉम्बस्फोटासाठी प्रेशर कुकर बॉम्बचा वापर

या स्फोटांसाठी प्रेशर कुकरचा वापर करण्यात आला होता. हे सर्व बॉम्ब लोकल रेल्वेच्या प्रथम श्रेणी डब्यांमध्ये ठेवण्यात आले होते. बॉम्बस्फोटानंतर कोचचे तुकडे झाले होते. स्फोटासाठी चर्चगेटहून लांबच्या गाड्यांना लक्ष्य करण्यात आले. कारण या ट्रेनमध्ये घराकडे परतणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. या हल्ल्याची जबाबदारी दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाने घेतली होती.

### स्फोटात कोणत्या स्थानकावर किती मृत्यू झाले?

| | |
|---|---|
| चर्चगेट-बोरीवली लोकल: | ४३ मृत्यू |
| मीरा रोड-भाईंदर लोकल: | ३१ मृत्यू |
| चर्चगेट-विरार लोकल: | २८ मृत्यू |
| चर्चगेट-बोरीवली लोकल: | २८ मृत्यू |
| चर्चगेट-विरार (बोरीवली) लोकल: | २६ मृत्यू |
| चर्चगेट-बोरीवली (वांद्रे-खार रोड) लोकल: | २२ मृत्यू |
| चर्चगेट लोकल : | ०९ मृत्यू |



### बॉम्बस्फोटांची टाइमलाईन

| | |
|---|---|
| पहिला स्फोट | ६:२४ वाजता |
| दुसरा स्फोट | ६:२४ वाजता |
| तिसरा स्फोट | ६:२५ वाजता |
| चौथा स्फोट | ६:२६ वाजता |
| पाचवा स्फोट | ६:२९ वाजता |
| सहावा स्फोट | ६:३० वाजता |
| सातवा स्फोट | ६:३५ वाजता |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# संपादकीय

## अग्रलेख...

# गाजराची पुंगी

ज्योतिष हे शास्त्र आहे की ठोकताळ्यांचे थोतांड आहे यावर सर्वत्र बरीच चर्चा होत असते. अनेकदा छातीठोकपणे भाकिते वर्तविणारे अनेक जण तोंडघशी पडतात आणि कोणतेही भाकीत खरे ठरत नाही हेच यामागचे कारण असावे. अशा ठोकताळ्यांच्या पिकामुळे ज्योतिषावर प्रश्नचिन्हे निर्माण होत असूनही, छातीठोकपणे भाकिते वर्तविणाऱ्यांची संख्या राजकारणामुळे अधिकच फोफावली आहे असे म्हणता येईल. राजकारणातील अनेक उन्हाळे-पावसाळे, अनेक चढउतार पाहिल्यानंतर असे काही ठोकताळे वर्तविणे हा आपल्याला अनुभवाने बहाल केलेला अधिकार आहे, अशा समजुतीत अनेक जण भाकिते वर्तविल्याचा आव आणून स्वत:स राजकीय भविष्यवेत्ते म्हणवून घेतात. काही नेते मात्र, भाकिते वर्तवितानाही सावधगिरी बाळगत असतात. आपले भाकीत खरे ठरेल किंवा नाही याचीच त्यांना खात्री नसावी हे त्याचे कारण असावे. महाराष्ट्रात अशी भाकिते वर्तविणारे आणि भाकिते वदवून घेणारे काही नामांकित राजकीय नेते त्यांच्या छातीठोक ठोकताळ्यांमुळे बरेचसे बदनाम झाले असून त्यांचे कोणतेच भाकीत कधीच खरे ठरत नसल्याने त्यांच्या वक्तव्यांची विश्वासार्हतादेखील वादग्रस्त ठरली आहे. त्यामुळे, राजकारणातील कुडमुडे ज्योतिषी म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांचा क्रमांक बराच वरचा लागतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनाही भाकिते वर्तविण्याची सवय आहे, पण तसे करताना ते संजय राऊत यांच्याप्रमाणे छातीठोक विधाने करत नाहीत. उलट, भाकिते वर्तविण्यासाठी आपण कोणी ज्योतिषी नाही अशी कबुली देऊनच ते राजकीय घडामोडींची भाकिते वर्तवीत असल्याने, अनेक जण त्यांच्या भाकितांवर डोळे झाकून विश्वास ठेवतात आणि बरेचदा पवारांचे भाकीत चुकल्यानंतर आपली फसगत झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. पवार यांनी कोणतेही वक्तव्य जाहीरपणे केल्यास त्याच्या नेमके उलटे काही घडणार असल्याची ज्यांची अनुभवसिद्ध खात्री असते, ते मात्र, पवारांच्या भाकिताआड दडलेले भविष्य शोधण्याचा प्रयत्न करतात आणि आपले स्वत:चे ठोकताळे मांडून राजकारणातील भविष्याचा वेध घेतात, तेव्हा त्यापैकी बरेचसे भविष्य खरे ठरत असल्याच्या अनपेक्षित आनंदाचा अनुभव अनेक राजकीय विश्लेषकांनी घेतला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांचा दारुण पराभव झाल्यानंतर महाराष्ट्रात या पक्षांनी सत्तास्थापनेची संधी पूर्णपणे गमावल्याचे स्पट झाले होते. त्याच दरम्यान, शरद पवार यांनीही तशी कबुली दिली आणि नेहमीप्रमाणे पवार यांच्या वक्तव्यामागे दडलेल्या भविष्याचा वेध घेताना, महाविकास आघाडीच्या स्थापनेची चाहूल लागलेल्यांना, महाराष्ट्राच्या सत्तेचे पारडे फिरणार असल्याचा सुगावा लागला होता. त्यानंतर झालेल्या नाट्यपूर्ण सत्तांतराचा इतिहास आता संपूर्ण देशाला अवगत आहे. महाविकास आघाडी नावाचा एक अचंबित करणारा राजकीय नाट्यप्रयोग याच इतिहासामुळे जन्माला आला आणि त्याचे बरेचसे श्रेय शरद पवार यांना जाते, हेही आता महाराष्ट्रास ठावूक आहे. केवळ शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवून उद्धव ठाकरे यांना भाजपसोबतच्या युतीमधून बाहेर काढले आणि महाविकास आघाडीची सत्ता स्थापन केली हेही सर्व जण जाणतात. त्याआधी, आपण मुख्यमंत्री वगैरे होऊ हे आपल्या स्वप्नातही नव्हते, अशी कबुली देणारे उद्धव ठाकरे अनपेक्षितपणे सत्तेवर आले आणि संजय राऊत यांचा राजकीय कुडमुडे ज्योतिषी म्हणून उदय झाला, हेही अनेकांस ठावूक आहे. ठाकरे यांचा सत्तासूर्य कधीच मावळणार नाही, पुढील पंचवीस वर्षे राज्यात महाविकास आघाडीचीच सत्ता राहणार येथपासून, उद्धव ठाकरे देशाचे नेतृत्व करणार अशा लंब्याचौड्या भाकितांनी राऊत यांनी राजकारणाचा तो काळ अक्षरश: भारावून टाकला होता.

आपल्या मुखातून बाहेर पडणारी भाकिते ऐकण्याकरिता आणि ती जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता काही माध्यमेदेखील उत्सुक असतात हे लक्षात आल्यानंतर तर राऊत यांनी जणू भाकितांचा कारखानाच सुरू केला, पण एकामागून एक भाकिते भाकडच ठरल्यानंतरही त्यांची भाकिते मांडण्याची खुबी मात्र सातत्याने खुलत गेली. कोणते सरकार किती दिवस टिकणार, कोणास केव्हा डच्चू मिळणार, अशा भाकितांचा सातत्याने भडिमार करणाऱ्या राऊत यांच्या नव्या भाकितामध्ये मात्र गांभीर्याचा अंश दिसू लागल्याने त्याची दखल घेणे गरजेचे ठरते. अर्थात, या भाकितास, राजकारणात घडत असलेल्या इतर घडामोडींचा पुरेसा आधारदेखील दिसत असल्याने कुडमुड्या भाकिताचे वजन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुळात, भाजपशी सत्तेच्या राजकारणात दोन हात करून भाजपचा पराभव करणे हे कोणा एकाच विरोधी पक्षाच्या आवाक्यातील काम नाही हे लक्षात आल्याने महाविकास आघाडीच्या प्रयोगानंतर भाजपविरोधकांनी बांधलेली इंडिया आघाडी नावाची कडबोळ्यांची मोट फार काळ टिकणार नव्हती, हे कोणा भविष्यवेत्त्याने न वर्तवताही सहज समजणारे स्पष्ट भाकीत होते. महाविकास आघाडीचीही तीच अवस्था होणार याबाबतही अनेकांस शंका नव्हती. त्यामुळे महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडी नावाच्या गाजराच्या पुंग्या फार काळ वाजणार नाहीत आणि जेव्हा त्या पुरत्या मूक होऊन जातील तेव्हा मोडून खाण्याच्याही उपयोगाच्या राहणार नाहीत, हेही ठरलेले होते. कदाचित त्यामुळेच, लोकसभा निवडणुकीतील इंडिया आघाडीच्या राष्ट्रीय पराभवानंतर या आघाडीतील एकएका पक्षाने काढता पाय घेण्यास सुरुवात केली आणि त्याच्या स्थापनेसाठी पुढाकार घेणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षाची शकले होऊन एक गटच भाजपच्या वळचणीत दाखल झाला. त्यानंतरच्या घडामोडीही फारशा जुन्या नाहीत. महाविकास आघाडी पंचवीस वर्षे सत्तेवर राहणार असे छातीठोक भाकीत वर्तविणाऱ्या राऊत यांनी आता सूर बदलून महाविकास आघाडी गुंडाळण्याच्या भाकिताचे संकेत सुरू केले असून, त्यांच्या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही त्यास दुजोरा देणारे सूर आळविण्यास सुरुवात केल्याने, इंडिया व महाविकास या नावाच्या दोन आघाड्यांच्या गाजराच्या पुंग्या आता मूक झाल्यात जमा आहेत.

आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून काढता पाय घेतला आहेच, तर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी काँग्रेसने सुरू केल्याने उद्धव ठाकरे यांच्या गटाचे महाविकास आघाडीतील स्थान डळमळीत झाले आहे. अशा परिस्थितीत, या आघाडीसोबत राहण्यात आपल्यालाच स्वारस्य नाही असा सूर ठाकरे यांनी लावला असावा. महाविकास आघाडीत स्थान न मिळाल्यास राज ठाकरे यांच्या पक्षासोबत निवडणुका लढवाव्यात यासाठी उद्धव ठाकरे पराकोटीचे प्रयत्न करत आहेत. महाविकास आघाडीतील संवाद आता संपला असल्याने अशा परिस्थितीत आघाडीत राहण्यात अर्थ नाही अशा आशयाचे वक्तव्य करून ठाकरे यांनी आघाडीला सोडचिठ्ठीची सूचना दिली असली, तरी राज ठाकरे यांना सोबत घेण्याच्या प्रयत्नांस अद्याप पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ठाकरे गटाची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या घोर अपयशानंतर शरद पवार यांच्या राजकारणाने पुरेशी सावधगिरी बाळगणे पसंत केले आहे. पक्षातील अति निष्ठावंतांच्या एका तुकडीचे सत्तेच्या राजकारणातील पुनर्वसन अगोदरच पार पडले असून उरलेल्या गटासाठी सोयीस्कर राजकारणाचे सारे दरवाजे त्यांनी खुले ठेवले आहेत. त्यामुळे भविष्यात सत्तेच्या राजकारणातील शरद पवार यांचे जुने अनुभव आणि डावपेच पुन्हा कामाला येतील, अशी चर्चा आजच सुरू झाली आहे. तसे काही झालेच, तर उद्धव ठाकरे कोणासोबत असतील, त्यांच्या राजकारणाचे भविष्य काय असेल, याची उत्तरे त्यांनाच शोधावी लागतील. शरद पवार यांना समजून घेण्यास शंभर जन्मदेखील पुरणार नाहीत, असे एक भाकीत संजय राऊत यांनीच वर्तविले होते. ते खरे ठरत असल्याचा साक्षात्कार आता मात्र त्यांना होत असेल आणि त्यामुळे उद्धव ठाकरे यांनाही ते पटले असेल यात शंका नाही.

## अभीष्टचिंतन

# देवेंद्रजी नावाचे अत्तर...

**चंद्रशेखर बावनकुळे**

देवेंद्रजींचा सहवास अत्तरासारखा आहे. अत्तर हे नुसते सुगंधी द्रव्यच नाही तर, अत्तर म्हणजे भावना, परंपरा, आपुलकीचा आनंद वाटणारा एक अनमोल घटक. एक सकारात्मक ऊर्जा अत्तराचा सुगंध निर्माण करतो. माझ्यासाठी असेच आहेत देवेंद्रजी. महाराष्ट्राच्या राजकारणातला एक बलाढ्य, बुद्धिमान आणि लोककल्याणकारी नेता. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र आता वेगवान झाला. महाराष्ट्र आता थांबणार नाही.

महाराष्ट्रात विशेष जनसुरक्षा विधेयकाच्या विधिमंडळ संयुक्त चिकित्सा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. हे विधेयक समाजाच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च आहे. समितीचे कामकाज करताना मला, माझ्या २१ वर्षांच्या विधिमंडळ कामकाजातील एक वेगळा अनुभव ठरला. महाराष्ट्रातील सर्वांचेच या विधेयकाकडे लक्ष वेधून होते. कायद्याचा दुरुपयोग होणार नाही, ही दक्षता तर घ्यायचीच होती. त्याचवेळी भारतीय संविधानाचे रक्षण करायचे होते. कडवी डावी विचारसरणी असलेले व भारतीय संविधानाविरुद्ध चीड निर्माण करणारे लोक आपल्या समाजाची शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रवृत्तीविरुद्ध कायदेशीरदृष्ट्या दोन हात करण्याची तयारी सरकारने या निमित्ताने केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नक्षलवादाविरुद्ध ही लढाई सुरू झाली. मुख्यमंत्री फडणवीस गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्या भागात अनेकदा ते मुक्कामी असतात. त्यांनी नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सर्व प्रयत्न केले. त्याच प्रयत्नाची पुढची पायरी म्हणजे, विशेष जनसुरक्षा विधेयक. जंगलात असलेला क्रूर नक्षलवाद आता शहरात आला आहे. त्याचे स्वरूप पांढरपेशे असल्याने समाजासाठी ते अधिक काळजी करणारे आहे. समाजविघातक कारवाई करणाऱ्या ६४ संघटना महाराष्ट्रात आहेत. आणलेला कायदा हा भारतातील इतर राज्यांत अस्तित्वात असलेल्या कायद्यापेक्षा प्रोग्रेसिव्ह आहे. या महत्त्वाच्या कायद्याच्या निर्मिती प्रक्रियेत माझा महत्त्वाचा सहभाग होता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रोत्साहनामुळे हे शक्य झाले, याची पूर्ण जाणीव मला आहे. महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासातील महत्त्वाचे पान म्हणजे हे कामकाज आहे. या प्रोत्साहन प्रक्रियेतील बीजे २००४ मध्ये पहिल्यांदा आमदार झालो, तेव्हा पेरली गेली. मला आठवते, राजकारणात कार्यकर्ता व आंदोलनाचा अनुभव असूनही विधिमंडळाच्या कामकाजाचे बारकावे मला माहिती नव्हते. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी मला मार्गदर्शन केले. आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी सरकारी निधी कसा खेचून आणायचा यासाठी वेगवेगळी संसदीय आयुधे आणि जे कौशल्य लागते त्याबाबत ते मला वेळोवेळी सांगायचे. काहींशी जन्माचे ऋणानुबंध जुळतात, पक्की नाती तयार होतात. ही नाती रक्ताच्या नात्यापलीकडची असतात. देवेंद्र फडणवीस हे नाते याचपद्धतीचे. रक्ताच्या नात्यापलीकडचे.

देवेंद्र फडणवीस आणि माझा परिचय मागील ३५ वर्षांपासून आहे. मी अतिशय सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आलो आहे. भारतीय जनता पार्टीत मी कार्यकर्ता म्हणून काम करायला सुरुवात केली तेव्हा माझ्यातील कार्यकर्त्याला घडवले, मला संस्कारित केले आणि माझ्या कारकीर्दीला नवा आयाम देण्याचे काम केले ते ज्येष्ठ नेते नितीनजी गडकरी यांनी. नितीनजी आणि माझ्या वयात खूप अंतर होते; त्यामुळे मी कायमस्वरूपी त्यांना पितृस्थानी मानत आलो आहे. बापाचा एकप्रकारचा धाक असतो आणि त्याच्याशी अनेक गोष्टी बोलता येत नाहीत; त्या भावाशी मात्र सहजपणे करता येतात. राजकारणात माझ्या भावाची ही भूमिका जर कुणी पार पडली असेल तर ते आहेत देवेंद्र फडणवीस!



२०१४ मध्ये ते मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात मला ऊर्जामंत्री व उत्पादन शुल्क मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माझी ऊर्जामंत्री म्हणून पाच वर्षांची कारकीर्द त्यांच्या सोबतीनेच केवळ यशस्वी झाली, असे आता विचार करताना वाटते. त्या पाच वर्षांच्या काळात देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अनेक प्रशासकीय बारकावे मला शिकायला मिळाले. आता, त्यांच्याच विश्वासामुळे नागपूर व अमरावती जिल्ह्यांचा पालकमंत्री आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी त्यांचे भगीरथ प्रयत्न सुरू असल्याचे आपण बघत असतो. गेली तीन वर्षे मी भाजपचा प्रदेश अध्यक्ष होतो. अनेक मान्यवरांनी हे पद भूषविले होते. त्यामुळे थोडेफार दडपण होतेच. देवेंद्रजींनी हे दडपण घालविले. काही वर्षांपूर्वी त्यांनीसुद्धा प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी अतिशय दमदारपणे सांभाळली होती. त्यादरम्यानचा त्यांचा अनुभव यावेळी मला त्यांनी सांगितला. आता, राज्याचा महसूल मंत्री म्हणून काम करताना, त्यांच्या सर्वांगीण अभ्यासाची पदोपदी जाणीव होते. महसूल विभागात होत असलेल्या बदलावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छाप आहे. एप्रिल महिन्यात पुण्यात झालेल्या महसूल परिषदेनंतर वेगवान पद्धतीने हा विभाग कामी लागला.

मुळात, आर्थिक नियोजन आणि आर्थिक प्रगतीचे यश समाजाच्या शिडीच्या वरच्या बाजूला असलेल्या लोकांद्वारे मोजले जाणार नाही, तर समाजाच्या सर्वांत खालच्या पायरीवरील लोकांद्वारे मोजले जाईल. हा विचार महायुती सरकारचा आहे. सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत १९४७ चा तुकडेबंदी कायदा रद्द केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला. यामुळे १ जानेवारी २०२५ पूर्वीच्या १ हजार चौरस फुटांच्या जमिनींना कायदेशीर मान्यता मिळणार आहे. नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक सुलभतेने होण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर राज्यभर राबविले जात आहे. दोनशे रुपयांमध्ये संपूर्ण शेतीची हिस्से मोजणी व पाचशे रुपयांमध्ये वाटणी पत्र देण्याचा निर्णय विभागाने घेतला. यातून शेतकऱ्यांचा आर्थिक भार हलका होऊन त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महिला सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान, वारकऱ्यांसाठी विमा योजना व घरकुलासाठी मोफत वाळू हे निर्णय लोककेंद्रित आहेत. पुण्यात झालेली महसूल अदालत हजारो प्रलंबित प्रकरणांचा निकाल देणारी ठरली.

देवेंद्र फडणवीस यांना केवळ महाराष्ट्रच नाही तर देशाच्या राजकारणाची जाण आहे. त्यांनी अनेक राज्यांत निवडणुकीचे व्यवस्थापन केले आहे. संपूर्ण ३५ वर्षांच्या कालावधीत मला त्यांच्याकडून एक गोष्ट शिकता आली ती म्हणजे, लोकप्रतिनिधी म्हणून तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही अभ्यासू व चौकस असले पाहिजे. त्यांचे आरोग्यक्षेत्रातील कार्य खूप प्रभावी व अचाट आहे. तसे पाहता मुख्यमंत्री सहायता निधीची स्थापना १९६७ मध्ये झाली; पण २०१५ मध्ये देवेंद्रजींनी त्याला नवे परिमाण मिळवून दिले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचारासाठी आर्थिक साहाय्य देण्याचा या निधीचा उद्देश आहे. २०१५ मध्ये 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष' स्थापन करून या उपक्रमाला गती दिली.

अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल रोडच्या पाठोपाठ मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नवी मुंबई आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये एकूण ३५० किमीहून अधिक लांबीच्या मेट्रो प्रकल्पांचे जाळे विस्तारत आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा प्रकल्प पूर्ण होण्याच्या दिशेने आहे. मुंबई एअरपोर्ट इंफ्लुएंस नोटीफाईड एरिया म्हणजे, आठ लक्ष रोजगार निर्मिती औद्योगिक वसाहतीचा नैना प्रकल्प, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, आपले सरकार पोर्टल, महाराष्ट्रात ११ वर्षांत अनेक नवीन विमानतळे विकसित झाली. यात अमरावती, सिंधुदुर्ग, शिर्डी, नवी मुंबई अशा अनेक विमानतळांचा समावेश असून यामुळे पर्यटन, उद्योग आणि गुंतवणुकीला नवे गतिमान प्रवेशद्वार मिळाले आहे. कोल्हापूर, अमरावती, शिर्डी, सोलापूर, नांदेड विमानसेवा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी पंप आणि कृषी वाहिनी, निळवंडे, गोसीखुर्द आणि इतर धरणे निर्मिती, मुंबईतील धारावीकरांच्या स्वप्नातलं घर त्यांना मिळवून देण्याच्या उद्देशाने धारावी पुनर्विकास प्रकल्प तयार होतो आहे. येत्या सात वर्षांत ५० हजार घरे तयार केली जाणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतून राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागात ५० लाख कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकारणार आहेत. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला महिन्याला १५०० रुपये देण्यात येतात. आतापर्यंत राज्यातील २.५ कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळतो आहे. महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीसाठी लागणारी वीज मोफत केली आहे. आता शेतकऱ्यांना एक रुपया देखील वीजबिल भरावे लागणार नाही. शिवाय थकित वीजबिल देखील माफ करण्यात आले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांअंतर्गत राज्यातील एक कोटी पंधरा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार मिळतात. श्री चक्रधर स्वामींच्या नावाने रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन केले आणि श्रीचक्रधर स्वामी यांचा भाद्रपद शुक्ल द्वितीया हा दिवस 'अवतार दिन' साजरा करण्याचा शासनाचा ऐतिहासिक निर्णयही सरकारने घेतला.

नेतृत्व रात्रीतून घडत नाही. त्यासाठी ध्यास असावा लागतो. ते नगरसेवक म्हणून निवडून आले ते साल होते १९९२ ! खरंतर ही निवडणूक १९८९ मध्ये होणार होती. पण तेव्हा त्या निवडणुकीत त्यांचं वय भरत नव्हतं. मात्र त्यांच्या नशिबाने ती निवडणूकच पुढे गेली आणि ते नगरसेवक झाले. वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन करताना या माझ्या लोकनेत्याला दीर्घायुष्य मिळो आणि त्यांच्या हातून जनतेची सेवा घडो; त्यांची प्रगती हीच आमच्यासाठी आनंदाची कुपी आहे. मला आठवते, आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी नागपूरने महाराष्ट्राला दिलेली भेट, असे देवेंद्रजींचे वर्णन केले होते. ते यथार्थ आहे.

(महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

## वेध

# गुन्हेगारी थंडावणारे 'ऑपरेशन थंडर'

**हेमंत सालोडकर**

नागपूर शहर आणि ग्रामीण पोलिसांनी गुन्हेगारी आणि अमली पदार्थविरोधात 'ऑपरेशन थंडर' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत वेळेचे उल्लंघन करणारी प्रतिष्ठाने तसेच अवैध धंद्यात सक्रिय असणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून नागपूर शहर आणि जिल्ह्यात पोलिसांनी सुरू केलेल्या ऑपरेशन थंडर मोहिमेमुळे गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे.

कुठल्याही सभ्य समाजात गुन्हे, गुन्हेगारी आणि अवैध धंद्याला स्थान नसावे, अशी अपेक्षा असते. सुसंस्कृत आणि कायद्याच्या राज्यात तर अशा दुष्कृत्यांना कधीच थारा द्यायला नको. पण समाजात जशी चांगली माणसे असतात, तशीच काही समाजविघातकही असतात. त्यांच्यामुळे चांगल्या लोकांना जीवन जगणे कठीण होते. अशावेळी गुन्हेगारी विश्वातल्या लोकांना वठणीवर आणण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था उत्तम ठेवण्यासाठी पोलिसांना 'ऑपरेशन थंडर' मोहीम हाती घ्यावी लागते. गस्तीवर कधी कधी गुन्हेगारी लोकांची चौकशी करताना सज्जनांनाही पोलिसी खाक्या अनुभवावा लागतो. पण त्याकडे त्यांनी विधायक दृष्टीने, सहकार्याच्या भावनेने पाहिले तर पोलिसांना आणि समाजालाही मदत होईल. पूर्वी पोलिस चारचाकी, दुचाकीने गस्त घालायचे. त्यामुळे बरेचदा गुन्हेगारांचे फावत होते. पोलिसांचे वाहन आले की कुठेही लपता येत होते. पण आता 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत पोलिसांनी गनिमी कावा अवलंबिला आहे आणि पायदळ गस्त सुरू केली आहे. यामुळे गुन्हेगारांना पोलिस आल्याची माहिती होत नाही. यामुळे गुन्हेगारांचे रात्रीचे खेळ बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आले आहेत. पोलिसांना संशयास्पद वाटणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच त्यांना सोडण्यात येते. रहदारीच्या रस्त्यावर सर्व वाहनांची कसून झडती सुरू करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर गोधन तस्करी, सुगंधित तंबाखू, अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे बार, रेस्टॉरंट यांच्यावर मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. वेळेचे उल्लंघन कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण करतात. या मोहिमेंतर्गत शहर आणि ग्रामीण भागात धाडसत्र सुरू राहणार असून नियम मोडणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. रात्री उशिरा सुरू असलेली अनधिकृत आस्थापने आणि बेकायदेशीर मद्य विक्रीबाबत माहिती कळविण्याचे आवाहनही पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

'ऑपरेशन थंडर'अंतर्गत पोलिसांनी रेकॉर्डवरच्या गुन्हेगारांची चौकशी सुरू केली असून त्यांना संबंधित पोलिस स्टेशनला हजेरी लावण्यास सांगितले आहे. ते आले नाहीत तर पोलिस गुन्हेगाराच्या घरी जाऊन त्याची झाडाझडती घेतात. त्याची संपूर्ण चौकशी, त्याचा विद्यमान फोन नंबर याची खात्री केल्यानंतरच पोलिसांच्या तावडीतून सुटका होते. त्यामुळे आता गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे. जुने गुन्हेगार सुतासारखे सरळ होऊन पोलिसांचे खबरे म्हणून कामाला लागले आहेत.

शहरी भागात कारवाई सुरू असतानाच ग्रामीण भागात खापरखेडा, सावनेर येथे पोलिसांनी मोठ्या प्रमाणात देशी कट्टे जप्त केले आणि आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून अवैध साहित्य जप्त करण्यात आले. बाजारगाव येथे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा पकडला. गुन्हेगारी रोखण्यासाठी आरोपींवर थेट 'मोक्का' कायदा लावला जात आहे. पोलिसांनी गुन्हेगारांवर वचक निर्माण करतानाच समाजजागृतीही सुरू केली आहे. विशेष करून शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेण्यात आले. नागपूर शहरात नशेच्या विरोधात पावले उचलत, पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ नष्ट केले. या संपूर्ण उपक्रमामध्ये शहरातील महाविद्यालये व शाळांमधील विद्यार्थ्यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेल्या समाजाचे नुकसान व व्यसनाच्या आहारी गेलेल्या युवकांचे भवितव्य कसे उद्ध्वस्त होते, याचे विदारक चित्र विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवण्यात आले. नागपूर पोलिसांनी घेतलेला हा पुढाकार युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने निश्चितच एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पाऊल म्हणता येईल. नशेच्या विरोधात समाजाची सशक्त भूमिका उभारण्यासाठी अशी कडक आणि समाजप्रबोधनात्मक कारवाई गरजेची आहे, हे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. यासाठी नागपूर शहर आणि ग्रामीण पोलिस अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी ऑपरेशन थंडर ही मोहीम यापुढेही सुरू ठेवावी, ही अपेक्षा.

९८५०७५३२८१

## इतस्तत:

# कौशल्यांची पूर्वतयारी

**दत्तात्रेय आंबुलकर**

प्रशिक्षित आणि कौशल्यपूर्ण कर्मचारी ही प्रत्येक उद्योग-व्यवसायाची मूलभूत गरज. कर्मचाऱ्यांमध्ये आवश्यक कौशल्य निर्माण व्हावे, यासाठी प्रत्येक कंपनी व्यवस्थापन आपापल्या पद्धतीने सदैव प्रयत्न असते. यासाठी विशेष प्रशिक्षणासारखे उपक्रम प्रयत्नपूर्वक केले जातात. यामागे कर्मचाऱ्यांनी अधिक चांगले व परिणामकारक काम करावे, हीच भावना असते. माहिती-तंत्रज्ञान व संगणक सेवा क्षेत्रात तर सतत बदलते तंत्रज्ञान व कार्यपद्धती यावर आधारित कौशल्य विकासाला सातत्याने चालना देणे आवश्यक असते. या महत्त्वाच्या कामी भारतातीलच नव्हे, तर जागतिक स्तरावरील संगणकीय सेवा उद्योगातील कर्मचाऱ्यांमध्ये विशेष कौशल्य वृद्धी व्हावी व त्याचा काम या क्षेत्रातील देश-विदेशात काम करणाऱ्या कंपन्या व कर्मचाऱ्याना प्रकर्षाने व्हावा, यासाठी बंगळुरूमध्ये विशेष प्रकारची कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. विविध उद्योग व व्यवसाय करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये विशेष प्रयत्नपूर्वक कौशल्य विकास व्हावा, या कारणासाठी सुरू करण्यात आलेल्या कौशल्य विकास केंद्रांची उत्साहवर्धक छाप आता जागतिक पातळीवर कशी पडत आहे, त्याचीच ही यशोगाथा...

या संदर्भातील व्यवस्थापकीय पृष्ठभूमी म्हणजे, या जागतिक कौशल्य विकास केंद्रांची स्थापना विशेषतः संगणक सेवा व माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राला अद्ययावत स्वरूपातील प्रशिक्षित कर्मचारी या उद्योगांना उपलब्ध करून द्यावेत व त्याचवेळी माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विषयातील पात्रताधारक विद्यार्थी-उमेदवारांना त्यांच्या विषयाशी संबंधित क्षेत्रात रोजगारक्षम बनवावे, अशा दुहेरी उद्देशाने करण्यात आली. तुलनेने कमी वेळात या उद्देशांची पूर्तता होण्याचे चित्र निर्माण झाले आहे. या प्रासंगिक व उत्साहवर्धक प्रयत्नांच्या पहिल्याच टप्प्यात वॉलमार्ट ग्लोबल टेक, एसएपी लॅब्ज, थेल्स, इंट्यूट व बार्कलेज या संगणकीय सेवा क्षेत्रातील आघाडीच्या व प्रस्थापित कंपन्यांनी, कौशल्य विकास केंद्रांची सुरुवात केली व अल्पावधीतच त्याला जागतिक पातळीवर प्रस्थापित केले. या कौशल्य प्रशिक्षण केंद्रांचा व्यावसायिक उपयोग व महत्त्व लक्षात घेता, या नव्या पण महत्त्वाच्या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

अशा प्रकारे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अधिक प्रगत व आवश्यक स्वरूपातील कौशल्य विकास साधून त्याला संगणक सेवा उद्योगासाठी उपयुक्त व परिणामकारक बनविण्यासाठी संगणकीय कौशल्य विकास केंद्रातील प्रशिक्षणाला कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञानाचा अद्ययावत उपयोग, माहितीचे संकलन-प्रक्रिया व विश्लेषण, शिक्षण-प्रशिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, संगणकविषयक विशेष कार्यपद्धती व सुरक्षा इत्यादी विषयांची जोड देण्यात आली. परिणामी, या कौशल्य विकास प्रयत्नांना चांगली गती व प्रगती प्राप्त होऊ लागली. अशा प्रशिक्षित कौशल्यधारक उमेदवारांना देश-विदेशातून वाढीव मागणी सुरू झाली. यासंदर्भातील उल्लेखनीय बाब म्हणजे, या वर्षीच्या प्रारंभीच वॉलमार्ट ग्लोबल टेकतर्फे कृत्रिम बुद्धिमता प्रशिक्षण अकादमीची सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम प्रामुख्याने ऑनलाईन पद्धतीने अमलात आणण्यात येत आहे. या पद्धतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विषय आणि वापर या उभयतांवर सुरुवातीपासूनच भर दिला जात असून, त्याचा उपयोग वॉलमार्टला देश-विदेश पातळीवर होत आहे. एसएपी लॅब्ज इंडियाने घेतलेल्या पुढाकारानुसार त्यांच्या संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन व विकास व्यवसायाला पूरक पद्धतीने कौशल्य विकास केंद्राचा उपक्रम राबविला आहे. मुळात जर्मनीमध्ये मुख्यालय असणाऱ्या एसएपी लॅब्जने नव्या तंत्रज्ञानाला संशोधनाची जोड देऊन त्याच्या व्यावसायिक अंमलबजावणीवर भर दिला आहे. यासाठी कंपनीने कृत्रिम बुद्धिमतेला तंत्रज्ञानावर आधारित प्रत्यक्ष अनुभवाची जोड दिल्याने त्याचा नेमका फायदा नवीन उमेदवार-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून कंपनीला होत आहे. याचाच एक पुढचा व प्रगत टप्पा म्हणून कंपनीने कर्मचाऱ्याच्या कौशल्य विकासविषयक निकड आणि त्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय पावले उचलली आहेत. बार्कलेजसारखी कंपनी पण आता नव्या-जुन्या कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासावर प्राधान्याने काम करीत आहेत. संगणकीय क्षेत्रातील कर्मचारी विकास केंद्राच्या माध्यमातून भावना मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासाच्या माध्यमातून त्यांची उत्पादकता व परिणामकारक उपयुक्तता आता जागतिक स्तरावर वाढली आहे. भारत आणि भारतीयांची पात्रता क्षमता व उपयुक्तता वाढत्या कौशल्यांमुळे संगणक क्षेत्रात जागतिक स्तरावर सर्वमान्य झाली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## तरुण भारतातील स्वागतार्ह बदल

तरुण भारत या राष्ट्रवादी विचारांच्या दैनिकाला शंभर वर्षे पूर्ण होत असताना आपण दैनिकाच्या एकंदर रचनेत केलेला बदल खरोखरच लक्षणीय आणि स्वागतार्ह आहे. पाने वाढवून ग्रामीण भागातील बातम्यांचे मोठ्या प्रमाणात प्रकाशन करण्यात येत आहे ही गोष्ट चांगली आहे. तरुण भारतने सुरू केलेला बीज अंकुरे अंकुरे हा तर एकदमच अभिनव उपक्रम असून त्यात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग घेतला जात असल्याने पर्यावरण हा महत्त्वपूर्ण विषय तर लोकांपर्यंत पोहोचतोच आहे, त्यासोबतच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची जुनी परंपरा यायोगे पुनरुज्जीवित होण्यास सुद्धा मदत होईल असे वाटते.

मला सर्वांत जास्त आवडलेली गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे दररोज पहिल्या पानावर येणारे विचारपुष्प. संघविचार संपूर्ण राष्ट्रांत प्रसारित करून तो रुजविण्यासाठी ज्यांनी आपले पूर्ण आयुष्य घालवले अशा सर्व थोर प्रचारकांचे विचार या माध्यमातून देण्यात येतात. आजच्या अनेक स्वयंसेवकांना सुद्धा माहिती नसलेल्या जुन्या पिढीतील संघ कार्यकर्त्यांच्या विचारांची उजळणी या निमित्ताने पुन्हा एकदा होत आहे, ही आमच्यासारख्या स्वयंसेवकांना अतिशय आनंददायी व समाधानाची बाब आहे. आपले या उपक्रमासाठी मन:पूर्वक अभिनंदन आणि तरुण भारताच्या पुढील प्रगतिशील वाटचालीसाठी शुभेच्छा!

**नारायण गोविंदराव मेहरे**/नागपूर

## मार्गदर्शक गीता

सोमवार २१ जुलैच्या अंकातील 'विद्यार्थ्यांना मिळणार गीतेचे धडे' हा अग्रलेख वाचला. अतिशय महत्त्वाचा विचार यातून मांडला गेला आहे. उत्तराखंड पाठोपाठ हरयाणा सरकारने शाळेतील प्रार्थनेत भगवद्गीता श्लोक म्हणणे अनिवार्य केले आहे. खरोखरीच ही काळाची गरज आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर त्याच्या मनातील संभ्रम दूर व्हावा म्हणून उपदेश केला. वास्तविक तो उपदेश कालातीत आहे. काल, आज आणि उद्याही लागू पडणारा आहे. आज पाच हजार वर्षे झाली तरी त्याचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. कोणत्याही एका जात, धर्म, पंथ यासाठी ही गीता नाही तर समस्त मानवजातीसाठी मार्गदर्शन करणारी आणि त्यांचे कल्याण करणारी भगवद्गीता आहे. आज गीता भारतातच नाही तर संपूर्ण जगात अभ्यासिली जाते. गीतेतून अध्यात्म जीवनाचे महत्त्व तर कळतेच पण मनुष्य नैतिक मूल्यांनी परिपूर्ण होतो. शिक्षणाचा पाया जर मजबूत असेल तरच भविष्य उज्ज्वल राहील ही सुरुवात बालपणी मनावर रुजली पाहिजे. मानवी जीवनाचे सार गीतेत आहे. प्रत्येक प्रश्नाचे, समस्यांचे उत्तर त्यात आहे.

कर्म हा गीतेचा गाभा आहे. कर्म केल्याशिवाय काहीही साध्य होत नाही. चांगले-वाईट यांची ओळख होणे, संयम ठेवणे, विकारांपासून अलिप्त राहणे हा एक अभ्यास आहे. हे लक्षात आले तरच परिस्थितीनुसार वागणे शक्य आहे. कर्म करताना कर्तव्याची जाणीव ठेवणे आणि कर्तव्याचे पालन करताना मनाचे संतुलन राखून समतेचा अंगीकार कसा करावा हा उपदेश गीतेत आहे. भगवद्गीता म्हणजे अमृत आहे. आपल्या देशातील सर्वच राज्यांत, सरकारने सर्वच शाळांतून आवर्जून हा विचार करून तसे पाऊल उचलणे आवश्यक आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

## दीप अमावास्या उत्साहात साजरी करूया

दीप अमावास्या या दिवशी घरातील सर्व दिवे स्वच्छ करून त्याची पूजा केली जाते. दिवा हे ज्ञानाचे, वृद्धिंगतेचे प्रतीक. अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याच्या मार्गाचा मुख्य आधार म्हणजे दिवा. एका दिव्यापासून हजारो दिवे लावले जातात. दिवे आपल्या जीवनातील अंधार दूर करून आपल्याला प्रकाश देतात. अशा या दिव्याची पूजा म्हणजे दीपपूजा. काही लोक याला गटारी अमावास्या असे संबोधून हिंदू धर्माची अपकीर्ति करत आहेत. मुळात गटारी असा काही सण आपल्या धर्मात नाही. आषाढ अमावास्येच्या दुसऱ्या दिवसापासून श्रावण मास चालू होत असल्याने आणि हा पवित्र मास मानला जात असल्याने बरेच जण त्या काळात मांसाहार वर्ज्य करतात. काही जणांना पुढे महिनाभर, तर काही जणांना चातुर्मास संपेपर्यंत मांसाहर करायला मिळणार नसल्यामुळे या अमावास्येच्या दिवशी दारू आणि मांसाहर यांचे सेवन करतात. या कुप्रथेचे मोठ्या प्रमाणात उदात्तीकरण करण्यात येते. या चुकीच्या प्रथेच्या विरोधात जागृती व्हायला हवी. या सणाला दीप अमावास्याच म्हणावे, अगदी चेष्टेने सुद्धा गटारी म्हणू नये. कोणीही या दिवशी दारू प्यायला सांगत नाही, उलट दिव्यांची पूजा करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायला सांगतात. आजही या दिवशी महाराष्ट्रातील लाखो मराठी घरांत मनोभावे दीपपूजन करतात, नैवेद्य दाखवतात. खूप आनंददायी आणि मंगल अशी ही दीप-अमावास्या आपण सर्वांनी उत्साहात साजरी करूया आणि आपली संस्कृती जपूया.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर दिनाक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# महाराष्ट्र बँक, आयसीआयसीआय बँकांकडून २ कोटी रुपये सीएसआर निधी

## प्राप्त निधीतून नव्या घंटागाड्या घेणार : आयुक्त

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महाराष्ट्र बँक आणि आयसीआयसीआय बँकेकडून सीएसआर फंडातून सोलापूर महापालिकेला दोन कोटी रुपये मिळणार आहेत. या निधीतून नव्या २० घंटागाड्या किंवा आरसी वाहन घेण्यात येणार आहेत, अशी माहिती आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग असल्याचा तक्रारी नागरिकांकडून येतात. कचरा उचलण्यासाठी महापालिकेकडे घंटागाड्या कमी असल्याची अडचण दिसून येते. यामुळे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे बळकटीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर निधीतून ३८ नव्या घंटागाड्या घेण्यात येत आहे. त्यासाठी या दोन्ही बँकेकडून सीएसआर फंडातून महापालिकेला दोन कोटी रुपये मंजूर झाले आहेत. या निधीमुळे पालिकेतील घंटागाड्यांची संख्या वाढवण्यासाठी मदत झाली आहे. महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर आणि अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी यांच्या माध्यमातून सीएसआर फंड विभागाला गती मिळाली आहे. डॉ. जवळगेकर यांच्या पाठपुराव्यामुळे दोन्ही बँकेकडून सीएसआर फंडातून सोलापूर महापालिकेला दोन कोटी रुपये मिळणार आहेत. यापूर्वी एनटीपीसी कंपनीकडून महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयासाठी तीन कोटीचा सीएसआर निधी प्राप्त झाला आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.

## ▶▶ महत्वाचे...

### मथुरा येथील राष्ट्रीय संगोष्ठीमध्ये डॉ. वडगबाळकर यांचा सहभाग

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

भारतीय विद्या अध्ययन संस्थान दिल्ली यांच्यातर्फे भारतीय भाषांओं का भक्ती साहित्य या विषयावर २६,२७, २८ जुलै रोजी तीन दिवसांची राष्ट्रीय संगोष्ठी मथुरा- वृंदावन येथे घेण्यात येत आहे. आसामी, बंगाली, अवधी, बंगाली, ब्रज कन्नड ,मल्याळम, गुजराती, मणिपुरी मराठी ओडिया पंजाबी, सिंधी, तामिळ, तेलुगू अशा भाषेतील भक्ती साहित्यावर आधारित



ही संगोष्ठी आहे. भारतीय भाषेतील संत साहित्यावर व भक्ती परंपरेवर इथे विचार विमर्श होणार आहे. मराठी भाषेतील आयोजक व चर्चक म्हणून सोलापुरातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षा डॉ . श्रुती श्री वडगबाळकर यांना आमंत्रित केले आहे.. त्या समर्थ संप्रदाय मे संत रामदासजी का महत्वपूर्ण योगदान : एक चिंतन या विषयावर बोलणार आहेत. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.





### रेवणसिध्देश्वर महाराज उत्सव समिती अध्यक्षपदी जक्कापुरे

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

श्री रेवणसिद्धेश्वर महाराज पालखी व रथोत्सव उत्सवसमितीच्या अध्यक्षपदी श्रीशैल जक्कापुरे तर सचिवपदी सुरज कोरे यांची निवड करण्यात आली. यंदाही श्रावण महिन्यामध्ये निघणाऱ्या जगद्गुरु श्री रेवणसिद्धेश्वर महाराज पालखी रथोत्सव उत्सव समितीची बैठक माजी नगरसेवक उदय दादा चाकोते, रेवणसिद्धेश्वर समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष गंगाधर यादवाड, पालखी रथोस्तव प्रमुख गिरमलप्पा हिंगमिरे, राजशेखर दुलंगे यांच्या उपस्थितीत झाली. अन्य पदाधिकारी असे : कार्याध्यक्ष - शरण बिराजदार, सहकार्याध्यक्ष- श्रीशैल अंकद, सहसचिव- अमोल तांडूरे, उपाध्यक्ष -बसवराज आवटी, सुरेश धनश्री, मंथन चिडगुंपी, ऋतुराज वाघमोडे, खजिनदार- संकेत अल्लोळी, शुभम वडतीले, मिरवणूक प्रमुख- अभिजित तांडूरे, ऋषभ चारी, मल्लिकार्जुन करजगी, वरद होमकर, पूजा प्रमुख- योगीनाथ हुबळीमठ, प्रसिद्धी प्रमुख- शशांक दुलंगे, ओंकार हवले, प्रशांत राऊर.

### पाच टक्के निधी न मिळाल्याने दिव्यांगांचे आंदोलन

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबी दारफळ येथील ग्रामपंचायतीने दिव्यांगाना पाच टक्के निधी न दिल्याने प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संघटनेकडून आंदोलन करण्यात आले. यावेळी दिव्यांगांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्यालयासमोर ठिया आंदोलन केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी भेट देऊन दिव्यांगांशी चर्चा केली. उत्तर तालुक्यातील ग्रामपंचायतीकडून दिव्यांगाना राखीव निधी मिळत नसल्याने दिव्यांगांचे हाल होत आहेत , म्हणून त्यांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्षा संजीवनीताई बारंगुळे व उत्तर सोलापूर तालुका अध्यक्षा सविता डोंगरे यांनी दिली आहे. यावेळी पूनम गेटसमोर घोषणा देऊन मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी सज्जन ननवरे, वैष्णवी ननवरे, जगनाथ पवार, सुप्रिया इनामदार आदी उपस्थित होते.

### संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा आज

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

संत शिरोमणी नामदेव महाराज ६७५ संजीवन समाधी सोहळा मंगळवारी २२ जुलै रोजी होईल. मारुती पांडुरंग देवस्थान ट्रस्ट सोमवार पेठ मंदीरात सकाळी श्री अभिषेक महापूजा होणार आहे. शनिवार पेठेत श्री. संत नामदेव शिंपी युवक मंडळाच्या संत नामदेव प्रतिमा पूजनानंतर मंदिरात ह.भ.प. भगवाना महाराज पाटील यांचे श्री. संत नामदेव महाराज जन्म ते समाधी सोहळापर गुलालाचे सुश्राव्य किर्तन दोड्डी ग्रामस्थ भजनी मंडळ साथ संगतीने होईल. दुपारी श्रींची पालखी दिंडी मिरवणूक मंदिरातून पारंपारिक मार्गाने निघेल. तसेच विविध क्षेत्रातील समाजसेवक आणि १०,१२ व पदवीधर विद्यार्थ्यांचा सत्कार होईल.

## आगामी निवडणुकांबाबत राष्ट्रवादी काँग्रेसची पक्षांतर्गत रणनिती

# पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवूनच उमेदवार निवडणार

### स्थानिक पदाधिकाऱ्यांना प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिला शब्द

### राज्यभर महायुती अभेद्य ठेवण्याचे केले आवाहन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत आम्ही राज्यातील सर्व शहर-जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवूनच उमेदवार निवडणार असल्याचा शब्द राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आज (दि. २१) स्थानिक शहर पदाधिकाऱ्यांना दिला. दरम्यान, महायुतीही अभेद्य ठेवण्याचेही तटकरे यांनी यावेळी आवाहन केले.

आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पक्ष संघटन वाढीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत येथील हुतात्मा स्मृती मंदिरात शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रदेशाध्यक्ष तटकरे बोलत होते. यावेळी विचारमंचावर महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा राष्ट्रवादीच्या महिला राज्य अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी आमदार राजन पाटील, संजयमामा शिंदे, यशवंत माने, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जेष्ठ नेते चंद्रकांत दायमा, हेमंत चौधरी, आनंद चंदनशिवे, महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सायरा शेख, कार्याध्यक्ष चित्रा कदम, लतिफ तांबोळी, सुनील भगरे, कल्याण काळे, बसवराज बगले, युवक अध्यक्ष सुहास कदम, सेवादल विभाग अध्यक्ष प्रकाश जाधव,अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अमीर शेख, कार्याध्यक्ष संजीव मोरे, विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष तटकरे पुढे म्हणाले की, आम्ही एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतलेल्या क्षणापासून सोलापूरचे आमचे पदाधिकारी आमच्या सोबत आहेत. सोलापूर शहरातील लोक विविध भाषिक असले तरी धर्मनिरपेक्ष असलेल्या आमच्या राष्ट्रवादीसोबतच आहेत. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने राज्यघटना बदलणार, गोरगरिबांचे आरक्षण जाणार असे चुकीचे काहूर उठविले आणि चांगले यश मिळविल्याचा आरोपही केला. मात्र एनडीएच्या वरिष्ठ नेत्यांनी एनडीएच्या नेत्यांचा राज्यघटनेबाबतचा चुकीचा चाललेला प्रचार तमाम जनतेच्या निदर्शनास आणून दिला. राज्यातही त्याच पध्दतीने तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांनी दुषित झालेले राजकारण निवळण्यासाठी प्रयत्न केला. इतकेच नाही तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली, शेतकऱ्यांना शेतातील वीजपंपाची वीजमाफी केली, तसेच इतरही काही शासकीय योजना तळागाळापर्यंत सक्षमपणे राबविल्या आणि यामुळेच लाडक्या बहिणींनी आणि तमाम जनतेनेही राज्यातील महायुतीकडे एकहाती सत्ता सोपविली. इतकेच नाहीतर विरोधकांकडे विरोधी पक्षनेता निवडण्यासाठी लागणारे बळही राहिले नसल्याची टिका तटकरे यांनी केली. लाडकी बहीण योजना निवडणुकानंतर बंद पडणार असाही अपप्रचार विरोधकांनी केला मात्र सध्याही २ कोटी ४० लाख महिलांना याचा लाभ होत आहे आणि भविष्यातही राहणार असल्याचा निर्वाळा खा. तटकरे यांनी दिला. दरम्यान, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी पक्षातील अंतर्गत मतभेद जाहीरपणे नमूद केले त्याचीही दखल खा. तटकरे यांनी गंभीरपणे घेणार असल्याचे सांगून आगामी निवडणुकांत तिकीट वाटपासाठी एक समन्वय समितीही स्थापन करणार असल्याचे शेवटी सांगितले.

### मुंबईहून थेट निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षात 'मतभेद' सुरू

गेल्या १७ वर्षांपासून मी (संतोष पवार) आणि पक्षाचे कार्याध्यक्ष जुबेर बागवान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम प्रामाणिकपणे करीत आहोत. मात्र या २-३ वर्षात थेट मुंबईहून आपण निवडलेल्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षात मतभेद सुरू झाले आहेत. यामुळे कार्यकारिणीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते, विविध सेलचे अध्यक्ष विनाकारण डिस्टर्ब होत आहेत. यामुळे पक्षात मरगळ येत आहे. यामुळे भविष्यात मुंबईला एकटे येवून राष्ट्रवादीत प्रवेश करणाऱ्यांना पक्षात पदच देवू नये. पद दिले तर आमच्याही कानावर घालावे, इतकीच अपेक्षा!

**- संतोष पवार, राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष सोलापूर**

### निष्ठावंत पदाधिकाऱ्यांनाच देणार संधी

गेल्या ७ ते ८ वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आता लवकरच होणार आहेत. यावेळी पक्ष संघटनेचे प्रामाणिकपणे काम केलेल्या व्यक्तींनाच तिकीट दिले जाणार आहे. यासाठी ज्या-त्या जिल्ह्यातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले जाणार आहे. यासाठीच माझा दौरा असून, राज्याचा अहवाल पक्षश्रेष्ठींकडे मी देणार असून, यानंतर आगामी निवडणुकीसाठी पक्षश्रेष्ठी योग्य असेच उमेदवार निवडणार आहेत. एकंदरीत, जुन्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांना या निवडणुकांत ताकद देणार असल्याचेही प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी नमूद केले. यावेळी काही पक्षातील पुढाऱ्यांचा पक्षप्रवेशही झाला.

### ४०० किलो विविधरंगी फुलांचा घातला हार

राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्याकडून प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे सोलापुरात आल्यानंतर कार्यक्रम स्थळी जंगी स्वागत करण्यात आले. ४०० किलो विविधरंगी फुले आणि ५१ फुट उंचीचा हार घालून आणि केक कापून वाढदिवस साजरा केला.

# 'त्या' ९६ प्रकरणातील अनधिकृत बांधकामावर ठोस कार्यवाही सुरू

### अर्जदाराने केले फ्रंट मार्जिनमधील वॉचमन रूमचे बांधकाम निष्कासित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महानगरपालिका क्षेत्रातील नियोजित विकास आणि नियमबद्ध शहररचनेस चालना देण्यासाठी महानगरपालिका प्रशासन सातत्याने अनधिकृत बांधकामांविरुद्ध कारवाई करत आहे. अशाच प्रकारे, बांधकाम परवाना मंजूर यादीतील ९६ प्रकरणांपैकी अ.क्र.२८ मधील प्रकरणात ठोस कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधित अर्जदाराकडून फ्रंट मार्जिनमधील वॉचमन रूमचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.



या प्रकरणात, सर्वे नंबर २२०/१अ + १क, प्लॉट नंबर ७८, मार्कंडेय नगर, मजरेवाडी येथे असलेल्या बांधकामासाठी परवाना घेण्यात आलेला असताना, अर्जदाराने फ्रंट मार्जिनमध्ये वॉचमन रूमचे अनधिकृत बांधकाम करून सामासिक अंतराचे उल्लंघन केले होते. हे बांधकाम बांधकाम नियमानुसार असलेल्या अनिवार्य मोकळ्या जागेच्या अटींचे उल्लंघन करणारे होते. ही बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर, संबंधित विभागाकडून चौकशी करण्यात आली. यानंतर, दि. १५ जुलै २०२५ रोजी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अंतिम आदेश देऊन संबंधित अर्जदारास नियमबाह्य बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांच्या आदेशानुसार, अर्जदाराने स्वखर्चाने व स्वयंस्फूर्तीने फ्रंट मार्जिनमधील वॉचमन रूमचे बांधकाम निष्कासित करून घेतले असून, ही जागा आता मूळ स्थितीत आणण्यात आली आहे.शहरात शिस्तबद्ध आणि नियोजित विकासासाठी नागरिकांनी मंजूर नियमांचे पालन करावे, अन्यथा नियमभंग केल्यास महानगरपालिकेकडून कठोर पावले उचलली जातील, असा इशारा सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

# महापालिकेतील कनिष्ठ लिपिक राहुल नागमोती यांच्यावर निलंबनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**

महापालिकेतील मुख्य लेखापाल विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक राहूल रमेश नागमोती याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी तसे आदेश काढले आहेत.



कनिष्ठ श्रेणी लिपिक राहूल नागमोती हे आरोग्य विभागाकडे कार्यरत असताना त्यांच्याकडे महापालिकेच्या विविध विभागाकडील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वैद्यकिय प्रतिपुर्ती प्रकरणाच्या कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मालमत्ताकर विभागाकडील कनिष्ठ श्रेणी लिपिक रामसिंग पवार यांचे रक्कम ५ लाख १४ हजार १७३ रुपयांचे वैद्यकिय प्रतीपूर्तीचे बिल कनिष्ठ लिपिक राहूल नागमोती यांनी कोणत्याही सक्षम मान्यतेशिवाय अदा केल्याचे निर्दशनास आले तसेच त्यांची बदली मुख्यलेखापाल कार्यालया कडे झाल्यानंतर त्यांनी आरोग्य विभागा कडील त्यांच्याकडे असलेल्या कामकाजाच्या कागदपत्रांचा चार्ज दिलेला नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी आहे. राहूल नागमोती यांच्या या गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ नियम ३ (१) मधील (एक ते दोन) च्या तरतुदीचा भंग झालेला आहे. त्यास सर्वस्वी राहूल नागमोती हेच जबाबदार आहेत. लिपिक राहूल नागमोती यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित असून, शिस्तभंगाची कारवाईस बाधा येऊ नये म्हणून, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ४ (१) (अ) नुसार त्यांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि. २१ जुलै २०२५ च्या कार्यालयीन वेळेनंतर सेवेतून निलंबित करण्यात येत आहे, असे आदेशात म्हटले आहे.

# महापालिका क्रीडाधिकारी भूषण जाधव यांचा सहा महिन्यातच राजीनामा

### शालेय शहर क्रीडा स्पर्धा आता प्रभारीवर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धा तोंडावर आल्या असताना महापालिका क्रीडाधिकारी भूषण जाधव यांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे.



जानेवारी २०२५मध्ये रूजू झालेले श्री. जाधव हे राष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू व राज्य शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू होते. तसेच त्यांचे शिक्षण एमपीएड व एनआयएस झाले होते. सोलापूरला एक चांगला क्रीडाधिकारी मिळाल्याने सोलापूरच्या क्रीडा विकासास गती येईल, अशी भावना येथील क्रीडाप्रेमींमध्ये झाली होती. परंतु त्यांनी अचानक राजीनामा दिल्याने यंदाच्या शालेय क्रीडा स्पर्धा परत प्रभारी क्रीडाधिकारी यांच्या मदतीने होणार आहेत. नजीर शेख यांच्यानंतर महापालिकेने श्रीकांत घोलप व गोपाळ पिरगुळकर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिला होता. त्यानंतर ९ जानेवारी २०२५ रोजी भूषण जाधव हे रूजू झाले होते. त्यानंतर आता त्यांचा कार्यभार कुणाकडे द्यायचा आहे, यासाठी वरीष्ठ अधिकारी हे शोधात आहे.

### लवकरच प्रभारी क्रीडाधिकारी मिळेल

पालिका क्रीडाधिकारी भूषण जाधव यांनी स्वतःहून वैयक्तिक कारणासाठी राजीनामा दिला आहे. लवकरच प्रभारी क्रीडाधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल. त्यांच्या मार्गदर्शनखाली शालेय क्रीडा स्पर्धा सुरळीत पार पडतील.

**- रवि पवार, अतिरिक्त आयुक्त सोलापूर महानगरपालिका**

# ब्राह्मण समाज संघ-चाटी ट्रस्टच्या पुरस्कारांचे वितरण

### डॉ. इनामदार यांना जीवन गौरव तर डॉ. करंदीकर यांना समाजभूषण सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**

येथील ब्राह्मण समाज सेवा संघ व चाटी ट्रस्ट यांच्यावतीने डॉ. त्र्यंबक लक्ष्मण चाटी स्मृती जीवनगौरव पुरस्कार अकलूजचे डॉ. मनोहर इनामदार यांना तर समाजभूषण पुरस्कार कुर्डूवाडीचे डॉ. जयंत करंदीकर यांना माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात रविवारी सायंकाळी या पुरस्कारांचे वितरण झाले. व्यासपीठावर माजी आमदार श्री. परिचारक, डॉ. चाटी ट्रस्टच्या अध्यक्षा मेधा चाटी, डॉ. इनामदार, डॉ. करंदीकर, संघाचे अध्यक्ष दत्तराज कुलकर्णी, सचिव वामन कुलकर्णी, संचालक रामभाऊ तडवळकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात तडवळकर यांनी डॉ. चाटी ट्रस्ट व ब्राम्हण समाज सेवा संघाच्या कार्याचा आलेख मांडला. दरवर्षी ब्राह्मण समाजातील मान्यवरांना जीवनगौरव आणि समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी, मानपत्र आणि २१ हजार रुपये रोख असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप आहे. तर शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी, मानपत्र आणि ११ हजार रुपये रोख असे समाजभूषण पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी माजी आमदार परिचारक यांनी ब्राम्हण समाज संख्येने कमी असला तरी गुणवत्तेच्या बळावर सर्व क्षेत्रात आपले योगदान समाजाने दिल्याचे सांगितले. माझी बहुजनांचा डॉक्टर अशी ओळख बनल्याचे मत डॉ. मनोहर इनामदार यांनी व्यक्त केले. ४० वर्षापासून बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे कार्य करतो, असे मत डॉ. करंदीकर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन माधव देशपांडे यांनी मानले.

### यापूर्वी यांना मिळाले पुरस्कार

सांगोल्याच्या डॉ. संजीवनी केळकर, डॉ. मंजिरी चितळे, डॉ. प्रधान, डॉ. विजय कानेटकर, नेत्रतज्ञ डॉ. अलबाळ यांना देण्यात आला आहे. तर समाजभूषण पुरस्कार मूळचे सोलापूरचे आणि नाशिकमध्ये उद्योजक असलेले मुकुंदराव कुलकर्णी, संध्या कुलकर्णी, पी. एम. हर्षे यांना देण्यात आलेला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११८५

**पै. केशांचा गुंडाळा । ठेविली स्फटिकशिळा ।**
**ते वरी पाहिली डोळा । तंव भेदली गमली ।।**

वेगवेगळे विषय जाणून घेण्याची अर्जुनाची भूक वाढतच आहे. ही भूक भागविण्याचा उत्कृष्ट प्रयत्न भगवंताकडून होतांना दिसत आहे. अर्जुनाच्या अगोदर मार्गदर्शन करण्याची भूक श्रीकृष्णांनाच लागली आहे हे विशेष. परब्रम्ह म्हणजे नेमके काय ? या अर्जुनाच्या प्रश्नावर उत्तर देतांना भगवंत सांगत आहेत. या फुटक्या देहात दाट भरले असतानाही जे गळत नाही, त्याचा सुक्ष्मपणा शून्यच असल्याचे दिसते. तसेच जे अत्यंत सूक्ष्म असून सुध्दा झिरझिरीत असलेल्या प्रपंचरुप वस्त्राच्या गाळणीतून हलविले तरी गळत नाही, ते परब्रम्ह होय. जन्माचा विकार न जाणणा-या आणि कधीही नाश पावत नाही त्या ब्रम्हाचे जे अखंडत्व, त्या अखंडत्वास अध्यात्म म्हणतात. ब्रम्हांडात अनेक वेगवेगळया प्रकारचे जीव निर्माण होतात, नाश पावत असतात. याचे मुळ पाहू गेले तर शून्य दिसते. मूळ निमित्तकारण जो कर्ता, तोच दिसत नाही. उत्पादन करणारे कोणतेच, कांहीच दिसत नाही. कार्यच तेवढे स्वभावत: वाढू लागते. कर्त्यावाचून आणि कारणावाचून हा जो विश्वाकार व्यापार निर्माण होतो, त्याला कर्म म्हणतात.



अर्जुनाला भगवंतांनी परब्रम्ह, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ अशा अनेक बाबी आतापर्यन्त समजावून सांगीतल्या आहेत. मुळात हया सर्व एकातूनच निर्माण झाल्या आणि त्या सर्व एकातच विलिन होत असतात. त्यामुळे ते सर्व एकच आहे. पण केवळ अविदयेने, अज्ञानाने हे सर्व वेगवेगळे भासतात. अविदयेचा पडदा नसता तर ते एकच दिसले असते. कारण मुळात ते एकच आहे. मुळात हे कांही भिन्न कसे नाही. हे स्पष्ट करतांना भगवंत म्हणतात, पै. केशांचा गुंडाळा । ठेविली स्फटिकशिळा । ते वरी पाहिली डोळां । तंव भेदली गमली ।। अर्थात, केशाचा गुंडाळलेला झुपका आहे आणि त्यावर स्फटीकाची शिळा ठेवली तर ती बाहेरुन पाहता फुटलेली दिसते. पण जर ते केस त्या स्फटिक शिळेपासून दुर केले, तर शिळेचा भंगलेपणा दिसत नाही. अर्थात शिळा मुळचीच अखंड होती. मात्र केसाच्या संगतीने ती भंगलेली दिसत होती. केस बाजुला केल्यानंतर ती जशीच्या तशी असल्याचे दिसुन येते. अगदी याच प्रमाणे देहेंद्रियावरील अहंभाव गेला किंवा बाजुला केला तर जीवाचे ब्रम्हाशी ऐक्य अगोदरच असल्याचे दिसून येईल. कर्मजन्य सकाम यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ असल्याने, त्याने अहंभाव जातो आणि ज्ञानी ब्रम्हाशी एकरुप होतो. माणूस मी पणामुळे, अहंभावमुळे मुळ चैतन्यापासून स्वत:ला वेगळा समजतो, जगात भिन्नता पाहतो. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असे वेगवेगळे भेद केवळ अहंभावामुळे करतो. माणसाचा अहंभाव जर गेला तर ब्रम्ह हे माणसापासुन वेगळे नसल्याचे त्याला जाणीव होईल. सर्व जीव सृष्टी ही एकाच ब्रम्हाची उत्पत्ती असल्याने त्याच्यात भेद पाहण्याचे कांही कारण नाही. अर्थात, सर्वत्र समता दिसण्यासाठी प्रथम आपल्यातून अहंभाव, मीपणा काढून टाकला पाहिजे. हा अहंभाव, मीपणा आपणच निर्माण केला असल्याने त्याला आपणच काढुन टाकले पाहिजे. जेव्हा हा मीपणा निघुन जाईल तेव्हा सर्वत्र समता दिसुन आपणाला आणि आपल्याबरोबर इतरांनाही आनंद मिळू लागेल. समता ही काळाची आणि सर्वांची गरज आहे, हे ही याप्रसंगी लक्षात असावे.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष- भौमप्रदोष |
| दि. २२ जुलै २०२५ | संत नामदेव संजीवन |
| विक्रम संवत् २०८१ | समाधी सोहळा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वादशी (०७.०५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मृग (१९.२४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (१५.३५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१७.५१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क** : विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.

**सिंह** : प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कन्या** : व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर**: अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ** : प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन** : आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

# अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामामुळे विकासाला गती

## पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे; विशेष कामगिरी केल्याबद्दल अधिकाऱ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या सांघिक कार्यातूनच विविध योजना मार्गी लागतात. स्वच्छता मोहीम, कर वसुली, ऑनलाइन सेवाकार्य आणि माय सोलापूर अँपद्वारे तत्पर तक्रारींचा निपटारा करण्याचे संबंधित विभागाचे काम कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या चांगल्या कामामुळेच शहर विकासाला चालना मिळते, असे गौरवोद्गार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले

महापालिकेत विविध विभागातील कामकाजात विशेष कामगिरी बजावल्याबद्दल कर्मचारी व अधिकाऱ्यांचा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये सोलापूर शहरास राष्ट्रीय पातळीवर ६३ क्रमांकावरून २३ वा क्रमांक प्राप्त झाला असून राज्य पातळीवर १४ क्रमांकावरून ६ क्रमांकावर मानांकन प्राप्त झाले आहे. तसेच सोलापूर शहरास ओडीएफ++ ३ स्टार मानांकन प्राप्त झाले आहे. याबद्दल अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांना सन्मानित करण्यात आले.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या अवघ्या तीन महिन्यात ५७.७८ कोटींची वसुली केली आहे. विशेष म्हणजे ४८ कोटी रुपयांच्या उद्दिष्टापेक्षा जास्त विक्रमी वसुली करण्याची किमया कर विभागाने साधल्याबद्दल उपायुक्त आशिष लोकरे, विभागप्रमुख युवराज गाडेकर यांचा गौरव करण्यात आला. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेस यामधून आर्थिक वर्षाच्या पहिल्या टप्प्यातच उल्लेखनीय अशी १२ कोटींची वसुली केल्याबद्दल नगररचना उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांचा गौरव करण्यात आला. १४८ सेवांपैकी सध्या १२८ सेवा ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ७३ सेवा आपले सरकार पोर्टलवर लिंक देण्यात आले आहेत. या कामासाठी एजन्सीला सहा कोटीचा खर्च येत होता

**चांगल्या कामाच्या कौतुकामुळे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन : आयुक्त डॉ. ओम्बासे**

कामात कुचराई केल्यास कारवाई आणि चांगले काम केल्यास निश्चितच सन्मान आणि कौतुक करण्यात येते. चांगल्या कामाबद्दल केलेल्या या गौरवामुळे कर्मचारी- अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. चांगल्या कार्याबद्दल या कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र आणि त्यांच्या सेवा पुस्तकेमध्ये नोंदही करण्यात येत आहे.

मात्र त्या खर्चाची बचत संगणक विभागाने केल्याने या विभागाच्या प्रमुख स्नेहल चपळगावकर, मतीन सय्यद यांचा सन्मान करण्यात आला. तर 'माय सोलापूर अॅप'वर येणाऱ्या तक्रारींचा तत्काळ निपटारा केल्याने नागरिकांकडून फाइव स्टार रँकिंग मिळालेल्या विद्युत विभागाचे भाऊसाहेब गेजगे, प्रेमनाथ पवार, शेफाली दिलपाक यांना गौरविण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता सतीश एकबोटे, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी, नगर अभियंता सारिका अकुलवार, उपअभियंता नीलकंठ मठपती उपस्थित होते.

# अग्निहोत्र ही काळाची गरज : कोठे

### शिवहनुमान मंदिरात सामुहिक अग्निहोत्रचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

वातावरणाच्या शुध्दीसाठी अग्निहोत्र ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादनप मोनिका कोठे यांनी व्यक्त केले.

स्वरांजली न्यूज चॅनल ११ व्हा वर्धापन व विश्व पाउंडेशन शिवपुरी अक्कलकोट डॉ. राजीम वाले गुरुजींच्या वाढदिवसानिमित्त पूर्व भागातील शिवहनुमान मंदिर येथे शनिवारी सामुहिक अग्निहोत्र आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा हस्ते शिव हनुमान मंदिरात आरती करून दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या सामुहीक अग्निहोत्र कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात भाविकांचा सहभाग होता. यावेळी सिने सुट्टीतील कलाकार आरोही, विश्व पौंडेशनच्या सृष्टी डांगरे, स्वरांजलीचे संस्थापक दयानंद मामड्याल, शिव हनुमान देवस्थानचे अंबादास बिंगी, स्वरांजली गोशाळा संस्थेचे रमाकांत रावूरश्र, माजी नगरसेविका रामेश्वरी बिरू, कोमल मित्र मंडळ पदाधिकारी ,लंबोदर मित्र मंडळाचे पदाधिकारी, माधवी अंदे हेमा मुदगुडडी, कल्पना अरशनपल्ली, पल्लवी येदुर, लता गुंडाला, स्वरांजली चॅनलचे सुनील भालेराव, पुरोहीत मुकुंद मामडयाल, निवेदक गिरीश गोसगी, भावना गोसकी, राधिका जाधव उपस्थित होते.

## 'सिंहगड'च्या विद्यार्थिनीने मिळवले सात लाखांचे पॅकेज



**सोलापूर, दि. २१ जुलै-**

केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील २०२६ बॅचची संगणक विज्ञान विभागातील अंतिम वर्षाची विद्यार्थिनी वैभवी बेलमकर हिला नूवोसॉफ्टमध्ये सात लाख वीस हजाराच्या पॅकेज मिळवले आहे. एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध कंपन्यांनी घेतलेल्या कॅम्पस इंटरव्यूहमधून इच्छूक असणाऱ्या तब्बल १२० विद्यार्थ्यांची विविध नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. चालू शैक्षणिक वर्षामध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक प्लेसमेंट व उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य देणारे दर्जेदार इन्स्टिट्यूट म्हणून सोलापूरच्या सिंहगड इन्स्टिट्यूटने नावलौकिक मिळवलेला असल्याचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सांगितले. सर्वाधिक मोठे पॅकेज सीएसई (कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग) विभागाला मिळाले आहे. योगिता गाजूल या विद्यार्थिनीला ९ लाखांचे एचएसबीसी कंपनीचे पॅकेज मिळाले आहे. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर टी व्यवहारे, डॉ. रवींद्र बिरादार, प्रा. प्रदीप तापकीरे यांनी अभिनंदन केले.



## रस्ता सुरक्षा जागरूकता मोहीम आणि सुरक्षित रायडिंग शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

केगाव, सोलापूर येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) युनिटने केटीएम बाइक्स (बजाज ऑटो) आणि कियारा इव्हेंट्स यांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जागरूकता मोहीम आणि सुरक्षित रायडिंग शिबिराचे आयोजन केले होते.

हे शिबिर कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. माणिक शिंदे यांनी काम पाहिले. जवळपास २०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला.

तरुणांमध्ये रस्ता सुरक्षा शिक्षण आणि जबाबदार रायडिंग पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी, सुरक्षिततेबद्दल जागरूक समुदायाला चालना देण्यासाठी एनएसएस उपक्रमाचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित केला होता. सुरक्षित युवा, सुरक्षित रस्ते: स्मार्ट राईड करा, दीर्घकाळ जगा या स्लोगन द्वारे हा उपक्रम पार पडला. मोहिमेत विविध वैज्ञानिकदृष्ट्या डिझाइन केलेले मॉड्यूलसह रस्ता सुरक्षा सिद्धांत आणि सुरक्षित राईडिंग शिष्टाचारवर भर देण्यात आले. धोक्याचा अंदाज आणि जोखीम व्यवस्थापनावर प्रशिक्षण देण्यात आले. हेल्मेट वापर जागरूकता आणि रस्ता सुरक्षा प्रश्नमंजुषा सत्रही पार पडले.

**हेल्मेटचा वापर करावा**

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसह विद्यार्थीही हेल्मेटचा वापर करतात. सुरक्षित प्रवासासह हेल्मेट वापराचे महत्व समजावे म्हणून या शिबिराचे आयोजन केले होते.

**- डॉ. शंकर नवले, प्राचार्य, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय**

## विठ्ठलवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २१ जुलै-**

माढा तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे (कै.) हभप वसंत बापू तांबिले यांच्या कृपा आशीर्वादाने श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून शुक्रवार, दि. २५ जुलै ते १ऑगस्ट या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन हनुमान मंदिरात करण्यात आल्याचे संयोजक तथा तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अरुण मोरे यांनी सांगितले.


या सप्ताहात काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर असा दिनक्रम आहे. कीर्तन साथ हभप परमेश्वर कदम महाराज आहेत. या सोहळ्यात शुक्रवार, दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता काल्याचे कीर्तन हभप मधुसूदन महाराज ठाकूर बुवा दैठणकर यांचे होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे.



## मसाप दक्षिण शाखेच्या वतीने खा. अॅड. उज्वल निकम यांचे स्वागत

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

भारताचे राष्ट्रपती यांच्या कडून नियुक्त झालेले राज्यसभा सदस्य विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांचे सोलापूरमध्ये आगमन झाल्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेच्या वतीने कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी, सल्लागार अविनाश महागांवकर, रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष शहाजी पवार यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना कार्यक्रमासाठी निमंत्रण देण्यात आले. खासदार तथा अॅड. उज्वल निकम हे खासदार झाल्यानंतर प्रथमच सोलापूर दौर्यावर आले होते त्यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने स्वागत करण्यात आले आणि लवकरच त्यांच्यावर एक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे त्यासाठी त्यांना निमंत्रणाचे पत्रही यावेळी देण्यात आले. पत्र स्विकारून त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि कार्यक्रमाची तुम्ही तयारी करा मी तारीख लवकरच कळवतो असे सांगितले.



## रोटरी ई-क्लब इलाईटच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूर इलाईटचा नवीन कार्यकारिणी पदग्रहण सोहळा आयएमए हॉल, डफरीन चौक, सोलापूर येथे संपन्न झाला. रोटरी वर्ष २०२५-२६ साठी नवनियुक्त अध्यक्ष रोटेरियन इंजि. बालमुकुंद राठी आणि सचिव रोटेरियन रोशन भुतडा यांनी आपापल्या पदाची सूत्रे स्वीकारली. यासोबतच संचालक मंडळाची घोषणा देखील करण्यात आली. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून रोटेरियन स्वाती हेरकल उपस्थित होत्या. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अतिथी म्हणून रोटेरियन डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. नवीन अध्यक्ष रोटेरियन इंजि. बालमुकुंद राठी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सेवेच्या या प्रवासात नव्या जोमाने काम करत समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न राहील. सचिव रोटेरियन रोशन भुतडा यांनी क्लबची कार्यपद्धती अधिक सुसंगत आणि आधुनिक करण्यावर भर देण्याचे सूचित केले. यावेळी रोटरी वर्ष २०२५-२६ साठीचे संपूर्ण कार्यकारी मंडळ जाहीर करण्यात आले, ज्यात विविध अनुभवी व ऊर्जावान सदस्यांचा समावेश आहे.

# मंत्री शिरसाठ यांच्या बॅनरला जोडे मारो आंदोलन

### महात्मा बसवेश्वर यांचा केला होता एकेरी उल्लेख




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या वक्तव्याचा सोमवारी कौतम चौक येथील माहात्म्य बसवेश्वर यांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर संजय शिरसाठ यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार इद्रिस नाईकवाडी, यांनी पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास संदर्भात अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी नाईकवाडी यांच्या प्रश्नावर उत्तर देत असताना, महात्म्य बसवेश्वर यांचा एकेरीत उल्लेख केल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन केले. युवा नेते शरणराज केंडाळकर हे बोलताना म्हणाले, महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाच्या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी महात्मा बसवेश्वर यांचा एकेरी उल्लेख केला आहे. शिरसाठ आणि संपूर्ण लिंगायत समाजाची माफी मागावी अन्यथा यापेक्षा उग्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अरविंद पाटील, जिल्हा अध्यक्ष राजकुमार सारणे, महातेश पाटील, महेश इचगे, गणेश चिंचोळी, शिवा रामपुरे, महेश डिकोळे, अप्पु यलशेट्टी, सुनील चौडाळे, धर्मराज बगले, भागेश निंबरगी, धुढप्पा नायकोडी, धर्मराज केंगनाळकर, मल्लिनाथ पाटील, परमेश्वर अरबाळे, अभिषेक पवार, नागू बाके, रविकुमार शरणार्थी, शेखर कुंभार, कल्लपा हंगरगी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### संग्राम दोस्ती मंडळाच्या अध्यक्षपदी अतुल भैस

**पिलीव, दि. २१ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील मानाचा ५७ वर्षाचा गणपती यांच्या २०२५ च्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १६ जुलै रोजी मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीमध्ये या वर्षीच्या गणेशोत्सवासाठी पदाधिकाऱ्यांच्या निवडी सर्वानुमते करण्यात आल्या. यामध्ये मंडळाच्या अध्यक्षपदी अतुल भैस, कार्याध्यक्षपदी राज पठाण, उपाध्यक्षपदी मारुती शेंडगे व अनिकेत चोबे, खजिनदारपदी जिशान शेख, सचिव पदी शाकीब शेख, सहसचिवपदी अमोल सोनटक्के यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आली. यावेळी मंडळाचे माजी अध्यक्ष कदीरखान पठाण यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस चैतन्य पतसंस्थेचे चेअरमन तथा माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, विसर्जन मिरवणूक प्रमुख सचिन पुकळे,दामोदर लोखंडे, दिगंबर भैस, शशीकांत लोखंडे, रणजित काळे, सागर भैस, यासिन पठाण, सुरज कस्तुरे,अनंत जामदार, बाबा सय्यद, वैभव सुतार, वाहीद सय्यद, युवराज गायकवाड, दामोदर घायगुडे, प्रदीप चोबे, योगेश सुतार, संतोष खेत्रे, वसिम आतार, राहुल जामदार, बालाजी हजारे, सुरज मोरे उपस्थित होते.



### पिलीव परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**पिलीव, दि. २१ जुलै-**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त एक वृक्ष, एक भविष्य या उपक्रमाअंतर्गत पिलीव परिसरातील सर्वच गावामध्ये माजी आमदार राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये माळशिरस मंडलचे अध्यक्ष नितीन मोहीते, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, जिल्हा अध्यक्ष शिवराज पुकळे, उपाध्यक्ष राहुल मदने ,तालुका उपाध्यक्ष तुषार लवटे, पिलीवचे शहराध्यक्ष प्रमोद भैस, अतुल नष्टे, अंकुश भैस,कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, गणेश देशमुख, प्रवीण वाघमारे, पिंटु वाघमारे, सागर सातपुते, अॅड. सत्यजित गलांडे, मेजर गलांडे यांच्या उपस्थितीत पिलीव येथे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच पिलीव परीसरातील कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, कोळेगाव, फळवणी, तांदुळवाडी, शेंडेचिंच, धानोरे, मळोली, साळुमखवाडी, पठाणवस्ती, चांदापुरी, मगरवाडी, गारवाड या पिलीव मंडलातील सर्वच गावामध्ये भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते वृक्षारोपण कार्यक्रमासाठी उपस्थित होते.



### अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

आषाढी वारी ही महाराष्ट्र राज्याचे भूषण असून संस्कृतीक चळवळ आहे. पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थ व्रत ।। या संत उक्तीप्रमाणे प्रत्येक वारकरी हा आषाढी एकादशीला पंढरपूरला येत असतो. वारकरी हा कुठलीच व्यवस्था न पाहता वारी करतो. सर्व वारकरी निष्ठेने वारी करतात.पाऊस लवकर व जास्त प्रमाणात झाल्यामुळे या २०२५ च्या आषाढी वारीसाठी यंदा भाविकाची २७ लाख ही सर्वोच्च संख्या होती. ही संख्या इतकी मोठी असताना सुद्धा कुठलाही अनर्थ घडला नाही. कारण यंदा पंढरीमध्ये व्यवस्थापन अतिशय चांगले होते. पाणी पुरवठा, पोलीस प्रशासन, स्वच्छता, गर्दी वरील नियंत्रण, आरोग्य सेवा, टॉयलेट, हिरकणी कक्ष, वाळवंट स्वच्छता असे अनेक निर्णय योग्य वेळेत घेतले गेले म्हणून वारी यशस्वी करता आली. तसेच सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे हे तीन दिवस पंढरपूर मुक्कामी होते. एखादे पालकमंत्री मुक्कामी थांबून वारी नियोजन पाहणे ही पाहिलीच वेळ आहे. म्हणून भाविक वारकरी मंडळ यांचेवतीने पालकमंत्री गोरे यांचा राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांनी शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. याप्रसंगी मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष मनिष केत, वारकरी मंडळाचे शहर अध्यक्ष संजय पवार, सचिन भोसले, अनिकेत जांभळे, गुरुसिद्ध गायकवाड, अनिकेत भोसले उपस्थित होते.



### पंढरपूर-अरण वारीत तीन दिवस आरोग्य सेवा कार्यान्वित

**मोडनिंब, दि. २१ जुलै-**

अरण (ता. माढा) येथील संत सावता माळी यांच्या भेटीसाठी रविवारी पंढरपूरहून विठुरायाच्या पालखीचे प्रस्थान झाले.आरोग्य विभागाकडून या पालखी मार्गावर तीन दिवस आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सेवेमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आशुतोष सावरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वारीतील भाविकांच्या आरोग्याची काळजी घेतली. या भक्तिसोहळ्यात माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील पायी दिंडीमध्ये सहभागी झाले. डॉ. सावरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी चालत होते. दररोज ठिकठिकाणी तपासणी शिबिरे उभारून सेवा दिली गेली. वारीतील प्रत्येक वारकऱ्याचे आरोग्य हे आमचे कर्तव्य आहे, असे डॉ. सावरे यांनी सांगितले. वारीदरम्यान इतर कुठलीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास अॅम्बुलन्स सेवाही कार्यान्वित ठेवण्यात आली.

# मोहोळ नगरपरिषदेचा कारभार प्रभारीवर

## पूर्णवेळ मुख्याधिकारी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि २१ जुलै-**

मोहोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांची सोलापूर नगरपरिषद विभागात पदोन्नतीवर बदली होऊन एक महिना उलटला तरी अद्याप मोहोळ नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्याधिकारी मिळाला नाही. नागरिकांच्या कामात अडचणी येत असल्याने येत्या आठ दिवसांत मोहोळ नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्याधिकारी न दिल्यास रिकाम्या खुर्चीला हार घालून आंदोलन करण्याचा इशारा भाजपचे माजी तालुकाध्यक्ष दशरथ काळे यांनी दिला.





मोहोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. डोके यांची सोलापूर नगरपरिषद विभागात सहआयुक्त म्हणून पदोन्नतीवर बदली होऊन एक महिना उलटला, त्यांच्याकडेच मोहोळ नगरपरिषदेचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे. डॉ. डोके यांच्याकडे सोलापूर येथील सहआयुक्त पदाचा मोठा भार असल्याने म होळमधील नगरपरिषदेच्या कामकाजावर पूर्ण लक्ष देणे शक्य होत नाही. नगरपरिषदेत वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याने तेथील इतर अधिकारी व कर्मचारी सर्वसामान्य नागरिकांना प्रतिसाद देत नाहीत, त्यामुळे नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात होत आहे. मोहोळ शहरात नगरपरिषदेची कोट्यवधींची पाणीपुरवठा योजना, शौचालये बांधकाम कामे सुरू आहेत. मात्र त्या कामाबाबत नागरिकांच्या असलेल्या तक्रारी मांडण्यासाठी मुख्याधिकारीच उपलब्ध नसल्याने, नेमकी तक्रार कोणाकडे करावयाची असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.शहरातील नागरिकांची मागणी आहे की, नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्याधिकारी मि ळावा, जेणेकरून कामकाजात सुसूत्रता येईल आणि विकासकामांना गती मिळेल. पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्यास, त्याचा शहराच्या विकासकामावर, योजनांवर आणि इतर प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असून ४० ते ५० हजार लोकसंख्या असलेल्या मोहोळ शहराच्या नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या रिक्त जागी ८ दिवसांत पूर्णवेळ मुख्याधिकारी देण्यात यावा, अन्यथा मुख्याधिकारी यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून आंदोलन करण्याचा इशारा काळे यांनी दिला आहे.

# श्रावण अमावस्येनिमित्त गुरुवारी बेलाटीत विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील सद्गुरू संत बाळूमामा मंदिर येथे श्रावण मास आरंभ व अमावस्यानिमित्त विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील - बेलाटीकर यांनी दिली.



विजयपूर- पुणे राज्य महामार्गावरील बेलाटी येथील मंदिरात प्रति आदमापूरप्रमाणेच सर्व कार्यक्रम होणार आहेत. गुरुवार,२५ जुलै रोजी अमावस्या व श्रावण महिन्याचा आरंभ असल्याने या दिवशी सकाळी सहा वाजता काकड आरती, रुद्राभिषेक, महापूजा, सकाळी आठ वाजता मेंढी पूजन, सकाळी दहा वाजल्यापासून रक्तदान शिबिर, वृक्षारोपण अधिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त भजन व कीर्तन तसेच धनगर ओव्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रम एक महिनाभर श्रावण मासानिमित्त चालणार आहेत.

या ठिकाणी सद्गुरू संत बाळूमामा अन्नछत्र येथे दररोज महाप्रसादची व्यवस्था करण्यात येत आहे. सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष पाटील यांनी केले आहे.

# मोहोळ अपहरण प्रकरणी पाच जणांविरुध्द गुन्हा

## व्याजाच्या पैशावरून केली मारहाण व अपहरण

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२१ जुलै-**

भरमसाठ व्याज आकारून व्याजाचे हप्ते न दिल्याने एकाचे अपहरण करून त्याला मारहाण केल्याचा गुन्हा मोहोळ मध्ये घडला. याप्रकरणी येथील लखन कोळीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अरबाज अप्पू शेख (वय २४) हा एक गॅरेज व्यवसायिक आहे. तो मोहोळ शहरातील क्रांतीनगर भागामध्ये राहतो. कुरुल रोडवरील समाजसेवक म्हणावणाऱ्या लखन कोळी यांच्याकडून त्याने सप्टें २०२४ मध्ये महिना १० टक्के व्याजाने दीड लाख रुपयांची रक्कम घेतली होती. त्याचे ६ हप्ते लखन कोळी यांना ऑफिसमध्ये नेऊन दिले होते. भरमसाठ व्याज आकारणी लखन कोळी यांनी केली होती. त्याची तो वारंवार मागणी करत असे. भरमसाठ व्याज आकारून ९० हजार रुपयांचे ३ लाख रुपये मागू लागला. व्याजाचे हप्ते न दिल्याने लखन कोळी आणि त्याचे मित्र बंटी मोहोळ ,विक्रांत मांढरे, गोटू बरकडे, योगेश गायकवाड यांनी शेख याच्या गॅरेजवर जाऊन त्याचे अपहरण करून शिवीगाळ करून दमदाटी केली. कोळी यांच्या ऑफिसमध्ये त्याला डांबून ठेवण्यात आले होते. यामुळे शेख याने मोहोळ पोलीसात गुन्हा दाखल केला. यामध्ये तपास चालू आहे कारवाईनंतर अटकेबाबत कळवतो असे उत्तर तपास अधिकाऱ्यांनी दिले.

# चंद्रभागा वाळवंट परिसरात स्वच्छता मोहिम

## ●पंढरपूर शहर पोलीस व आर्ट ऑफ लिव्हींगचे साधक सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जुलै-**

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपूर शहरात लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. चंद्रभागा वाळवंट परिसरातही भाविकांची मोठी गर्दी होती. भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ असावा यासाठी पंढरपूर शहर पोलीस अधिकारी-कर्मचारी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे महिला व पुरुष साधक तसेच नगरपालिका, अधिकारी कर्मचारी यांच्याकडून चंद्रभागा वाळवंट परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

यात्रा कालावधीत वाळवंट परिसरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती. सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी याकरिता जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल



कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या सुचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ अर्जुन भोसले, तसेच पंढरपुर शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २० जुलै रोजी वाळवंट परिसरात आर्ट ऑफ लिव्हींग धाराशिव संस्थेचे नंदु भैय्या तांबडे तसेच पुरुष व महिला साधक त्याचबरोबर पंढरपुर नगरपालिकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित येवुन वाळवंट परिसरातील मोठ्या प्रमाणात कचरा गोळा करून स्वच्छता मोहिम राबविली.

# लिंबीचिंचोळीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## ●नरोळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजन; रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि.२० जुलै-**

लिंबीचिंचोळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे कै. बसवेश्वर नरोळे यांच्या २७ व्या पुण्यस्मरणा निमित्त नरोळे परिवारातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले होते.

कै. बसवेश्वर नरोळे यांच्या प्रतिमापूजनाने सुरुवात झाली. शिबीराचे उद्घाटन अक्कलकोटचे नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षपदी बाजार समितीचे संचालक सुरेश हसापुरे होते.

नरोळे मित्र परिवाराकडून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना शाल, पुष्पहार व रोख बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी



श्री. हसापुरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बाजार समितीचे संचालक श्रीशैल नरोळे, सुभाष पाटोळे, जि. प.चे माजी पक्षनेते अण्णाराव बाराचारी, युवा उद्योजक महेश बिराजदार, माजी उपसभापती हरीश पाटील, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, माजी उपसभापती अॅड. संजय गायकवाड, माजी सरपंच इरप्पा पाटील, पंडितराज कोरे, माजी मुख्याध्यापक शिवशरण प्याटी, माजी सरपंच मल्लिकार्जुन पनशेट्टी, ग्रा.पं. सदस्य मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, वीरपाक्ष घेरडे, दत्ता पाटील, निवृत्ती माने, नटराज नरोळे, अनिल बर्वे, पत्रकार कल्लय्या स्वामी, अल्ताफ पटेल आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक खोबरे यांनी केले.

# स्मार्ट मीटरविरोधात अखिल भारतीय किसान सभेचे आंदोलन

## ▸▸वीज ग्राहकांची आर्थिक लूट

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २१ जुलै-**

महावितरणकडून स्मार्ट मीटर सुरू करून वीज ग्राहकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट सुरु आहे. म्हणून स्मार्ट मीटर बंद करण्यात यावे, यासह इतर मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा दक्षिण सोलापूरच्या वतीने मंद्रुप येथील महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करून निवेदन देण्यात आले.

चालू स्मार्ट मिटर मिटर बदलून मिळावे, मंजूर अॅडिशनल डिपी त्वरित मिळावेत, अतिरिक्त वीजेचे भार असणाऱ्या शेतकऱ्यांना अॅडिशनल डीपी मंजूर करून मिळावे या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. ग्रामीण भागामध्ये पूर्वीचे घरगुती मीटर काढून त्याऐवजी स्मार्ट मीटर सक्तीचे बसवल्याने वीजबिल दुप्पट येत आहे. त्यामुळे वीजग्राहक मेटाकुटीला आला आहे. वीजबिल न भरल्याने वीजजोडणी



बंद करण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना अंधारात अंधारात राहण्याची वेळ आली आहे. म्हणून स्मार्टमीटर बंद करून मागण्या मान्य कराव्यात यावे, असे निवेदन देण्यात आला आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष जावेद आबटे, जिल्हा सचिव सुलेमान शेख, यासीन मकानदार, सिकंदर म कानदार, इक्बाल आवटे, हारूण मकानदार, श्रीशैल मुंजे, भीमाशंकर झळके, षडाक्षरी स्वामी, आनिल जोडमोटे, मल्लिकार्जून कांबळे, पैगंबर नदाफ आदी उपस्थित होते.

# कासेगाव ओढ्यावर नवीन पुलाची मागणी

**कासेगाव, दि.२१ जुलै-**

कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील ओढ्यावर पूर्वीचा पूल दुरुस्त करताना त्याची उंची वाढवलीच नाही. तो पुल पूर्वीपेक्षा खुजा झाल्याने धोका वाढला आहे. या चुकीने गेल्यावर्षी एका तरुणाला प्राण गमवावे लागले. त्यामुळे नविन पुलाची मागणी करण्यात येत आहे. सध्या पूलाची उंची कमी झाल्याने थोडा जरी पाऊस झाला तरी पुलावरून पाणी वाहते. त्यामुळे गावाचा संपर्कच तुटत आहे. हे गाव सोलापूर शहराजवळ आहे. मात्र विकासापासून कोसो दूर असल्याचे चित्र आहे.

# माजी सैनिक संघटनेकडून अन्नछत्र मंडळात स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जुलै-**

येथील माजी सैनिक संघटना संघटनेकडून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली.



यामध्ये माजी सैनिक संघटनेचे उपाध्यक्ष विठ्ठल फडतरे, खजिनदार रामचंद्र शिंदे, कार्याध्यक्ष बापूराव सुरवसे, चंद्रहार क्षीरसागर, विजय काकडे, सेनापती बजे, मुकुंद दूधभाते, नामदेव लवटे, संगप्पा तोळणूरे, मेजर श्रीकांत मोरे, अनिल हत्ते, बाबू तळवार, वैजयंत बिराजदार, नागनाथ लोकरे, परशुराम कडचे, कैलास वाडकर उपस्थित होते. माजी सैनिकांनी परिसराची स्वच्छता केली. माजी सैनिक श्रीकांत मोरे यांनी माहिती दिली व माजी सैनिकांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले.

# पंढरपुरातील शिवसेना उबाठा गटातील पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जुलै-**

पंढरपुरातील शिवसेना उबाठा गटाचे श्रीनिवास उपळकर व माजी नगरसेवक रामभाऊ भिंगारे यांनी आपल्या अनेक सहका-यांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे पक्ष प्रम ुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सर्व पदाधिकाऱ्यांचे पक्ष प्रवेश करण्यात आले.

यावेळी पंढरपूर येथील शिवसेना उबाठा गटाचे युवासेना शहर प्रमुख श्रीनिवास उपळकर व माजी नगरसेवक रामभाऊ भिंगारे यांचेसह औदुंबर गंगेकर (अध्यक्ष काशी कापडी समाज पंढरपूर),गणेश भिंगारे (समाजसेवक, खजिनदार काशी कापडी समाज, पंढरपूर), दत्तात्रय वाडेकर (उपाध्यक्ष- तुळशी माळा कारागीर कामगार संघ), विनायक पिंगळे (सहसचिव - तुळशी माळा कारागीर कामगार संघ), सागर उपळकर (सदस्य-तुळशी माळा कारागीर कामगार संघ), दिनेश लोंकलकर (सदस्य- तुळशी माळा कारागीर कामगार



संघ), रवींद्र टमटम (सदस्य- तुळशी माळा कारागीर कामगार संघ), गौरव वाडेकर (सदस्य- तुळशी माळा कारागीर कामगार संघ), पांडुरंग भिंगारे - (सदस्य- तुळशी माळा कारागीर कामगार संघ) (विशाल डोंगरे- युवा सेना- उपशहर प्रमुख), प्रथम भिंगारे (युवा सेना- शहर सचिव, पंढरपूर), हेमंत इंदापूरकर (युवा सेना विभाग प्रमुख), सोमनाथ शिंदे (युवा सेना- सोशल मीडिया प्रमुख), नमन कापसे (युवा सेना विभाग प्रमुख), प्रथमेश उपळकर (युवा सेना शाखा प्रमुख, जुनी पेठ) आदींनी शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला. शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षयमहाराज भोसले व शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेश झाला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सर्वसामान्य माणुस व त्यांची प्रश्न हे केंद्रबिंदू मानून काम करा, तळागाळातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य द्या आणि आपल्या पक्षांचं संघटन अधिकाधिक मजबुत करा.

### एकनाथ शिंदे यांना अनोखी भेट

यावेळी श्रीनिवास उपळकर यांनी आपल्या काशीकापडी समाजाच्या पिढीजात व्यवसाय असलेली व वारकरी सांप्रदायात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या तुळशीमाळा बनवल्या जाणाऱ्या यंत्राची प्रतिकृती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेट दिली. व काशीकापडी समाजातील प्रलंबित प्रश्न सोडवण्याची विनंती केली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांचा यथोचित सत्कार करत अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कुरणलक्ष्मी मंदिरास जनमेजयराजे भोसले यांची भेट

**अक्कलकोट, दि. २१ जुलै-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील पुरातन कुरण लक्ष्मी मंदिरास श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी सायबण्णा जाधव, समस्त गवळी समाज, कुरण लक्ष्मी यात्रा उत्सव समिती अध्यक्ष श्रीकांत झिपरे, प्रशिक्षक भुजबळ, गवळी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## महत्वाचे...



### ‘गोपाळपूर’च्या उपसरपंचपदी कमलाक्षी गुरव

**पंढरपूर, दि.२१ जुलै -**

तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण लेंगरे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदाची निवड प्रक्रिया सोमवारी (ता.२१) ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. उपसरपंचपदासाठी कमलाक्षी अतुल गुरव यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते तथा पांडुरंग कारखान्याचे संचालक दिलीप गुरव, भाजपा तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, तंटामुक्त अध्यक्ष शिवाजी आसबे, पोलीस पाटील विजय पाटील, सरपंच पुष्पाताई बनसोड, ग्रामपंचायत अधिकारी ज्योतीताई पाटील, माजी सरपंच विलास मस्के, सोसायटीचे चेअरमन गोविंद लेंगरे, माजी उपसरपंच विक्रम आसबे, उदय पवार, बाळासाहेब आसबे, माजी सरपंच उज्वलाताई बनसोडे, सविताताई आसबे, म नीषाताई आसबे, गोदाबाई सूर्यवंशी, सीमाताई म्हेत्रे, पांडुरंग देवमारे, इकबाल कांबळे, दीपक सूर्यवंशी, राहुल माने, सचिन आसबे, विठ्ठल लेंगरे, बबन शिरगिरे, रघुनाथ पवार, लक्ष्मण मस्के, प्रशांत जाधव, भूषण माने, प्रताप पाटील, माऊली गवळी, योगेश पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन भाजपा उपाध्यक्ष दत्तात्रय (गुंडू) गुरव यांनी केले तर आभार उद्धव गुरव यांनी मानले.



### श्रीराम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून जलसंवर्धन व कृषी योजनांविषयी मार्गदर्शन

**पिलीव, दि.२१ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे पाणीव येथील श्रीराम कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुळेवाडी येथील नागरिकांना जलसंवर्धन व त्याचे फायदे याविषयी अक्षय तांदुळकर यांनी मार्गदर्शन केले. तर कृषी सहहयाक कट्टे यांनी शासनाच्या कृषी विषयक विविध योजनांची माहिती नागरिकांना दिली. यावेळी कृषी सहहयाक अक्षय तांदुळकर, प्राध्यापक काकडे, प्रा. तरंगे, कृषी सहहयाक कट्टे, सरपंच शिवाजी दडस, पोलीस पाटील वंदना लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अजिंक्य शिनगारे, राज मोरे,रितेश कोकाटे, आदेश कडाळे, सार्थक कुलकर्णी, ऋषीकेश राऊत, नितीन गांडुळे, सत्यवान लोखंडे यांनी केले.

### सांगोला तालुक्यातील निजामपूरचे नाव मल्हारवाडी करा : केदार सावंत

**सांगोला, दि.२१ जुलै -**

सांगोला तालुक्यातील निजामपूर गावाचे नाव मल्हारवाडी करण्याची मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अनेक शहरे आणि गावांच्या नावात बदल करण्यात आला आहे. त्याच पद्धतीने रस्ते आणि रेल्वे स्थानकांची नावे देखील बदलण्यात आली आहेत. पण केंद्रात मोदी सरकार आणि राज्यात भाजपप्रणित महायुतीचे सरकार आल्यापासून नामांतराच्या प्रक्रियेला मोठा वेग आला आहे.



राज्यातील अहमदनगर (अहिल्यानगर), उस्मानाबाद (धाराशिव) आणि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्ह्यांची आणि शहरांची नावे बदण्यात आली आहेत. त्यातच आता सांगोला तालुक्यातील निजामपूर गावाचे नाव बदलून मल्हारवाडी करण्याची मागणी चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून निजाम पूर गावाचे नाव मल्हारवाडी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.



### विनोद वाणी यांच्या वाढदिवसानिमित्त १३९ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि. २१ जुलै**

शिवसेना उबाठाचे तालुका प्रमुख विनोद वाणी यांच्या वाढदिवसानिमित्त १३९ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून जेष्ठ शिवसैनिक नवनाथ चोबे, जेष्ठ शिवसैनिक सुरेश मोरे, शिवदूत पांडुरंग गपाट, शिवदूत राजाभाऊ पाटील, युवासेना राज्य सहसचिव उषा पवार, बंडू वाणी यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात १३९ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. शिबीर संपन्न करण्यासाठी राज्य विस्तारक हेमंत रामगुडे, युवा सेना सोलापूर जिल्हा सचिव दिपक तिवाडी, युवासेना बार्शी विधानसभा प्रमुख विशाल वाणी, शिवदूत गणेश खडके, बाळराजे जाधव, गणेश शिंदे, युवासेना समन्वयक पांडुरंग घोलप यांनी परिश्रम घेतले.

## बहुजन समाज पार्टीकडून तहसील कार्यालयावर मोर्चा

### मैंदर्गी येथील दलित समाज जागेबाबत प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २१ जुलै**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील दलित समाजातील लोकांचे कब्जेवहिवाटीत असलेल्या सिटी सर्वे नंबर ५११ या जागेत गावातील जंगम समाजाच्या लोकांची स्मशानभूमी असल्याचे हक्क सांगून लोकांना जाणीवपूर्वक त्रास देत असल्याबाबत संबंधित लोकांवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी बहुजन समाज पार्टी अक्कलकोट वतीने सोमवारी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. याबाबतचे निवेदन अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले.



अक्कलकोट शहरातील भीम नगर, मैंदर्गी रोड येथून या मोर्चाची सुरुवात करण्यात आली. राजे फत्तेसिंह चौक, जुना तहसील कार्यालय, कमलाराजे चौक येथून नवीन तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. तहसील कार्यालयाजवळ मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. यावेळी बहुजन समाज पार्टीचे प्रदेश सचिव ॲड. संजीव सदाफुले यांनी मार्गदर्शन केले. मैंदर्गी येथील सिटी सर्वे नंबर ५११ चे क्षेत्र ४ हजार ७८० चौरस मीटर इतके असून सदरची जागा ही गावठाणची आहे. सदर जागेत मातंग व महार समाजाची दहा ते बारा कुटुंबीयांची घरे आहेत. तसेच मोकळ्या जागेमध्ये मातंग समाजाचे पत्रा शेडचे सभागृह असून तेथे झेंडा व कट्टा आहे. सदर जागेत मातंग समाजाच्या वतीने महापुरुषांची जयंती तसेच इतर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. सदर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सभागृहाची मैंदर्गी नगर परिषदेकडे नोंद असून त्याचा टॅक्स समाजाच्या वतीने भरला जातो. तेथे केवळ दलित लोक वस्ती असून ती कब्जेवहिवाटीत आहे. सदर ठिकाणी जंगम समाजाची कोठेही स्मशानभूमी नाही. या ठिकाणी जंगम सम ाजातील काही लोक जंगम समाजास व इतर लोकांना भडकावून दलित बांधवांना या जागेतून हुसकावून लावण्याच्या उद्देशाने दमदाटी करत आहेत. त्यामुळे मातंग समाजात भीतीचे वातावरण पसरले आहे. वास्तविक पाहता जंगम समाजाचा सदर जागेची काही एक संबंध नाही. यासंबंधी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून दलित बांधवांवर अन्याय करत असून हे बहुजन समाज पार्टी खपवून घेणार नाही. याठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे सभागृह बांधण्यात यावे असे सांगितले. यावेळी जिल्हा अध्यक्ष बबलू गायकवाड यांनी मैंदर्गी येथील दलित बांधवांवरील अन्याय खपवून घेतला जाणार नाही. अन्यथा लोकशाही मार्गाने पुढचा मोर्चा हा आ. कल्याणशेट्टी यांच्या घरावर काढू असे सांगितले. याप्रसंगी बसपा प्रदेश सचिव आप्पासाहेब लोकरे, मुस्लिम भाईचारा प्रदेश संयोजक रशीद सरदार, कोषाध्यक्ष सुहास सुरवसे, अक्कलकोट विधानसभा अध्यक्ष विठ्ठल आरेनवरू आदींनी मार्गदर्शन केले.

अक्कलकोट तहसीलदार विनायक मगर यांना बसपा कडून निवेदन देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष धर्मा गायछोडे, महासचिव अशोक बनसोडे, दुधनी सेक्टर अध्यक्ष बसवराज जन्ना, सातलिंग निंबाळ, बसपा नेते सैदप्पा झळकी, मैंदर्गी उपाध्यक्ष संभाजी मातंग, शिवचलप्पा नाटीकर, बसवराज तुकाराम आरेनवरू, विश्वनाथ इटेनवरू, सुनिता नाटीकर, संजय नाटीकर , चन्नम्मा विठ्ठल अरेनवरू, सुनंदा अरेनवरू, आकाश आरेनवरू, इरफान पठाण, नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिलीप माने यांचा वाढदिवस विधायक उपक्रमाने साजरा करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै**

सहकारतपस्वी स्व. ब्रम्हदेवदादा माने व मार्गदर्शक दिलीपराव माने यांच्या संस्कारातून वाढलेले आपण कार्यकर्ते असून आपल्या नेत्याचा वाढदिवस हा विधायक उपक्रमाने गावोगावी व शहरात साजरा करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला.

माजी आमदार माने यांचा ३ ऑगस्ट रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्तचे नियोजनासाठी बैठकीत कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, नेत्र शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, महिलांसाठी स्पर्धा, वृक्षारोपण उपक्रम राबवण्याचे ब्रह्मदेवदादा माने बँकेचे संचालक गंगाधर बिराजदार यांनी सांगितले.

**दक्षिण, उत्तर तालुका व शहरातील कार्यकर्त्यांची बैठक संपन्न**



यावेळी नानासाहेब पवार, बाळासाहेब सुरवसे, बाळासाहेब पाटील, संजय जाधव, आप्पासाहेब काळे, सतीश दरेकर, संचालक प्रथमेश पाटील, चंद्रकांत खुपसंगे, सचीन गुंड यांनी मनोगत मांडले. मार्केट कमिटी संचालक नागण्णा बनसोडे, अविनाश मार्तंडे, गफार चाँदा, शैलजा राठोड, रजनी भडकुंबे, संभाजी भडकुंबे, चेअरमन सोमनाथ गायकवाड, व्हा.चेअरमन दिगंबर मेटे, संचालक आनंदराव देठे, शावरप्पा वाघमारे, काशिनाथ गौडगुंडे, शकील कुडले, सिध्दाराम व्हनमाने, राजकुमार आलमणी, इयत्ता पाटील, रइस बिराजदार, गुरुनाथ कोटलगी,समीर बिराजदार, महादेव नरोणे, कुमार जगताप, मुरलीधर शिंदे,नितीन भोपळे, विजय वानकर, रवींद्र शिंदे, मारुती गोरे, विष्णू वाघमारे, प्रताप टेकाळे, चंद्रकांत कराळे, शिवलिंग गौडा-पाटील, सुनील जाधव, उमेश भगत, तुकाराम चव्हाण, नागनाथ माने, पप्पू साखरे, गोवर्धन जगताप, बालाजी येलगुंडे, अंजली क्षिरसागर, जैनुद्दीन शेख, अजय रेवजे, राजकुमार ढेपे, अनिल पाटील, संजय वडजे, नितिन गव्हाणे, रणजीत दवेवाले,नागेश म्हेत्रे, राजु पाटील, युवराज चव्हाण, विकास कदम,म हेश घाडगे, अनिल हिबारे, शब्बीर मुजावर, सागर माने, अशोक गुंड, अनिल नवगिरे आदीसह उत्तर व दक्षिण तालुका तसेच शहरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

### उळे-कासेगाव रस्ता दुरूस्तीची मागणी

**सोलापूर, दि.२१ जुलै-**

उळे ते कासेगाव रस्त्यावर खड्डे पडल्याने दुरवस्था झाली आहे. त्यामुळे रस्ता दुरूस्तीची मागमी ग्रामस्थांतून होत आहे. उळे येथील शाळेजवळ मोठे खड्डे आहेत. तर जाधव वस्ती, इंदिरानगर वस्ती येथेही रस्त्याला मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यानंतर एक वाहन बाजूला थांबवल्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे वाहनधारकांना त्रास होत आहे.

## ‘माणूसकी’तर्फे मोफत शालेय साहित्य

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २१ जुलै-**

माणूसकी फाउंडेशनच्या वतीने अक्कलकोट शहर व परिसरातील सामाजिक बांधिलकीच्या नात्याने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले

आजच्या या स्पर्धेच्या युगात हे विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपले कौशल्य दाखविण्यात कमी पडू नयेत यासाठी हा उपक्रम माणुसकी फौडेशन कडून करण्यात आला. अक्कलकोट शहर व परिसरातील दुसरी ते आठवी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप ताराम ता शाळा येथे करण्यात आले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त श्री अमोलराजे भोसले प्रथमेश इंगळे, श्री स्वामी समर्थ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. योगेश वेळापूरकर, एच.व्ही. देसाई आय क्लिनिकचे डॉ. सागर पवार, उद्योगपती मनोज निकम, न्यू लुक अकादमीचे सुहासिनी सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते वैभव नवले व शितल फुटाणे उपस्थित होते यावेळी माणूसकी फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत क्षीरसागर, उपाध्यक्ष आकाश शिंदे, सचिव आशिष हुंबे, अविनाश क्षिरसागर, योगेश महिंद्रकर, बाबूशा भालके, समर्थ शिरसाट मुख्याध्यापिका कदम, शेख, संगोळगी, गोडसे, हरवाळकर, जाधव, पाटील उपस्थित होते सूत्रसंचालन शेख तसेच प्रास्ताविक मनोगत मुख्याध्यापिका कदम व आभार रागिणी जाधव यांनी मानले



## सूर्योदयचा प्रत्येक उपक्रम समाजाला दिशा देणारा : अशोक देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जुलै-**

सूर्योदय फाउंडेशनच्या माध्यमातून आजवर घेतलेले सर्वच उपक्रम अत्यंत कौतुकास्पद, राष्ट्रहिताचे आणि समाजाला दिशा देणारे असल्याचे गौरवोद्गार पुणे येथील विनोदी वक्ते अशोक देशमुख यांनी काढले. सूर्योदय परिवार, सांगोला यांच्यातर्फे अहिल्यादेवी होळकर सभागृहात आयोजित ज्येष्ठ नागरिक स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ निरूपणकार सुभाष लऊळकर, मेडशिंगी भूषण डॉ.मच्छिंद्र सोनलकर, आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सूर्योदय फाउंडेशनचे अध्यक्ष अनिलभाऊ इंगवले, उपाध्यक्ष जगन्नाथ भगत, सूर्योदय दूध विभागाचे चेअरमन डॉ.बंडोपंत लवटे, एलकेपी मल्टीस्टेटचे व्हा.चेअरमन सुभाष दिघे उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांच्या या स्नेहसंवाद मेळाव्यात सांगोला शहर आणि तालुक्यातील शिक्षण, शेती, संरक्षण, उद्योग व व्यापार, पत्रकारिता, सामाजिक कार्य, विविध संघटना अशा अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य असलेल्या ज्येष्ठ व्यक्तींना मान्यवरांच्या शुभहस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे आम्हाला आमच्या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी अधिकचे प्रोत्साहन मिळाले असून आमची जबाबदारी वाढली असल्याच्या भावना यावेळी पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी बोलून दाखवल्या.

## जिल्ह्यात २७ सप्टेंबरपासून तीर्थक्षेत्र पर्यटन सप्ताह

- आ. सुभाष देशमुख; सोशल फाउंडेशनचा पुढाकार
- वारकरी करणार जिल्ह्यातील तीर्थक्षेत्राचा प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

सोलापूर जिल्ह्याच्या आध्यात्मिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाचा जागर करून जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांचे महत्व अधोरेखित करण्यासाठी सोलापूर सोशल फाउंडेशन व लोकमंगल महाविद्यालय यांच्या वतीने२७ सप्टेंबर पासून जिल्ह्यात तीर्थक्षेत्र पर्यटन सप्ताह राबवणार असल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले.

सोलापूर सोशल फाउंडेशन आणि लोकमंगल विद्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय धर्म-सांस्कृतिक सभा रविवारी लोकमंगल शिक्षण संकुल, वडाळा येथे पार पडली, यावेळी आमदार देशमुख बोलत होते. या बैठकीत जागतिक पर्यटन दिन (२७ सप्टेंबर) ते महात्मा गांधी जयंती (२ ऑक्टोबर) दरम्यान तीर्थक्षेत्र पर्यटन सप्ताह साजरा करण्याचा निर्णय



घेण्यात आला. या सप्ताहात जिल्ह्यातील धार्मिक व तीर्थस्थळांचा प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील भाविक वारकरी पुढाकार घेणार असून प्रत्येक गावात एक वारकरी प्रतिनिधी नेमण्यात येणार असल्याची माहिती ह.भ.प. सुधाकर इंगळे यांनी दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. बालकांच्या संस्कारांसाठी वारकरी चळवळी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ब्रम्हांडाचा मालक सोलापूर जिल्ह्यात आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे यांनी केले. सोलापूर जिल्ह्यात जगाचा देव आहे, असे सांगत अखिल भाविक वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष संजय पवार यांनी धार्मिक पर्यटनाचे महत्त्व अधोरेखित केले. देव, देश आणि धर्माच्या निष्ठेने सेवा करणाऱ्यांच्या विरोधात काम करणाऱ्यांची ओळख पटवायला हवी, असा इशारा ह.भ.प. भागवत चौरे यांनी यावेळी दिला. यावेळी विश्व वारकरी संघाचे सागर महाराज अक्कलकोटे, ह.भ.प. बळीराम जांभळे, ह.भ.प. सर्वश्री मोहन शेळके, किसन कापसे, विश्व वारकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष तुकाराम भोसले, प्रभाकर वाकचौरे, रामहरी शेंडगे, सुरेश तोडकरी, काका पाटील, दादा काशिद, बाळासाहेब बाबर, प्रकाश हविले, बाळासाहेब हारदाडे, पंडीत गव्हाणे, हरिप्रसाद धर्माधिकारी, संजय पाटील, प्रकाश पवार, संभाजी शिंदे, उत्तम शिंदे, तानाजी बेलेराव तसेच महिला वारकरी आदी उपस्थित होते.

### सरकारच्या अभिनंदनाचा ठराव..

औरंगाबादचे ‘छत्रपती संभाजीनगर’, उस्मानाबादचे ‘धाराशिव’, अहमदनगरचे ‘अहिल्यानगर’, इस्लाम पूरचे ‘ईश्वरपूर’, निजामपूरचे ‘रायगडवाडी’ असे नामांतर केल्याबद्दल राज्य शासनाचा अभिनंदनाचा ठराव ज्योतीराम चांगभले (राज्याध्यक्ष, अखिल भाविक वारकरी मंडळ) यांनी मांडला.

### तुम्ही ठरवलं, तर सोलापूरचे धार्मिक पर्यटन निश्चित घडू शकतं,

पंढरपूर मार्केटींग करायचे आहे अक्कलकोट व शिर्डी या ठिकाणचे पर्यटन म्हणून मार्केटींग झाले तसे पंढरपूरचे करायचे आहे. पंढरी अध्यात्म नगरी आहे. त्याचे मार्केटिंग आवश्यक आहे, असे आ. सुभाष देशमुख यांनी पंढरपूरच्या धार्मिक पर्यटनाचा प्रचार–प्रसार प्रभावीपणे करण्याचे आवाहन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### फिडे महिला विश्वचषक दिव्या देशमुख उपांत्य फेरीत



**बटुमी** : भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नागपूरच्या आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुखने सोमवारी आपल्याच देशाची हरिका द्रोणवल्लीला टायब्रेकमध्ये हरवून फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ २०२५ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. बटुमी, जॉर्जियात सुरु असलेल्या या विश्वचषक स्पर्धेत दिव्या महिला ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पीसोबत अंतिम चारमध्ये सहभागी झाली. हम्पीने उपांत्यपूर्व सामन्यात चीनच्या युक्सिन सॉंगला हरवून विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली. २०२३ मध्ये गत आवृत्तीत हरिका उपांत्यपूर्व फेरीत खेळली होती, जी यापूर्वी भारतीय खेळाडूने केलेली सर्वोत्तम कामगिरी होती. दिव्याने हरिकाविरुद्ध पहिला आणि दुसरा गेम बरोबरीत राखला व स्पर्धा टायब्रेकमध्ये नेली. त्यानंतर, १९ वर्षीय दिव्याने सलग डावांमध्ये आपल्या वरिष्ठ खेळाडूला हरवून उपांत्य फेरीत स्थान निश्चित केल. आता उपांत्य फेरीत दिव्याची गाठ चीनच्या टॅन झोंगीशी पडेल. हम्पीचा सामना लेई टिंगजी या चीनच्या खेळाडूशीही होईल. ■

# नितीश कुमार रेड्डी इंग्लंड दौऱ्यातून बाहेर

### अर्शदीप चौथ्या कसोटीसाठी उपलब्ध नाही



नितीश कुमार रेड्डी



अर्शदीप सिंग

◆ **मॅन्चेस्टर, २१ जुलै**

भारताचा अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी गुडघ्याच्या दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित मालिकेतून बाहेर झाला आहे, तर जखमी वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग चौथ्या कसोटीसाठी निवडीसाठी उपलब्ध नसेल, असे बीसीसीआयने सोमवारी सांगितले.

दुसऱ्या व तिसऱ्या कसोटीत खेळणारा नितीश रेड्डी रविवारी जिममध्ये सराव करताना दुखापतग्रस्त झाला, स्कॅनमध्ये लिगामेंटचे नुकसान झाल्याचे दिसून आले.

डाव्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे नितीश कुमार रेड्डी उर्वरित दोन कसोटीतून बाहेर झाला आहे. नितीश मायदेशी परतणार आहे व संघ त्याच्या जलद पुनर्प्राप्तीसाठी शुभेच्छा देतो, असे बीसीसीआयने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

अर्शदीप अद्याप मालिकेत खेळलेला नाही. गत आठवड्यात बेकेनहॅममध्ये प्रशिक्षण सत्रादरम्यान नेटमध्ये गोलंदाजी करताना त्याच्या डाव्या अंगठ्याला दुखापत झाली.

बीसीसीआयची वैद्यकीय चमू त्याच्या प्रगतीवर लक्ष ठेवून आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

हरयाणाचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजला कव्हर म्हणून संघात सहभागी करण्यात आले आहे व त्याने आधीच मॅन्चेस्टरमधील संघाशी संपर्क साधला आहे.

चौथा कसोटी सामना बुधवारपासून ओल्ड ट्रॅफर्डवर सुरू होणार आहे. पाच सामन्यांच्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेत यजमान इंग्लंड २-१ ने आघाडीवर आहे.

**चौथ्या कसोटीसाठी भारताचा अद्ययावत संघ** : शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार व यष्टिरक्षक), यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन्, करुण नायर, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, आकाश दीप, कुलदीप यादव, अंशुल कंबोज. ◀(वृत्तसंस्था)

# ओल्ड ट्रॅफर्डवर फारुख इंजिनीअर, क्लाईव्ह लॉईड यांच्या गौरवार्थ स्टॅण्ड

◆ **मॅंचेस्टर, २१ जुलै**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या कसोटी सामन्याच्या वेळी त्यांच्या माजी कौंटी संघ लॅंकेशायरने भारताचे माजी यष्टिरक्षक फारुख इंजिनियर व वेस्ट इंडीजचे दिग्गज क्लाईव्ह लॉईड यांच्या नावावर ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर स्टॅण्ड बांधण्याची तयारी दर्शविली आहे.



क्लाईव्ह लॉईड | फारुख इंजिनीअर

फारुख इंजिनियर सुमारे एक दशक लॅंकेशायरकडून कौंटी क्रिकेट खेळले, तर वेस्ट इंडीजचे माजी कर्णधार लॉईड दोन दशके क्लबसोबत होते. या दोन्ही दिग्गजांनी क्लबच्या इतिहासात अमिट योगदान दिले आहे.

स्टॅण्ड-नामकरण समारंभ २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी होऊ शकतो. क्लबच्या दोन्ही दिग्गजांसाठी हा सन्मान योग्य आहे, असे सूत्राने सांगितले. तीन उच्च-तीव्रतेच्या सामन्यांनंतर इंग्लंड पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-१ अशी आघाडीवर आहे.

१९६८ ते १९७६ दरम्यान १७५ सामन्यांमध्ये, ८७ वर्षीय इंजिनियरने लॅंकेशायरसाठी ५९४२ धावा केल्या, ४२९ झेल घेतले आणि ३५ यष्टिचीत केले.

दुसरीकडे, दोन वेळा विश्वचषक विजेता वेस्ट इंडीजचा कर्णधार क्लाईव्ह लॉईडने १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला परदेशी खेळाडू म्हणून आल्यानंतर क्लबचे नशीब बदलले.

मुंबईत जन्मलेल्या इंजिनियरने लॅंकेशायरमध्ये पदार्पण केले, तेव्हा १५ वर्षांहून अधिक काळ क्लबकडे कोणतेही मोठे विजेतेपद नव्हते, परंतु त्यांनी १९७० ते १९७५ दरम्यान चार वेळा जिलेट चषक जिंकण्यास मदत केली.

या आठवड्याच्या अखेरीस इंजिनियर व लॉईड दोघेही लॅंकेशायरच्या इतिहासात अमर होतील. मनोरंजक गोष्ट म्हणजे, बॅर्बॉर्न स्टेडियममध्ये इंजिनियरचे नाव असलेले स्टॅण्ड नाही, जिथे त्यांनी आपले बहुतेक क्रिकेट सामने खेळले.

'तो अविश्वसनीय काळ होता व ओल्ड ट्रॅफर्ड हे एक अद्भूत ठिकाण होते. लोक आम्हाला खेळताना पाहण्यासाठी मैलों मैल येत असत, असे फारुख इंजिनियर यांनी काही वर्षांपूर्वी क्लबच्या संकेतस्थळाला सांगितले होते. ओल्ड ट्रॅफर्ड ड्रेसिंग रूममधून आम्हाला वॉरविक रोड रेल्वे स्टेशन दिसत होते आणि सामन्यापूर्वी आम्हाला प्लॅटफॉर्मवरील प्रवासी गाडीतून उतरताना दिसत होते, अशी आठवणही त्यांनी सांगितली होती. इंजिनिअर यांना त्यांच्या भरभराटीच्या काळात चाहत्यांचे मेल आल्याचेही आठवते.

इंग्लंडमधील प्रत्येकजण फारुख इंजिनिअर, क्लाईव्ह लॉईड यांच्यासह हॅरी पिलिंग, पीटर लीव्हर व केन शटलवर्थ यांच्या नावे आजही चर्चा करतात. निवृत्तीनंतर इंजिनिअरने मॅन्चेस्टरमध्ये आपले घर बांधले व आजपर्यंत येथेच राहतात. वैयक्तिक भेटीसाठी येथे असलेले माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकर हे सुद्धा क्लबच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह समारंभाला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताला बुद्धिबळ विश्वचषकाचे यजमानपद

◆ **नवी दिल्ली, २१ जुलै**

तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, भारताला पुन्हा एकदा प्रतिष्ठित बुद्धिबळ विश्वचषक २०२५ स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याचा मान मिळाला आहे. ही स्पर्धा येत्या ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत खेळवली जाणार असून स्पर्धेच्या ठिकाणाची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

बुद्धिबळाची जागतिक नियामक संस्था 'फिडे'ने या वृत्ताला दुजोरा दिला. या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे भारतीय बुद्धिबळ क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विश्वचषक स्पर्धेत जगभरातील २०६ अव्वल खेळाडू सहभागी होतील. विजेतेपदाच्या लढाईसोबतच, हे खेळाडू २०२६ मध्ये होणाऱ्या 'फिडे कॅण्डिडेट्स' स्पर्धेतील स्थानासाठीही झुंज देतील भारताने यापूर्वी २००२ साली हैदराबाद येथे या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते. त्या स्पर्धेत विश्वनाथन् आनंदने विजेतेपद पटकावून इतिहास रचला होता.◀(वृत्तसंस्था)

# भारताचे आव्हान संपुष्टात

### आशिया कनिष्ठ गट मिश्र सांघिक बॅडमिंटन

### उपांत्यपूर्व फेरीत जपानकडून पराभव

◆ **सोलो, २१ जुलै**

इंडोनेशियामध्ये सुरु असलेल्या आशिया कनिष्ठ गट मिश्र सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत सोमवारी उपांत्यपूर्व फेरीत माजी विजेत्या जपानकडून भारताचा १०४-११० असा पराभव झाला.याबरोबरच भारताचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

रिले स्कोअरिंग सिस्टीम अंतर्गत झालेल्या चुरशीच्या सामन्यात, पहिल्या सामन्यात ११-९ असा पराभव झाल्यानंतर भारताने जोरदार सुरुवात केली.

भार्गव राम अरिगेला आणि विश्व तेज गोब्बुरू या मुलांच्या दुहेरी जोडीने भारताला आघाडी मिळवून दिली, त्यानंतर वेन्नाला कलागोटला व रेशिका उथयासूरियान या मुलींच्या जोडीने संयमी विजय मिळवला. निकालामुळे भारत ३३-२६ असा आघाडीवर राहिला.

त्यानंतर रेशिकाने भव्य छाबसोबत मिळून ४४-३५ अशी आघाडी कायम ठेवली आणि रौनक चौहानने आणखी एक दमदार कामगिरी करत संघाची आघाडी वाढवली.

या सामन्यात भारताने बरीचशी आघाडी घेतली होती, परंतु २०२३ चा विजेता जपान शेवटच्या टप्प्यात आघाडीवर राहिला आणि त्याने सलग पाच सामने जिंकले. त्यातील अनेक सामने वादग्रस्त ठरला, जे भारतीय संघाने दाखवलेल्या धैर्याचे प्रतिबिंब आहे. भारताने हाँगकाँग, चीन, संयुक्त अरब अमिरात व श्रीलंकेवर विजय मिळवून गट ड मध्ये अव्वल स्थान पटकावले होते. आता लक्ष २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या वैयक्तिक बॅडमिंटन स्पर्धेकडे भारतीय खेळाडूंनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### जागतिक विद्यापीठ स्पर्धेपासून ६ भारतीय बॅडमिंटनपटू वंचित

**नवी दिल्ली** : जर्मनीतील राइन-रुहर येथे सुरू असलेल्या जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत मिश्र संघाचे कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय बॅडमिंटन संघाचा निवडीवरून वाद निर्माण झाला आहे. भारतीय विद्यापीठ संघात निवडलेल्या १२ खेळाडूंपैकी ६ खेळाडूंना कथित प्रशासकीय चुकांमुळे सहभागी होण्यापासून रोखण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी १२ खेळाडूंची निवड करण्यात आली आणि त्यांना भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठवण्यात आले, परंतु योग्यरित्या अर्ज सादर न केल्यामुळे सहा खेळाडुंना परवानगी नाकारली. ■

### भारत अ पुरुष हॉकी संघाची पराभवाने युरोप दौऱ्याची सांगता

**आइंडहोव्हन** : भारत अ पुरुष हॉकी संघाचा युरोप दौरा येथे नेदरलॅण्डविरुद्ध २-८ अशा गोलफरकाच्या पराभवाने आटोपला. युवा भारतीय हॉकीपटू राजिंदर सिंग व सेल्वम कार्तीने अंतिम सामन्यात भारत अ संघासाठी दोन गोल केले. भारत अ संघाने गत आठवड्यात नेदरलॅण्डविरुद्ध ०-३ असा पराभव पत्करला होता. भारत अ संघाने ८ जुलै रोजी दौरा सुरू केला आणि पाच युरोपियन संघांविरुद्ध एकूण आठ सामने खेळले. जगातील प्रथम क्रमांकाचा नेदरलॅण्ड व तिसऱ्या क्रमांकाचा बेल्जियमसह खेळातील काही अव्वल संघांविरुद्ध स्पर्धा करण्यासाठी संघाने तीन शहरांमधून प्रवास केला. या युरोपियन दौऱ्यात आम्हाला विजयांपेक्षा जास्त पराभव सहन करावे लागले असले तरी, ते कधीही निकालांबद्दल नव्हते तर संघ म्हणून या दौऱ्यातून मिळालेल्या शिकण्याबद्दल आणि अनुभवाबद्दल होते, असे भारत अ संघाचे प्रशिक्षक शिवेंद्र सिंह म्हणाले. भारत अ संघात आमच्याकडे वरिष्ठ व कनिष्ठ खेळाडूंचे मिश्रण होते आणि गेल्या दोन आठवड्यात त्यांना खूप मौल्यवान अनुभव मिळाला, असेही ते म्हणाले. या परदेश दौऱ्यात भारत अ संघ आयर्लंड, फ्रान्स, इंग्लंड, बेल्जियम आणि नेदरलॅंड्स विरुद्ध खेळला आणि त्यांच्या आठपैकी तीन सामने जिंकले. हे सर्व खेळाडू या मौल्यवान अनुभवाचा वापर करतील आणि त्यांच्या भविष्यातील सर्व सामन्यांसाठी त्यांचा खेळ सुधारण्यासाठी त्याचा वापर करतील, असा विश्वास त्यांना व्यक्त केला. ■



सिंगापूरमधील जागतिक जलतरण अजिंक्यपद स्पर्धेत फ्रान्स आणि ब्रिटन यांच्यातील महिला वॉटर पोलो वर्गीकरण सामन्यादरम्यान ब्रिटनच्या लिली टर्नरविरुद्ध गोल करण्याचा प्रयत्न करताना फ्रान्सची एमा व्हर्नोक्स (डावीकडे)

### नेपाळचा संघ बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे प्रशिक्षण घेणार

◆ **नवी दिल्ली, २१ जुलै**

आयसीसी टी-२० विश्वचषक पात्रता फेरीच्या तयारीचा भाग म्हणून नेपाळचा पुरुष क्रिकेट संघ आगामी २० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे प्रशिक्षण घेणार आहे. दोन्ही देशांच्या तरुणांना जोडण्यासाठी भारत सरकारचा हा प्रयत्न आहे.

टी-२० विश्वचषक पात्रता फेरी या वर्षी ऑक्टोबरमध्ये होणार आहे. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत होणार आहे. भारताने यापूर्वी गत वर्षी ऑगस्टमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स येथे नेपाळच्या संघाच्या प्रशिक्षणाला पाठिंबा दिला होता.

गत वर्षी जूनमध्ये झालेल्या टी-२० क्रिकेट चषकापूर्वी नेपाळने बडोदा आणि गुजरात क्रिकेट असोसिएशनच्या संघांविरुद्ध त्रिकोणीय टी-२० सराव स्पर्धेतही भाग घेतला होता.

या क्रिकेट सहकार्यामुळे भारत व नेपाळदरम्यनचे घनिष्ठ व जुन्या ऐतिहासिक संबंधांना एक नवीन आयाम जोडला आहे. या उपक्रमामुळे दोन्ही देशांच्या तरुणांना क्रिकेटसाठी सामायिक आवड निर्माण झाली आहे, असे एका भारतीय सरकारी अधिकाऱ्याने सांगितले. परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी जानेवारी २०२४ मध्ये नेपाळ पुरुष क्रिकेट संघटनेच्या प्रतिनिधींची भेट घेतली होती व नेपाळमध्ये क्रिकेटच्या वाढीसाठी भारताचा पाठिंबा व्यक्त केला होता. ◀(वृत्तसंस्था)

# मिचेल ओवेनचे पदार्पणात अर्धशतक



सामनावीर मिचेल ओवेन

### ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडीजवर एका गड्याने विजय

◆ **किंग्स्टन (जमैका), २१ जुलै**

मिचेल ओवेनने पदार्पणात झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर ऑस्ट्रेलिया संघाने वेस्ट इंडीजविरुद्धच्या टी-२० क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्यात ३ गडी राखून विजय मिळविला. अर्धशतकासह एक बळी टिपणारा ओवेन सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडीजला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. शानदार सुरुवात केल्यानंतर वेस्ट इंडीजने शेवटच्या नऊ चेंडूत पाच धावांत ४ फलंदाज गमावले व त्यांना ८ बाद १८९ धावांपर्यंत मजल मारता आली. ऑस्ट्रेलियाने ७ चेंडू व तीन गडी शिल्लक ठेवत १९० धावांचे लक्ष्य गाठले. ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून देताना मिचेल ओवेन व कॅमेरून ग्रीनने अर्धशतकी योगदान दिले. ओवेनने कॅमेरुन ग्रीनसोबत ४० चेंडूत पाचव्या गड्यासाठी ८० धावांची भागीदारी केली. कॅमेरुनने २६ चेंडूंत २ चौकार व ५ षट्कारांच्या मदतीने ५१ धावांची, तर ओवेनने २७ चेंडूंत ६ षट्कारांसह ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. वेस्ट इंडीजला १८९ धावांपर्यंत रोखताना ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज बेन द्वारशुइसने कारकिर्दीतील सर्वोत्तम ३६ धावांत ४ बळी टिपण्याची कामगिरी केली. ◀(वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिरागचे दमदार सुरुवात करण्याचे लक्ष्य

### चीन ओपन बॅडमिंटन



◆ **चांगझोऊ, २१ जुलै**

भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या चीन ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी होऊन आगामी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी गती निर्माण करण्यासाठी दमदार सुरुवात करण्याचे ध्येय ठेवतील.

पॅरिसमध्ये २५ ते ३१ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी चीन ओपन ही शेवटची मोठी स्पर्धा आहे. सर्व खेळाडू या प्रतिष्ठित स्पर्धेपूर्वी आत्मविश्वास वाढवण्यासाठी काही विजय मिळवण्याची आशा बाळगतील.

सध्या जागतिक क्रमवारीत १५ व्या क्रमांकावर असलेले सात्त्विक व चिरागने या हंगामात तीन उपांत्य फेरी गाठली आहे, यात जानेवारीमध्ये मलेशिया व इंडिया ओपनचा समावेश आहे, परंतु सात्त्विकच्या आरोग्याच्या चिंता व चिरागच्या पाठीच्या दुखापतीमुळे त्यांची प्रगती थांबली होती, ज्यामुळे ते अनेक आठवडे बाहेर राहिले.

या भारतीय जोडीने सिंगापूर ओपनमध्ये उपांत्य फेरी व इंडोनेशिया ओपनमध्ये उपांत्य फेरी गाठली. तथापि, गत आठवड्यात त्यांना धक्का बसला, जपान ओपनमध्ये पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या चीनच्या लियांग वेई केंग व वांग चांग यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.

माजी प्रथम विश्वमानांकित जोडी जपानच्या केनिया मित्सुहाशी व हिरोकी ओकामुरा विरुद्ध सलामीला उतरताना लवकरच पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेल.

एकेरीत, लक्ष्य सेन, एच. एस. प्रणॉय व पी. व्ही. सिंधू या स्पर्धेत फॉर्म परत मिळवण्याची आशा करतील. १८ व्या मानांकित लक्ष्य सेनला या हंगामात सातत्य राखण्यात अडचण आली आहे, ऑल इंग्लंडमध्ये तो केवळ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचू शकला आहे. या २३ वर्षीय या खेळाडूला खांदे, घोटे व पाठीच्या दुखापतींशी झुंजावे लागले आहे. तो चीनच्या पाचव्या मानांकित ली शी फेंग विरुद्ध सलामीला येईल.

२०२३ मध्ये जागतिक अजिंक्यपद व आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणारा प्रणॉय जागतिक क्रमवारीत ३५ व्या स्थानावर घसरला आहे. जपान ओपनमध्ये खेळू न शकलेला हा माजी अव्वल १० खेळाडूंमध्ये परतला आहे आणि पहिल्या फेरीत त्याला जपानच्या कोकी वातानाबेशी सामना करावा लागेल.

१६ व्या स्थानावर असलेल्या सिंधूसाठी, इंडिया ओपनमधील उपांत्यपूर्व फेरी हा तिचा या वर्षीचा सर्वोत्तम निकाल आहे. गत सहा महिन्यांपासून इंडोनेशियन प्रशिक्षक इरवन्स्या आदि प्रतामा यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करूनही ३० वर्षीय माजी विश्वविजेत्या सिंधूला अनेक वेळा लवकर बाहेर पडावे लागले आहे.

गत आठवड्यात, तिला कोरियाच्या सिम यू जिनकडून पराभव पत्करावा लागला, हा तिचा या वर्षीच्या स्पर्धेतील पहिल्याच फेरीतील पाचवा पराभव झाला.

सिंधूचा सामना जपानच्या सहाव्या मानांकित १८ वर्षीय माजी जागतिक ज्युनियर विजेत्या तोमोका मियाझाकीविरुद्ध होईल. उन्नती हुड्डा पहिल्या फेरीत स्कॉटलंडच्या कर्स्टी गिलमोरशी, तर अनुपमा उपाध्याय चीन तैपेईच्या लिन हसियांग तीशी होईल. ◀(वृत्तसंस्था)

### शिलाँगमधील कराटे स्पर्धेत ७०० स्पर्धक सहभागी

**शिलाँग** : अलिकडच्या काळात राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांमध्ये झालेल्या दमदार कामगिरीमुळे उत्साहित होऊन, मेघालयातील तरुण कराटेपटू ३१ व्या राज्यस्तरीय आंतरशालेय कराटे स्पर्धा २०२५ साठी सज्ज होत आहेत. ऑल मेघालय कराटे-डो असोसिएशन २४ ते २६ जुलै दरम्यान शिलाँगमधील एसएआय, नेहू कॅम्पसमधील मल्टीपर्पज इनडोअर हॉलमध्ये तीन दिवसांच्या या स्पर्धेचे आयोजन करत आहे. या स्पर्धेसाठी एकूण ७३१ कराटेपटूंनी नोंदणी केली आहे, गत वर्षीच्या ६०९ पेक्षा ही संख्या जास्त असून हा एक नवीन विक्रम आहे. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये मार्शल आर्टसाठी वाढत्या उत्साहाचे प्रतिबिंब आहे. ■

# करुण नायरला पुन्हा संधी मिळेल का?

### नवीन खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता

◆ **मॅन्चेस्टर, २१ जुलै**

२३ जुलैपासून मॅन्चेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड येथे इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी भारतीय क्रिकेट संघ नवीन खेळाडूंना मैदानात उतरवण्याची शक्यता आहे. लॉर्ड्सवरील तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर, चौथ्या कसोटी सामन्यासाठी जसप्रीत बुमराह भारतीय संघात स्थान मिळवेल का, हा प्रश्न विचारला जात होता. तथापि, मॅन्चेस्टर कसोटीची सुरुवात जवळ येताच परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. भारताच्या अंतिम एकादशमधील किमान चार खेळाडूंना दुखापतीच्या समस्या आहे, त्यामुळे या चौथ्या सामन्यासाठी नवीन खेळाडूंना संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी, भारत दोन प्रमुख खेळाडूंच्या तंदुरुस्तीबद्दल चिंतेत आहे- ऋषभ पंत व आकाश दीप. परंतु जखमी खेळाडूंची यादी आता चार झाली आहे, यात अर्शदीप सिंग व नितीश कुमार रेड्डीचीही भर पडली आहे.यात रेड्डी तर इंग्लंड दौऱ्यातून बाहेर झाला, तर ऋषभ पंत तर्जनीच्या दुखापतीमुळे ग्रस्त आहे.

गंभीर अपघातातून परतल्यानंतर निवडकर्त्यांनी ऋषभ पंतच्या कामाच्या ओझ्यावर बारकाईने लक्ष ठेवले आहे. ओल्ड ट्रॅफर्ड येथील चौथी कसोटी जवळ येत असल्याने, तो यष्टिरक्षक म्हणून खेळेल की, केवळ फलंदाज म्हणून खेळेल हे पाहणे शिल्लक आहे. अलिकडेच झालेल्या हाताच्या दुखापतीमुळे तो तिसऱ्या कसोटीत यष्टिरक्षकाच्या कर्तव्यांपासून दूर राहिला व त्याच्या जागी ध्रुव जुरेलने यष्टिरक्षणाची जबाबदारी घेतली.



एजबॅस्टनमधील चांगल्या कामगिरीनंतर, बंगालचा वेगवान गोलंदाज आकाश दीप लॉर्ड्समध्ये खेळताना अडचणीत सापडला. तो कंबरेचा त्रास सहन करत आहे, त्यामुळे मॅन्चेस्टर कसोटीसाठी त्याचा समावेश संशयास्पद आहे.

पाचव्या कसोटीसाठी जसप्रीत बुमराहची उपलब्धता सुद्धा अनिश्चित असल्याने, संघ व्यवस्थापन आकाशकडून जलद बरा होण्याची आशा करत आहे.

अर्शदीप सिंगला नेटसराव सत्रादरम्यान त्याच्या गोलंदाजीच्या हाताला दुखापत झाली. कसोटी मालिकेच्या उत्तरार्धात अर्शदीप सिंगचा विचार केला जात होता. नितीश कुमार रेड्डी- गुडघ्याच्या दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर झाला आहे.

**करुण की साई सुदर्शन**

लॉर्ड्स कसोटीच्या समाप्तीनंतर भारताने तिसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजीच्या स्थानावर साई सुदर्शनला परत बोलावावे अशी मागणी मोठ्या प्रमाणात केली जात आहे, अनेक माजी क्रिकेटपटूंनी करुण नायरला वगळण्याची मागणी केली आहे.

इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांमध्ये - हेडिंग्ले, एजबॅस्टन आणि लॉर्ड्स येथे - कर्नाटकच्या या फलंदाजाने २१.८३ च्या सरासरीने फक्त १३१ धावा केल्या, ज्यामध्ये त्याचा सर्वोच्च धावसंख्या ४० होती. नायरने सहा डावांमध्ये २४९ चेंडूंचा सामना करून क्रीजवर वेळ घालवला असला तरी, २३ जुलैपासून मॅन्चेस्टरमध्ये सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीपूर्वी त्याची वेगवान आणि सीमची कमजोरी चिंता निर्माण करते. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या शाहिरी, पोवाड्यांनी गर्जले सोलापूर विद्यापीठ..!

## सोलापूर विद्यापीठात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राचे उद्घाटन !



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै -**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सोमवारी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुंबईचे सुप्रसिद्ध शाहीर डॉ. गणेश चंदनशिवे यांचा शाहिरी आणि पोवाड्यांचा कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. चंदनशिवे यांनी शाहिरी आणि पोवाडे पहाडी आवाजात गाऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याची आठवण करून दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्यावतीने अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अध्यासन केंद्राचे उद्घाटन तसेच मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे विभागप्रमुख, शाहीर डॉ. गणेश चंदनशिवे यांचा शाहिरी व पोवाडे प्रबोधनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, केंद्राचे समन्वयक डॉ. अशोक शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राचे अध्यक्ष डॉ. दिगंबर झोंबाडे यांनी केले. डॉ. परमेश्वर हटकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.

यावेळी शाहीर डॉ. गणेश चंदनशिवे, अजय देहाडे, शिवाजी वाघमारे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे गुणगान व गौरव करणारे शाहिरी, पोवाडे सादर करत उपस्थित रसिक, श्रोत्यांना भारावून सोडले. यात सर्वांना वेड लावी अशी देखणी.. मनात माझ्या अण्णाभाऊंची लेखणी, भीमाईच बाळ.., जगबदल... सांगूनी गेले मला भीमराव.., जय जय होळकरशाहीचा.... अशा एका पेक्षा एक शाहिरी, पोवाड्यामधून स्वरांचा कडकडाट होताच प्रेक्षकांच्या अंगावर वैचारिकतेचे आणि स्फुर्तीचे शहारे उभे राहिले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावरीलही शाहिरी, पोवाडे सादर करून कलाकारांनी श्रोत्यांची मने जिंकली. या कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ. प्रशांत पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. गौतम कांबळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले.



# महिलांवरील अत्याचाराविरोधात सोलापूर शहर महिला काँग्रेसतर्फे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महिलांवरी अत्याचाराविरोधात महिला काँग्रेसतर्फे अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवन येथे आंदोलन करण्यात आले. भाजप महायुती सरकारची निष्क्रियताच कारणीभूत असल्याचा आरोप करण्यात आला. कोपर्डीसारख्या धक्कादायक घटना पुन्हा पुन्हा घडत असून शहापूर, बदलापूर, सोलापूरसह महाराष्ट्रात पालघर, सातारा, नागपूर, बीड या जिल्ह्यांतही छेडछाड, विनयभंग आणि लैंगिक अत्याचाराच्या घटनांनी महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेक आरोपींना राजकीय पाठबळ मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी परविन इनामदार, माजी महिला अध्यक्ष करीमुनिसा बागवान, सुमनताई जाधव, हेमाताई चिंचोळकर, मुमताज तांबोळी, चंदा काळे, शुभांगी लिंगराज, रुकीयाबानो बिराजदार, ज्योती गायकवाड, रेखा बिनेकर, पूजा चव्हाण, छाया हिरवटे, अँड, निशा मरोड, चंद्रकला निजमल्लू, सविता सोनवणे, मीना गायकवाड, इंदुमती शिंदे, चंदाबाई शिंदे मेरी नवगिरे, धनश्री देशमाने उपस्थित होते.

# आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी घेतला ईव्हीएम मशीन तपासणी कामाचा आढावा

## निवडणूक आयोगास अहवाल सादर करणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार महानगरपालिका कडे उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (एतच्) सध्या कौन्सिल हॉल येथे तपासणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रत्यक्ष याठिकाणी भेट देऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित,नोडल अधिकारी तपंन डंके, कार्यालय प्रमुख ओमप्रकाश वाघमारे, शुकर अत्तार,शिवकुमार उदगिरी, तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेकडे एकूण १२१८ कंट्रोल युनिट व २२८४ बॅलेट युनिट्स उपलब्ध आहेत.त्यांची तांत्रिक तपासणी व पडताळणीची प्रक्रिया नियमानुसार सुरू करण्यात आली. या प्रक्रियेत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी सर्व यंत्रांची कार्यक्षमता, हार्डवेअर स्थिती व आकडेवारी तपासली जात आहे. तपासणीवेळी अधिकाऱ्यांना डॉ. ओम्बासे यांनी काटेकोर तपासणी करण्याच्या सूचना दिल्या. महानगरपालिका प्रशासनाने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करून निवडणूक आयोगास अहवाल सादर केला जाईल. संपूर्ण प्रक्रिया आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पार पाडली जात असून भविष्यातील निवडणुकांसाठी ही यंत्रणा सज्ज ठेवण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून याकडे पाहिले जात आहे.

# भारतीय जैन संघटना महिला विभागाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै -**

भारतीय जैन संघटना महिला जिल्हा विभाग सोलापूरच्या वतीने रावजी सखाराम कॉमर्स हायस्कूल येथे ''ज्ञान गौरव'' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नवकार महामंत्राने झाली. या कार्यक्रमात १० व १२ वीत उत्कृष्ट मार्कांने पास झालेल्या मुला मुलींचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष केतन शाह यांच्या हस्ते सर्टिफिकेट, मेडल आणि पेढे देऊन बहुमान करण्यात आला.

या कार्यक्रमात गीतांश छाजेड ९३ टक्के, मयंक पंकज चोरडिया ८८, हेतल गौतम छाजेड ८७, जिया निमाणी ८५, मोक्ष गौतम ओसवाल ८५, भक्ती महावीर अलंकार ८४, क्रिस्टी शहा ८०, यशिता संदेश लोणावत ८० हे बारावीतील विद्यार्थी आणि खुशी शहा ९८, भव्य प्रफुल्ल वेद. ९६, संकेत मखाना ९५, अदिती संतोष सासवडे ९३, काव्या श्रीपाल कोठारी ९३, सिया कमलेश मंडोत ९१, तनिष्क संतोष यादगिरे ९०, युती नवरतन संकलेचा ९०, विराग अजित बाफना ८८, नम्र प्रवीण वाणीगोता ८८, नैतिक महिपाल ओसवाल ८६, पुर्वी आक्राणी ८५, तपस्या संचेती ८२, महेक रमेश वेद ८२, आर्यन रांका ८० टक्के असे गुण १० वीच्या विद्यार्थ्यांना मिळाले आहेत. या सर्व २३ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष केतन शहा यांनी देशभरात व राज्यभरात बिजेएस च्या चाललेल्या सर्व कामांचा आढावा सर्वांसमोर मांडला. राज्य सचिव संतोष बंब यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. यावेळी विभागीय अध्यक्षा माया पाटील, जिल्हाध्यक्षा प्रविणा सोलंकी, उपाध्यक्षा संतोष लोणावत, निर्मला मेहता, सरिता वेद, वैशाली शहा, मीनल जैन, वर्षा जैन, सुजाता उस्तुर्गे, लक्ष्मी पाटील, शुभांगी पुजारी, मीनाक्षी अंजनाळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला मेहता केले. प्रविणा सोलंकी यांनी आभार मानले.



# महा एनजीओ फेडरेशन व इको नेचर क्लबतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महा एनजीओ फेडरेशन व इको नेचर क्लब यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसामुळे व शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिवसानिमित आयोजित वृक्षारोपण उपक्रम गोपालक संघ गोशाळा नेहरूनगर येथे संपन्न झाला.

यावेळी सोलापूर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक विजयालक्ष्मी पुरी, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, इको नेचर क्लब मुख्य प्रवर्तक व पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, गोशाळा महासंघचे महेश भंडारी आणि प्रकाश वैद्य, महेश देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालक अमोल उंबरजे म्हणाले की महा एनजीओ फेडरेशन आयोजित व संस्थापक शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील ५५ सामाजिक संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात आपण जवळपास ३०० हून अधिक गोशाळेत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येत आहे. हरित सेवा आणि गोसेवा अशा दोन्ही सेवांना जोडण्यासाठी असे उपक्रम राबवित आहोत. महा एनजीओ फेडरेशनचे जिल्हा समन्वयक पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर म्हणाले की, सोलापुरात खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणची गरज आहे त्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. त्यामुळे असे उपक्रम राबविन्या साठी आम्ही नेहमी पुढाकार घेत असतो.

# अध्यात्म व विज्ञानाच्या विचारांचा समन्वय म्हणजे नवा भारत

## पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचे प्रतिपादन

## वारकरी किर्तनकार गोलमेज परिषद समारोप




**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, २० जुलै-**

विज्ञान व अध्यात्माच्या एकत्रीकरणातून नव्या विचारांचा समन्वय होईल, आणि या दोन्हीच्या विचारांचा समन्वय म्हणजे नवा भारत असेल. पंतप्रधान सतत म्हणतात की भारत एक महान व चांगले राष्ट्र होणार आहे. याची सुरूवात 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'तून झाली आहे. भारतीय राजकारणाला बदलावयाचे असेल तर अध्यात्मिक विचार मांडले गेले पाहिजे. येथून निघालेले मंथन हे भारतीय संस्कृतीला नवी दिशा देण्यासाठी सज्ज आहे. असे विचार जागतिक किर्तीचे संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एम आयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित दोन दिवसीय महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदेच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी पंढरपूर येथील श्रीगुरू साखरे महाराज परंपरा पाईकचे हभप रामकृष्ण महाराज वीर, आळंदी येथील साधकाश्रमचे प्रमुख हभप यशोधन महाराज साखरे, बदलापूर येथील ज्येष्ठ कीर्तनकार हभप विश्वनाथ महाराज वारिंगे, देहूचे हभप पांडुरंग महाराज घुले, पंडित उद्धवबापू आपेगावकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड होते. तसेच पद्मश्री पोपटराव पवार व परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, राजकारणाला अध्यात्मिक कल कसा मिळू शकेल यावर महात्मा गांधीजी सतत विचार मांडत होते. पण या परिषदेच्या माध्यमातून यांची सुरूवात झाली आहे. येथील राजकारणाला आध्यात्मिक कसे करता येईल हे सर्वात मोठे परिवर्तन असेल. राजकारणाला स्वच्छ करण्यासाठी अशा प्रकारच्या गोलमेज परिषदेचे आयोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. भारताला स्वातंत्र्य कसे आणि कोणत्या पद्धतीने मिळावे या साठी ब्रिटीशकाळात गोलमेज परिषदेला अतिशय महत्व आले होते. ही परिषद लंडन ला भरणार होती आणि येथे हे विचार मांडले जाणार होते. त्याच प्रमाणे ही परिषद देशासाठी अत्यंत महत्वाची आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, समाजात प्रबोधनाचे सामर्थ्यशाली माध्यम कीर्तन आहे. कीर्तनकार प्रबोधनाच्या माध्यमातून सर्व जातीचे कांगोरे कमी करण्याचे प्रयत्न करीत असतो. या परिषदेत वारकरी शिक्षण संस्थेबद्दल जी चर्चा झाली त्यानुसार आता त्यांना व्यावसायिक कार्याचे प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे. वारकरी संप्रदायात शिस्तबद्ध आणि ज्यांना व्हिजन आहे अश्या लोकांची खूप गरज आहे. या संप्रदायाने आता मिशन ठेऊन मार्गावर चालावे. डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, ऐतिहासिक परिषदेतून असे सरपंच आणि महाराज तयार व्हावे जेणे करून देशात परिवर्तनाची लाट आली पाहिजे. जीथे अध्यात्माचा बेस असतो तेथे विकास असतोच. त्याच प्रकारे राजकारणात चारित्र्यवान लोक निर्माण करण्यासाठी भारतातील पहिली एसओजी संस्थेची निर्मिती केली आहे. आज याच माध्यमातून राज्यात दोन आमदार व देशात ८ आमदार निवडून आले आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी नव नवीन प्रयोग सातत्याने राबविले जात आहे. यशोधन महाराज सारखे म्हणाले, वारकरी संप्रदाय हा परोपकारी संप्रदाय आहे. कीर्तनकारांनी आपल्या आचरणातून आदर्श निर्माण करावा. या परिषदेतून समोर आलेल्या वेगवेगळ्या समस्यांच्या समाधानांचे निराकरण करण्यासाठी संतांनी सांगितलेल्या विचारांवर विचार विमर्श करावा लागेल. तसेच सामाजिक समस्यांसाठी वारकरी संप्रदायाने विचार करावा. यानंतर हभप रामकृष्ण महाराज वीर महाराज आणि विश्वनाथ महाराज वारिंगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजाला खरी दिशा देण्याचे कार्य केवळ वारकरी संप्रदाय आणि सरपंच करू शकतात. वारकरी संप्रदाय हा विश्वधर्मी असून स्वामी विवेकानंदाच्या स्वप्नातील भारत निर्मितीच्या कार्यात अनमोल वाटा असेल. कल्याणाची आणि विकासाची मुळ कल्पना घेऊन वारकरी संप्रदायाने मानवी मूल्यांचे मुळ तत्व धरून कार्य करीत आहेत. सूत्रसंचालन डॉ. शलिनी टोणपे यांनी केले. योगेश पाटील यांनी आभार मानले.

## महत्वाचे...



### चिप्पा मार्केट सुरु करण्यासाठी आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

पूर्व विभागातील चिप्पा मार्किट गेल्या ३० वर्षांपासून ओसाड पडलेला आहे. यामुळे याठिकाणी अनेक गैरप्रकार व गैरकृत्य होत आहेत काही महिन्यापूर्वी एक अज्ञान व्यक्तीचा खून करण्यात आला तसेच या ठिकाणी दारूचा अड्डा बनलेला आहे. यामुळे येथील राहणाऱ्या नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेला आहे. तरी चिप्पा मार्केट मनपाच्या वतीने सर्व सोयी उपलब्ध करून त्वरीत सुरु करावे, अशा मागणीचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले. यावेळी निरंजन बोध्दूल, पुरुषोत्तम बोगा, महेश धारा, व्यंकटेश बोध्दूल. सिद्धू कस्तूरी आदी उपस्थित होते.


### अनधिकृत भाजी विक्री अतिक्रमण हटविण्यासाठी सह्यांची मोहीम

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

पूर्व भागातील ७०फूट रोडवरील अनाधिकृत भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमण महानगरपालिका प्रशासनाने हटविल्यापासून, ७० फूट रोडच्या परिसरातील गल्ली बोळात भाजी विक्रेते बसत आहेत. त्या विरोधात मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या वतीने, सह्यांची मोहीम राबविण्यात आली. यावेळी विष्णू कारमपुरी, सोहेल शेख, प्रसाद जगताप, संतोष जाधव, विठ्ठल कुराडकर, लक्ष्मीकांत कोडम, पप्पू शेख, शरणप्पा जगले, रेखा आडकी, राधिका मिठ्ठा, सविता दासरी, लक्ष्मी गुंटला विजयालक्ष्मी रच्चा, यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### शेतात काम करताना वृध्दाला सापाचा दंश; डिकसळ येथील घटना

**सोलापूर, दि. २१ जुलै -**



डिकसळ परिसरातील शेतात काम करताना श्रावण सिताराम धोत्रे (वय ६५) यांना सापाने दंश केला. हा प्रकार सोमवारी दुपारी एकच्या सुमारास घडला असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. श्रावण याचे डिकसळ परिसरात शेत आहे. सोमवारी दुपारी एकच्या सुमारास ते शेतात काम करत होते. त्यावेळी त्यांच्या उजव्या हाताला सापाने दंश केला. त्यांच्यावर मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून डॉक्टराच्या सल्लयानुसार दुपारी २.२० वाजता मुलगा अविनाश धोत्रे याने उपचारास दाखल केले असून रुग्ण शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### पाडकाम करताना सिमेंटचा गट्टू पडून मजूर जखमी

**सोलापूर, दि. २१ जुलै -**

जुळे सोलापुरातील रेणुका नगर येथे घराचे पाडकाम करताना सिमेंटचा गट्टू पडून मजूर जखमी झाला. हा प्रकार आठ दिवसांपूर्वी घउला असून या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे चंद्रकांत नागनाथ गायकवाड (वय ३०,रा. दोड्डी ता. द. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. चंद्रकांत हा मागील आठ दिवसांपूर्वी जुळे सोलापुरातील रेणुका नगर येथे घराचे पाडकाम करत होता. त्यावेळी त्याच्या पायावर सिमेंटचा गट्टू पडला. यात त्याच्या उजव्या पायाला जखम झाली खासगी रुग्णालयात उपचार करून सोमवारी दुपारी १.१० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### म्हशी पळवण्याच्या नादात पडून वृध्द जखमी


**सोलापूर, दि. २१ जुलै -**

सोलापूर : म्हशी पळवण्याच्या नादात ६३ वर्षाचा वृध्द पडून जखमी झाला. हा अपघात काडादी चाळ येथे सोमवारी घडला. अशोक नातु कोकाटे (वय ६३, रा. काडादी चाळ) असे जखमीचे नाव आहे. अशोक यांच्या राहत्या घराजवळ म्हशी पळवण्याचा कार्यक्रम होता. त्यावेळी अशोक हे म्हशी पळवण्याच्या नादात तोल जाऊन पडले. त्यात त्यांच्या डोक्याला मार लागल्याने पत्नी छाया कोकाटे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोरवलीजवळ दुचाकी घसरून तरुण जखमी

**सोलापूर, दि. २१ जुलै -**

मोहोळ तालुक्यातील कोरवली येथून दोन किमी अंतरावर अचानक दुचाकी घसरून झालेल्या अपघातात कोरवली येथ्रील तरुण जखमी झाला. हा प्रकार सोमवारी तीनच्या सुमारास घडला. श्रीकांत तानाजी भोसले (वय २६, रा. कोरवली ता. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. सोमवारी तीनच्या सुमारास श्रीकांत हा दुचाकी चालवित वटवटे ते कोरवली असे जात होता. कोरवली पासून दोन किमी अंतरावर दुचाकी अचानक घसरल्याने श्रीकांत जमिणीवर पडला. यात त्याच्या चेह-याला, डोक्याला जखम झाली आहे. दरम्यान चारच्या सुमारास भाऊ किसन याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### कुकरचे भांडे फुटून महिला जखमी

**सोलापूर, दि. २१ जुलै -**

राहत्या घरी स्वंयपाक करताना कुकरचे भांडे फुटून चेह-याला भाजून महिला जखमी झाली. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे रविवारी सायंकाळी ६ वाजता घडली निंगम्मा श्रीशैल हंचनाळ (वय ३५, रा. दुधनी ता. अक्कलकोट) असे भाजून जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास निंगम्मा या त्यांच्या राहत्या घरात स्वयंपाक करत होत्या. त्यावेळी अचानक कुकरचे भांडे फुटल्याने त्यांच्या चेह-याला भाजले. अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ११.३० वाजता पती श्रीशैल याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# ग्राहकांच्या उन्नतीसाठी बँक ऑफ इंडीया कटिबध्द

## गीता नटराजन यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै**

बँक ऑफ इंडिया नेहमी ग्राहकांच्या विकासासाठी काम करीत आहे. बचत गटांच्या महिला उन्नतीसाठी विविध कर्जयोजना सुरू झाल्याने महीला सक्षमीकरणासाठी मदत होत आहे. शिवाय विविध कर्ज योजनेतून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बँक ऑफ इंडियाचे काम सदैव कार्यरत आहे. ग्राहकांनी नियमित कर्ज परतफेड करून बँक ऑफ इंडियाच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे . बँक ऑफ इंडिया ही ग्राहकांच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्य प्रबंधक गीता नटराज यांनी केले.

मंद्रूप येथील किसान दिनानिमित्त ग्राहक संमेलन मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बचत गटातील महिला व शेतकरी कर्जदारांना मंजुरी पत्र वाटप करण्यात आले. यावेळी विभागीय प्रबंधक चंद्रशेखर मंत्री, वरिष्ठ प्रबंधक अतुल चव्हाण, आरसीईटी व्यवस्थापक दीपक वडेवाले, कंदलगाव शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर भिसे, निंबर्गी शाखा व्यवस्थापक गणेश जगताप, टाकळी शाखा व्यवस्थापक नागेश टिंगी, फताटेवाडी शाखा व्यवस्थापक सुमित जटवा, आहेरवाडी शाखा व्यवस्थापक काशी बाबू, मंद्रूपच्या कृषी अधिकारी रुचिरा कट्टे, अविनाश जोकारे यांच्यासह मंद्रूपच्या सरपंच अनिता कोरे, रेखा कदम, प्रदीप बांगळे आदी उपस्थित होते.

यावेळी मंद्रुपचे शाखा व्यवस्थापक सिध्दाराम खट्टे यांनी पंतप्रधान जन सुरक्षा योजना, बँकेच्या विविध योजना, बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश जोकारे यांनी केले. चिमराया कांबळे यांनी आभार मानले.

# कृषीमंत्री कोकोटेंबाबत निर्णय पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील

## •राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळात रमी हा पत्त्यांचा गेम खेळत असल्याचा एक व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. कृषीमंत्री कोकाटे यांच्या बाबतीत जो व्हिडीओ आलाय; त्याबाबतीत विधिमंडळ नेते आणि पक्षाचे नेते निर्णय घेतील, अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना आज (दि.२१) दिली.

राष्ट्रवादी कार्यकर्ते-पदाधिकारी मेळावा झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत खा. तटकरे पुढे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीनंतर आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लवकरच होणार आहेत. यासाठी पक्षाचे मजबूत संघटन करणे आणि कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी मी राज्यभर फिरत आहे. जळगाव, नंदूरबार, नाशिक व मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मी जावून आलो आहे. या ठिकाणचा उत्फूर्त पाठिंबा पाहून मला समाधान वाटले. त्या-त्या भागातील कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांच्या भावना मी जाणून घेतल्या असून, त्याचा अहवाल मी वरिष्ठ नेत्यांकडे देणार आहे आणि त्यानंतरच आगामी निवडणुकांच्या उमेदवारीचा विषय



समोर येणार आहे. प्रामाणिक कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांत संधी देण्याचा माझाही प्रयत्न राहणार आहे.

निर्धार नवपर्वाचा हे ब्रीदवाक्य समोर ठेवून मी प्रदेश दौरा सुरु केलाय. सध्या माझा पश्चिम महाराष्ट्राचा दौरा आहे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका पाहून आढावा या बैठकीत घेतोय. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा त्यानंतर आज सोलापुरात कार्यकर्त्यांचा उदंड प्रतिसाद होता. मुंबईतील साखळी स्फोटाच्या निकालावर बोलताना तटकरे म्हणाले की, उच्च न्यायालयात सक्षम वकीलांनी बाजू मांडली असेल. मी प्रदेश दौऱ्यावर असल्याने या निकालाची मला सखोल माहिती नाही. याबाबत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा हे सगळे या बाबतीत गंभीर आहेत. राज्य सरकारने या विषयात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली पाहिजे, असं मला वाटतं. दरम्यान, यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या नियुक्तीवरून विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना तटकरे म्हणाले की, मी त्यांच्या निवडीचे स्पष्टीकरण देण्यासाठी आलो नाही; कार्यकर्त्यांचे मनोगत समजून घेण्यासाठी आलो आहे. या सर्वांच्या भावना वरिष्ठांच्या कानावर घालेन. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि अजितदादा यांच्याशी देखील मी चर्चा करेन, त्याबाबतीतला निर्णय प्रदेश पातळीवर होईल.

सूरज चव्हाण आणि कृषीमंत्री कोकाटे राजीनाम्यावर बोलताना तटकरे यांनी सांगितले की, सुरज चव्हाण यांना राजीनामा द्यायला सांगितलं आणि त्यांनी राजीनामा दिलाय, त्या संदर्भात कारवाई पूर्ण झाली. तर कृषीमंत्री कोकाटे यांच्याबाबतीत जो व्हिडीओ आलाय त्याबाबतीत विधिमंडळ नेते आणि पक्षाचे नेते निर्णय घेतील. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळात रमी हा पत्त्यांचा गेम खेळत असल्याचा एक व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हिडीओनंतर राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे राज्यात शेतकरी संकटात आहे आणि कृषीमंत्री ऑनलाईन जुगार खेळत आहेत, अशी टीका केली जात आहे. कोकाटे यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली जात आहे. याबाबतचा जास्तीचे बोलण्यास खा. तटकरे यांनी नकार दिला.



# जलजीवन मिशन प्रशिक्षण उपक्रमास उत्फूर्त प्रतिसाद

## •सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

केंद्र शासनाचा महत्वकांशी प्रकल्प असलेला जलजीवन मिशन अंतर्गत स्रोत बाळकटीकरण व शाश्वतीकरण या विषयी चे प्रशिक्षण पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे झाले. त्याचा समारोप या प्रशिक्षणाचा समारोप शिवस्मारक सभागृहाचे समिती अध्यक्ष रंगनाथ बंकापुरे, जैन समाजाचे प्रदेश उपाध्यक्ष पदमचंद राका आणि भीम प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या प्रशिक्षणाचे आयोजन ज़िल्हा परिषद सोलापूर, पंचायत समिती दक्षिण सोलापूर व पृथ्वीसंग्राम ग्रामविकास संस्था (कडेपूर, सांगली) आणि परिश्रम ग्रामीण विकास संस्था (मंगळवेढा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रशिक्षणार्थिनी गटचर्चा, खेळ या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन दक्षिण पंचायत समिती सोलापूरचे गट विकास अधिकारी सुभाष कवितके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रशिक्षणात यशदाचे प्रशिक्षक भीमराव तुळजापूरे, सौदागर देवघन, उषा चव्हाण, कल्पना चव्हाण आणि सिद्धांत बाबरे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तालुका समन्वयक गौरी तुपे, दिपा धेंडे, उपविभागीय पाणी गुणवत्तेचे सोनाली कुलकर्णी, माणकेश्वर वाघे, विकास कानकूर्ते यांनी परिश्रम घेतले. तसेच संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब यादव, मनुष्यबळ विकास सल्लागार तज्ञ शंकर बंडगर, संस्थेचे जिल्हा समन्वयक रजाक शेख व पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचे सहकार्य लाभले.

# क्रीडा

# राज्य खो-खो पंच शिबिराने साताऱ्यात गाठला नवा टप्पा

## राज्यातील सर्वाधिक नोंदणीसह यशस्वी आयोजन; पंचांच्या दर्जात होणार वाढ

**सातारा, २१ जुलै-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सातारा जिल्हा मॅच्युर खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य खो-खो पंच शिबिर यंदा साताऱ्यात अत्यंत उत्साहात पार पडले. शिबिरात ५८० नोंदणीपैकी तब्बल ४०६ पंचांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वाधिक उपस्थिती असलेली राज्यस्तरीय खो-खो पंच प्रशिक्षण कार्यशाळा ठरली.



निर्मल हॉटेल येथे पार पडलेल्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव अध्यक्षस्थानी होते. भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र संघटनेचे खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, संदीप तावडे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून पंचांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तांत्रिक समिती, पंचमंडळ व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. या शिबिरात पंचांना नव्या नियमांची माहिती, तांत्रिक मार्गदर्शन, प्रत्यक्ष मैदानावर येणाऱ्या समस्यांचे सादरीकरण तसेच व्हिडिओ विश्लेषण अशा आधुनिक व परिपूर्ण पद्धतींनी प्रशिक्षण देण्यात आले. डॉ. जाधव यांनी सांगितले की, ''विश्वचषक स्पर्धे नंतर महाराष्ट्राच्या पंचांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व परिणामकारक काम करणारे बनवण्यासाठी हे शिबिर अत्यंत महत्त्वाचे ठरेल.''

प्रशिक्षक मंडळात प्रशांत पाटणकर, सुधाकर राऊळ, नरेंद्र कुंदर, नागनाथ गजमल यांचा मोलाचा सहभाग राहिला तसेच यांपंच व तांत्रिक मंडळाच्या सदस्यांनी सुध्दा मोलाचे मार्गदर्शन केले. या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने पंचांचा आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता अधिक बळकट झाली. व्हिडिओ ओडीओ सादरीकरणामुळे प्रशिक्षण अधिक प्रभावी ठरले. कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन सातारा जिल्हा मॅच्युर खो-खो असोसिएशनतर्फे करण्यात आले. कार्याध्यक्ष मनोहर यादव यांनी प्रास्ताविक केले. सरचिटणीस महेंद्रकुमार गाढवे यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन वसुंधरा पवार-कदम यांनी केले. खजिनदार प्रशांत कदम, पंचमंडळ अध्यक्ष अनिकेत मोरे, सदस्य प्रसाद गुजर, सुमित निकम यांचाही संयोजनात सक्रिय सहभाग होता. या शिबिराला सातारा जिल्हा क्रीडा कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभले. सातारा जिल्हा मॅच्युर खो-खो असोसिएशनने शिबिरातील सर्वांची निवास व भोजन व्यवस्था सुध्दा अप्रतिम केली होती. साताऱ्यात पार पडलेले हे पंच शिबिर केवळ संख्यात्मकदृष्ट्या नव्हे तर गुणवत्तेच्या दृष्टीनेही ऐतिहासिक ठरले. आगामी स्पर्धांमध्ये या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन महाराष्ट्रातील पंच नवे उच्चांक गाठतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



अकलूज : राज्य बुद्धिबळ स्पर्धेतील विविध गटातील बक्षीसपात्र खेळाडूंसमवेत कृष्णप्रिया मोहिते-पाटील व मान्यवर.

# खुल्या गटात पार्थ वाळेकर व शशिकांत बनसोडे प्रथम

## ▸▸प्रताप क्रीडा मंडळाच्या रत्नाई चषक राज्य बुद्धिबळ स्पर्धेत ५४० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. २१ जुलै-**

प्रताप क्रीडा मंडळाच्या रत्नाई चषक राज्य बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या माळशिरस तालुकाबाह्य गटात पार्थ वाळेकर व माळशिरस तालुका गटात शशिकांत बनसोडे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या रत्नाई चषक राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत ५४० खेळाडूंनी सहभाग घेतला.

श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या १०१व्या जयंती निमित्त स्मृतीभवनच्या महर्षी हॉल येथे आयोजित केलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन ऋतुजादेवी मोहिते पाटील, कृष्णप्रिया मोहिते पाटील व राष्ट्रीय बाल खेळाडू अनन्या बाळापुरे यांच्या हस्ते झाले. कृष्णप्रिया मोहिते पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. यावेळी उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे, प्रवीण ढवळे, मल्हारी घुले आदी उपस्थित होते. स्पर्धेचे पंच उदय वगरे, रमेश जाधव, गणेश मस्कले, विद्याधर जगदाळे, दत्तात्रय गोरे, कर्णाक्षी जाधव, महादेव आठवले, राहुल बोराटे, अली शेख, प्रभावती लंगोटे, अनिता बावळे यांचा सत्कार करण्यात आला. निकालाचे वाचन किरण सूर्यवंशी, राजकुमार पाटील, इलाही बागवान यांनी केले.

### माळशिरस तालुक्यातील ७ खेळाडूंना आंतरराष्ट्रीय नामांकन

प्रस्ताविकात अभिजीत बावळे म्हणाले, मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या स्पर्धेत सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, मुंबई, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्यातून ५४० खेळाडूंनी सहभाग घेतला. ही स्पर्धा १२ वर्षे, १७ वर्षे व खुला अशा तीन गटांसाठी व माळशिरस तालुक्यातील याच स्वतंत्र गटासाठी एकुण ६० रोख बक्षिसे, ६० चषके, ६० पदके तसेच प्रत्येक गटात २० पेक्षा अधिक बक्षिसे देण्यात आली. माळशिरस तालुक्यातील ७ खेळाडूंना आंतरराष्ट्रीय नामांकन मिळाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

### स्पर्धेतील गटनिहाय निकाल

**प्रथम तीन : १२ वर्षे** : तालुकाबाह्य : वेदांत पेडणेकर, श्वेतांजली जाधव, हर्ष जाधव
माळशिरस तालुका : सार्थक राऊत, निधीशा देशमाने, ओम राऊत
**१७ वर्षे : तालुकाबाह्य** : आर्यन परदेशी, सानवी गोरे, नागेश राजमाने .
माळशिरस तालुका : श्रीराम राऊत, रक्षिता जाधव, पार्थ पाटील
**खुला : तालुकाबाह्य** : पार्थ वाळेकर, दिपक क्षीरसागर, महेश पवार.
माळशिरस तालुका : शशिकांत बनसोडे, सौरभ जगताप, अनिरुद्ध गुरव.



# मार्शल आर्ट स्पर्धेत उत्स्फूर्त खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर आयोजित जिल्हा जीत कुने-डो मार्शल आर्ट स्पर्धेत जिल्ह्यातील विविध भागांतील १२५ हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या स्पर्धेमध्ये फाईट व इव्हेंट अशा दोन्ही प्रकारांचा समावेश होता. महालक्ष्मी मंगल कार्यालय, सुंदरम नगर येथे ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन ग्रँडमास्टर युवराज गायकवाड, सोलापूर महानगरपालिका माजी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, प्रा. अपूर्वा, टेक्निकल डायरेक्टर आनंद जाधव, किशोर चंदनशिवे, भास्कर देडे, संजय बनसोडे आदींच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये असोसिएशनचे मास्टर सम्राट गायकवाड, अनुराग देडे, संदीप गायकवाड, नागेश कांबळे, सुमित पाटील, श्रवण घोलप, तसेच लेडीज कोच सत्यभामा गायकवाड, वैभवी दळवी, किमया सपाटे, मोनिका गायकवाड यांचे सहकार्य लाभले. संघाच्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा प्रमुख अभिजीत गायकवाड यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरविण्यात आले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस सोलापूर येथील डी।। व सब डी।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मोजे भोगांव ग्रामपंचायत हद्दीतील गट नं ४८ पैकी बिनशेती प्लॉट नं. ५ याचे एकूण क्षेत्र १५१.१४ चौ.मी. इतके असून यांसी चालू ऑनलाईन उतारानुसार क्षेत्र १.५१.१४ आर चौ.मी. इतके असून यातील लिहून देणार यांची संपूर्ण सामाईक अविभक्त हिस्सा क्षेत्र १.५१.१४ चौ.मी. अथवा १.५१.१४ आर चौ.मी. इतकी घरजागा आहे. यांसी क्षेत्र १६२६ स्के. फुट इतकी असून यात १२६७ इतके बांधकाम केलेली आहे. यात १ हाल, १ मास्टर बेडरूम, व १ बेडरूम व किचन व संडास बाथरूम असे बांधलेली घर जागा आहे.

वर नमूद मिळकत कृष्णात गोविंदराव मोरे यांच्या मालकीचे व कब्जे वहिवाटीचे आहे. सदर वर नमूद मिळकत कृष्णात गोविंदराव मोरे यांनी आमचे अशिल अक्षयकुमार सुर्यकांत शेंद्रे यांना विक्री करण्याचे ठरवून १६/०७/२०२५ रोजी इशारापावती करार करुन इशारा रक्कम घेतलेली आहे. तरी सदर वर नमूद मिळकती बाबत कृष्णात गोविंदराव मोरे यांनी आमच्या अशिलास सदर मिळकतीवर कसल्याही प्रकारचा बोजा नाही असे खात्री दिलेली आहे, तरी सदर जाहीर नोटिसद्वारे कळविण्यात येते की सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, वहिवाट, टाच, जब्ती, बोजा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाच्याही कसलीही हरकत न आल्यास ही मिळकत निर्बंध व निजोखिमी आहे, असे समजून आमचे अशिल पुढचा व्यवहार करणार आहे. व तद्नंतर कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. हे नोटीस दिली तारीख २१/०७/२०२५

सही/-
ॲड. हरीसिंग जा. राजपूत
(बी.काम., एम.एस.डब्ल्यू., एल.एल.बी.)
अ-३९, शिवगंगा नगर भाग-१, जुळे सोलापूर
मोब. - ९६२३५२२७८९
(अशिल अक्षयकुमार सुर्यकांत शेंद्रे तर्फे ॲडव्होकेट)

### जाहीर नोटीसीस हरकत व खुलासा

दिनांक १९/०७/२०२५ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात मतीन हमिद नदाफ यांनी ॲड. के.एम. शेख व ॲडव्होकेट एम.ए. नलवार मार्फत जाहीर नोटीसीद्वारे दि. १९/०७/२०२५ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात मतीन हमिद नदाफ यांनी सर्वे नं.१७/३/ब प्लॉट नं.९ या जागी संदर्भात आमिर जाहिगीर पठाण यांना विक्री करवण्याचे ठरले असून केलेची नोटीस प्रसिध्द केली. सदर जाहिर नोटीसीस आमचे अशिलाची युन्नुस हुसेन नदाफ यांची सक्त हरकत आहे. प्रस्तुत हरकतीने व खुलाश्याने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील दहिटणे येथील मिळकत सर्वे नं.१७/३/ब पैकी लाल बहादूर शास्त्री या नावाने ओळखला जाणारा नगरातील प्लॉट नं.९ घर नं.१२८ए मनपा मिळकत क्रमांक ५२४१६५ एकूण क्षेत्र ५२३० चौरस फुट अथवा ८४६ ११३.५० चौ.मी. आहे. सदर जागेपैकी दक्षिणेकडील निम्मी जागा यासी हद्द पुर्व पश्चिम २४.३ मी. दक्षिणोत्तर १० मी. असे एकूण क्षेत्र २४३. अथवा २६१५ चौ. फुट इतके आहे. व वरती पनाळी पत्रे घातेलेली एक खोली असून दक्षिणे प्लॉट नं.८ पश्चिमेस रस्ता उत्तरेस प्लॉट नं.९ राहिलेली पैकी निम्मी जागा असे आहे.

वर नमूद मिळकती ही, जहराबी हुसेनसो नदाफ यांचा मालकीची असून जहराबी हुसेनसो नदाफ है दि. २३/०७/२००४ रोजी मयत झालेला आहे. त्या पश्चात वारसदार **१.** अ. रहेमान हुसेन नदाफ **२.** युन्नुस हुसेन नदाफ **३.** अ. हमीद हुसेन नदाफ **४.** शहनाज हसन खान असे वारसदार आहेत. सदर जाहिर नोटीस मधील माहिती खोटी व लबाडीची आहे वर नमूद मिळकतीवर मतीन हमीद नदाफ यांना कोणताही कसलेही प्रकारे संबंध नाही वर नमूद मिळकतीवर ७/१२ उतारावर व फेरफार क्र. १३८९ यावर मयत जहराबी हुसेनसो नदाफ यांचे नाव आहे. व सदर ७/१२ उतारावर मयत यांचे पश्चाताप कोणाचाही नाव ७/१२ उतारावर लावलेला नाही. तसेच आमचे अशिल युन्नुस हुसेन नदाफ, शहनाज हसन खान यांनी वर नमूद मिळकतीवर वारस आहे. म्हणून नावे नोंद करण्याकरीता तलाठी यांच्याकडे दि. ०४/०४/२०२५ अर्ज दिलेला आहे व तसेच मतीन हमीद नदाफ यांचे ७/१२ उतारावर नाव किंवा वारसदार असे म्हणून कोठेही उल्लेख नाही. तसेच वर नमूद मिळकती संदर्भात हा कोणतेही कसलाही प्रकारे खरेदी-विक्री करण्यात येऊ नये. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही नोटीस व खुलासा प्रसिध्द केला.

सबब हे जाहीर नोटीसीस हरकत दिली तारीख २१/०७/२०२५

सही/-
ॲड. विशाल डि. कांबळे
रा. यश नगर, अवंती रोड,
जुना पुणे नाका, सोलापूर
मो.नं. ८३०८६५०२०९

### IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम 13 (2) सूचना दिनांक | कलम १३ (2) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 140813444 | मालमत्तेवर कर्ज | 1. विनायक शंकर हक्के (दिवंगत सीताराम विनायक हक्के यांचे कायदेशीर वारस म्हणून) 2. विनायक शंकर हक्के | 21/05/2025 | INR 8,26,305.94/- |

**मालमत्तेचा पत्ता** : दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घराचे सर्व तुकडे आणि पार्सल, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला 500.00 आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = 500.00 चौ. फूट, एकूण जमीन 1400 चौ. फूट, नाजिकपिंपरी मिलकट क्रमांक 811 येथे राहते, नाजिकपिंपरी गावाच्या आत, ता: मोहोळ, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१३, आणि, **सीमा :- पूर्वेकडे** - मिळकत क्रमांक 810, **पश्चिमेकडे** - मिळकत क्रमांक 715, **उत्तरेस** - रस्ता, **दक्षिणेस** - मिळकत क्रमांक 805

या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : 22/07/2025**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ३० वर्षांखालील कागदपत्रे स्कॅनिंगनंतर नियमबद्ध प्रक्रियेनुसार नष्ट करावेत

- विविध कार्यालयांच्या पाहणीवेळी आयुक्त डॉ. ओम्बासेंचे आदेश
- माझे कार्यालय;सुंदर कार्यालयसाठी कार्यवाही करा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची पाहणी केली. ३० वर्षांखालील कागदपत्रांचे स्कॅनिंग करून डिजिटायझेशन करावे आणि संबंधित नोंदी संगणकीय स्वरूपात जतन कराव्यात त्यानंतर मूळ कागदपत्रे नियमबद्ध प्रक्रियेनुसार नष्ट करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी दिले.

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसाच्या विशेष कार्यक्रमांतर्गत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची पाहणी केली. नगर अभियंता, स्टोर विभाग, वाहन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, भूमी व मालमत्ता विभाग, मालमत्ता कर विभाग, अभिलेखापाल कार्यालय आदी विभागांच्या कार्यालयांची पहाणी केली.

या पाहणी दरम्यान आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी कार्यालयांतील कागदपत्रांचे व्यवस्थापन सुधारण्याच्या दृष्टिकोनातून ठोस सूचना दिल्या. कार्यालयातील जुन्या कागदपत्रांचे 'अ, ब, क, ड' या पद्धतीने वर्गीकरण करावे. या पद्धतीनुसार अत्यावश्यक, उपयुक्त, निष्क्रिय व नष्ट करण्यायोग्य अशा स्वरूपात दस्तावेजांचे वर्गीकरण करण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना दिल्या. महानगरपालिकेच्या या कार्यपद्धतीमुळे माहिती व दस्तऐवज व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होईल आणि नागरिक सेवा अधिक गतिमान आणि प्रभावी होईल, असा विश्वास आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी व्यक्त केला. यावेळी सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सामान्य प्रशासन विभागाचे रजाक पेंढारी, मिळकतकर विभागाच्या अधीक्षक युवराज गाडेकर, मुख्य लेखाधिकारी रत्नराज जवळगेकर, नगर अभियंता सारिका आकुलवार, किशोर सातपुते यांच्यासह विभागाचे सर्व अधिकारी यावेळी उपस्थित होते.



### बसण्यासाठी सुसह्य होईल असे कार्यालय ठेवा

''माझे कार्यालय - सुंदर कार्यालय'' हे घोष वाक्य लक्षात घेऊन बसण्यासाठी सुसह्य होईल असे कार्यालय ठेवा. कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता व कार्यक्षमतेत वाढ करणे, जागेचा योग्य वापर करणे आणि दस्तऐवज सहज व जलद उपलब्ध व्हावा. त्यानुसार प्रत्येक विभाग प्रमुखांनी वेळेत कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देशही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे दिले.




## महिलेस जातीवाचक शिवीगाळ; तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

घरासमोर होणाऱ्या खोदकामाची विचारणा केली असता जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. याप्रकरणी तिघांविरुद्ध विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २० जुलै रोजी लक्ष्मीनारायण चंडक नगर, सैफुल या ठिकाणी घडली.

याबाबत सुरेखा अविनाश तकत वय ४० यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महादेव पवार, अमोल राठोड, एक अनोळखी इसम (सर्व. रा. चंडक नगर सैफुल) यांच्यावर गुन्हा दाखल आहे. आरोपी व फिर्यादी हे शेजारी आहेत. फिर्यादी सुरेखा तकत यांच्या घरासमोर खोदकाम चालू होते. त्यावेळी फिर्यादीने आरोपी महादेव पवार यास विचारणा केली. त्यांनी फिर्यादीस सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक बोलून, फिर्यादीच्या पतीचा अपमान केला. आरोपीने अविनाश तकत यास हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादी सुरेखा या भांडण सोडवण्यासाठी गेले असता त्यांना देखील शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. महादेव यांचा साथीदार अमोल व अनोळखी इसम यांनी हातात वाश्याचे लाकडी दांडके घेवून दहशत निर्माण केली. सुरेखा यांचा भाचा सुनिल याला देखील जातीवाचक शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. तसेच तुम्हाला जगू देणार नसल्याची धमकी दिली. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर करीत आहेत.

## शिक्षण विभागाला हजर राहण्याचे आदेश

### मुख्याध्यापकांच्या तक्रारीवरून आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै -**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्यावर विनाकारण कारवाई केल्याबद्दल सदर मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी मुंबई येथील हायकोर्टात दावा दाखल केले होते. त्यानुसार संबंधित महाराष्ट्र शासन विरोधात सुनावणीसाठी सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी अक्कलकोट आणि गटशिक्षण अधिकारी अक्कलकोट यांच्या विरोधात न्यायालयात दावा दाखल केल्याने न्यायालयात हजर राहण्यासाठी दिनांक एक ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. सर्वांना हजर राहावे असे न्यायाधीशाने आदेश बजावले.

सदर मुख्याध्यापक त्यांच्या विरोधात सहा जानेवारी तक्रार दाखल झाल्यानंतर अवघ्या पाच दिवसात विना चौकशी करता त्यांच्यावर कारवाई करण्यात आले आहे. त्या विरोधात मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी मुंबई येथील हायकोर्टात दाद मागितले आहे. गटशिक्षण अधिकार्यांच्या चुकीमुळे जिल्हा परीषद व शिक्षण विभागाला त्रास सहन करावे लागत आहे.

## मेहता शाळेत पालक-शिक्षक संघ सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

जुळे सोलापूर येथील कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत येथे पालक-शिक्षक संघ सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी संस्कारगीत सादर केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धन्यकुमार बिराजदार (प्रा. ह. दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर) होते. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सभेस शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. पीपीटीद्वारे शाळेच्या



प्रगतीचा आढावा दाखविण्यात आला. पाहुण्यांचा परिचय शितल जालिमींचे यांनी करुन दिला व इयत्ता पहिली सीबीएससी पॅटर्न बद्दल माहिती सांगितली. जुन्या कार्यकारणीतील सदस्यांना निरोप देण्यात आला. व नवीन कार्यकारणीतील सदस्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते धन्यकुमार बिराजदार यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 याविषयी माहिती सांगत मुलांच्या शैक्षणिक विकासात पालकांची जबाबदारी महत्त्वाची आहे, असे सांगितले. सूत्रसंचालन योगेश सरवदे यांनी केले तर आभार सुनेत्रा मोहोळकर यांनी केले.

## दहशत निर्माण करणारे तीन गुन्हेगार तडीपार

**सोलापूर :** मारहाण व दमदाटी करणे, मालमत्तेचे नुकसान करून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या टोळीला फौजदार चावडी हद्दीतून दोन वर्षासाठी तडीपार केले आहे. सोलापूर व धाराशिवतून तडीपार केल्यानंतर गुलबर्गा या ठिकाणी सोडण्यात आले. टोळीतील नवाब अ. जब्बार शेख (वय २८) अशपाक अ.जब्बार शेख (वय ३३, दोघेही रा. बाबा कादरी मशीद जवळ उत्तर कसबा) समद उर्फ अल्लू मकतूम शेख (वय३९ रा उत्तर कसबा) अशी तडीपार केलेल्यांची नावे आहेत. त्याच्या तडीपारीचा प्रस्ताव फौजदार चावडी पोलिसांनी दिला. पोलिस उपायुक्त विजय कबाडे यानी कारवाई करीत तडीपार केले

## धर्मांतर करण्यास लावणाऱ्या चर्चच्या फादरविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

शहरातील वांगी रोड, भूषण नगरातील महिलांना धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकणाऱ्या फादरवर सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. संगीता कैलाश रजपूत (वय ५९ रा.५१ भूषण नगर १ वांगी रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रवी फादर(वय ५५ रा. भुषण नगर भाग १ वांगी रोड) यांच्यावर रविवारी रात्री गुन्हा दाखव आहे.

शहरातील वांगी रोड, भूषण नगर भाग १ या परिसरात संगीता रजपूत या ३५ वर्षापासुन राहत आहेत. त्याच परिसरात रजपूत यांच्या घराशेजारी रवि फादर हे देखील ९ वर्षापासुन त्याच्या कुटुंबासह राहण्यास आहेत. फादर रवि याने त्याच्या घरासमोर लहानसा पत्र्याच्या शेडमध्ये चर्च बनविले आहे. फादर हा फिर्यादी महिलेस काही महिन्यापासून वारंवार चर्च मध्ये येत जा, आणि धर्माचे गाणे वगैरे ऐकुन म्हणत जा असे सांगत होता. परंतु रजपूत यांनी त्यांच्याकडे कायम दुर्लक्ष केले. मागील १ वर्षापासुन रवि फादर हा रजपूत यांच्या घरासमोर आला. फिर्यादी महिलेस म्हणाला की, तुमचे देव चांगले नसुन तो राक्षस (शैतान) आहे. तरी तुमचा देव तुमचे कल्याण करणार नाही. तरी ते आमच्या देवाचा स्वीकार करा असे म्हणाला. एका फॉर्मवर सहि करा त्यानंतर तुम्हाला दहा हजार रुपये मिळतील. ते आश्रमाला दान करुन दान केल्याने तुम्हाला पुण्य लागेल असे तो सांगत होता. परंतु त्या फॉर्मवर फिर्यादीने सही केली नाही. २० जुलै रोजी सकाळी ११ वा. च्या घरासमोर फिर्यादी शेजारील पद्मिनी पाटील, मुक्ता माळी, वनिता माळी व आशा राक्षे असे मिळुन गप्पा मारत बसले होते. तेव्हां रवि फादर म्हणाला कि, मी तुम्हाला किती दिवसापासुन सांगत आहे कि, तुमचे देव चांगले नसुन तुमचे देव तुमचे कल्याण करणार नाही. तरी ते तुम्ही पाण्यात टाकुन द्या. ख्रिश्चन धर्माचा स्विकार करा. फॉर्मवर केल्यास दहा हजार रुपये देतो असे पैशाचे वारंवार आमिष दाखवुन तुम्हाला ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव टाकत असल्याचे संगीता रजपूत यांनी सांगितले. आशा राक्षे यांना तर आमच्या धर्मात या लगेच तुमच्या मुलाचे लग्न जमेल असे म्हणाला तसेच पद्मिनी पाटील हिला देखील वांरवार लाल रंगाचे पेय प्या सर्वांना प्रत्येक दहा हजार रुपयाचे आमिष दाखवून ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव आणला. आमच्या धर्माचा व धार्मिक श्रध्देचा अपमान करुन शिवीगाळ केला म्हणुन फादर विरुध्द गुन्हा नोंद आहे.

## मंगळवेढा शहरातील गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्याने अपघातात वाढ

### आ. समाधान आवताडे यांनी लक्ष घालण्याची नागरिकांची मागणी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ जुलै-**

शहरातील अपघातप्रवण आणि धोकादायक ठिकाणी, तसेच शाळेजवळ करण्यात आलेल्या गतिरोधकांवर स्पष्ट दिसणारे सफेद पट्टे मारावेत आणि चालकांना सतर्क करणारे सूचना फलक लावावेत अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे तरी आमदार समाधान आवताडे यांनी लक्ष घालावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मंगळवेढा शहरातील मार्गावरील प्राथमिक शाळा, रहदारीच्या ठिकाणी गतिरोधक बसवणे अत्यावश्यक होते. त्या ठिकाणी नव्याने गतिरोधक बसवण्यात आले आहेत. परंतु बसविण्यात आलेल्या गतिरोधकांवर प्रतिबिंबित रंगाचे (रेफ्लेक्टिव्ह) सफेद पट्टे मारलेले नसल्याने दिवसा रात्रीच्या वेळेस आणि पावसाळ्यात वाहनचालकांना अपघातांना सामोरे जावे लागत आहे. सुरक्षितपणे प्रवास करता यावा यासाठी या गतिरोधकांजवळ सूचना फलक लावण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे गतिरोधकांना सफेद पट्टे मारून सूचनाफलक लावावेत. तरी संबंधित विभागाने तातडीने ही कामे तातडीने हाती घेऊन ती पूर्ण करावी व भविष्यात होणारे संभाव्य अपघात टाळावेत अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. नागरिकांची मागणी : गतिरोधकांवर प्रतिबिंबित रंगाचे सफेद पट्टे संदर्भात आ. समाधान आवताडे यांनी लक्ष घालावे नागरिकांची मागणी खरे तर गतिरोधक हे अपघात टाळले जावेत म्हणून असतात. पण प्रत्यक्षात शहरात सर्वत्र असलेल्या सदोष गतिरोधकांमुळे नेमके याच्या उलट घडते. वाहने तर खराब होतातच, वर वाहनधारकांनाही इजा होते. भारतीय बनावटीच्या दुचाकी चारचाकी वाहनांची दोन चाकातील उंची कमी असते.



विशेषत: महिला ज्या गाड्या वापरतात त्या हलक्या कमी उंचीच्या असतात. त्यामुळे मोठ्या गतिरोधकावरून गाडी गेल्यास ती खाली लागून गाडी डॅमेज होण्याचे प्रकार घडतात. याला खर्चही मोठ्या प्रमाणात येतो. अशीच अवस्था चारचाकींची आहे.तरी संबंधित विभागांना आ. आवताडे यांनी सूचना देण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



## धर्मराज काडादी यांची अन्नछत्र मंडळास भेट

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जुलै-**

सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे प्रमुख, अनेक सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संस्थांचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट या धर्मादाय न्यासास सदिच्छा भेट दिली. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्वामींची मुर्ती देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सिद्धेश्वर देवस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)